**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभागृहात मंत्री उपस्थित नसणे.**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. तथापि, मंत्री उपस्थित नाही. त्यामुळे आपण सभागृहाची बैठक मंत्री येईपर्यंत स्थगित करावी अशी मी आपणास विनंती करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.32 ते 10.42 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- स्थगिती नतर -

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**सभापती** : आता दिनांक 16 एप्रिल 2010 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.6492 घेण्यात येईल.

**राज्यात भटक्या विमुक्त जातीच्या शाळा बंद करण्याचे दिलेले आदेश**

**(5) * 6492 ॲड.प्रितमकुमार शेगांवकर** : सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (वि.जा.भ.ज.) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात भटक्या विमुक्त जातीच्या शाळा बंद करण्याचे आदेश सन 2009 मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले आहेत काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच पुन्हा सदर भटक्या विमुक्त जातीच्या आश्रमशाळा सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) सन 2009 मध्ये राज्यातील विजाभज आश्रमशाळाच्या खालील कारणांमुळे मान्यता रद्द केलेल्या आहेत.

अ) प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जुनुना ता.बार्शीटाकळी या आश्रमशाळेची एकवेळ संधी देऊनही आश्रमशाळा सुरु न केल्यामुळे दि.2/2/2009 रोजी आश्रम शाळेची मान्यता रद्द केलेली आहे.

ब) ग्रामविकास मंडळ, कारंजा संचालित श्री संत भाकरे महाराज आश्रमशाळा, सारवाडी, ता.कारंजा, जि.वर्धा येथील आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचा मानसिक व आर्थिक छळ करणे तसेच संस्थेचे सचिव यांनी प्रवेशित मुलीवर लैंगिक अत्याचार करणे तसेच शासनाच्या ध्येयधोरणानुसार आश्रमशाळा चालविली जात नसल्याने व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने शाळेची मान्यता दि.9.6.2009 अन्वये आदेशान्वये काढुन घेण्यात आली आहे.

क) शिवचैतन्य पारमार्थिक शिक्षण संस्था कामती (खुर्द), जि.सोलापूर या संस्थेची मान्यता खोट्या स्वाक्षरी करुन तुकडी मान्यता व जादाची शिक्षक भरती करुन शासनाचे पैसे हडप केले या कारणावरुन दि.21/8/2009 रोजी मान्यता काढली. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

ड) गोंडवाना मुक्ती मिशन, जि.वर्धा संचलित जयभवानी प्राथमिक आश्रमशाळा, आंजी अंदोरी, ता.देवळी, जि.वर्धा या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना नियमबाह्य काढून टाकणे, मुलांना मारहाण करणे, मुलांना उपाशी ठेवणे आणि संधी देवूनही कामकाजात सुधारणा न झाल्याने सदर आश्रमशाळेची मान्यता दि.24.8.2009 च्या शासन आदेशान्वये काढून घेण्यात आली आहे.

इ) राजश्री शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर संचलित विजाभज लिसीट प्राथमिक आश्रमशाळा, ठाणेगाव, ता.आरमोरी, जि.गडचिरोली या आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी कमी असणे, रेकॉर्ड न ठेवणे, शाळेतील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा न पुरविणे, इत्यादी कारणांमुळे सदरहू शाळेची मान्यता दि.24.8.2009 च्या शासन आदेशान्वये काढुन घेण्यात आली आहे.

(3) सदरच्या बंद झालेल्या शाळा सुरु करण्याबाबत कार्यवाही केलेली नाही. परंतु शाळांच्या मान्यता रद्द केल्याने या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून आसपासच्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्रमांक 6492......श्री.गुलाबराव देवकर...

आश्रमशाळेतील सदर विद्यार्थ्यांना सामावून घेणेबाबत संबधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय,पहिल्या प्रश्नाला " नाही " असे उत्तर दिलेले आहे. ते उत्तर बरोबर नाही. भटक्या व विमुक्त समाजासाठी प्राथमिक शाळा देणेच शासनाने बंद केलेले आहे. 2009 साली ज्या शाळा बंद दाखविण्यात आलेल्या आहेत. त्या शाळामध्ये काही त्रूटी असल्यामुळे बंद करण्यात आलेल्या आहेत.शासनाने भटक्या आणि विमुक्त समाजासाठी प्राथमिक शाळा देणे बंद केलेले आहे. 2003 साली 100 प्राथमिक शाळा आणि 100 माध्यमिक शाळा देण्यासबंधी जाहिरात काढण्यात आली होती परंतु माध्यमिक शाळा देण्यात आल्या होत्या आणि प्राथमिक शाळा देण्यात आल्या नव्हत्या. युती शासनाच्या काळात ज्या 25 शाळा देण्यात आल्या होत्या त्या शाळांना शासनाने मंजुरी दिली नव्हती आणि या शाळांना मंजुरी दिली नसल्याने 100 प्राथमिक शाळांना मंजुरी देण्याचे देखील नाकारले होते त्यामुळे या समाजावर अन्याय झाला आहे तेव्हा हा अन्याय दूर करण्यासाठी शासन प्राथमिक शाळा पुन्हा सुरु करणार आहे काय ?

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6492...

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, शासनाने दि. 31.5.2006 रोजी नवीन आश्रमशाळांना परवानगी न देण्यासंबंधीचा जी.आर. काढला. तेव्हापासून नवीन आश्रमशाळांना परवानगी न देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे या अगोदर जे प्रस्ताव आले असतील त्यांचा विचार होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यामध्ये भटक्या व विमुक्तांची लोकसंख्या 20 टक्के आहे. त्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा आश्रमशाळा राज्यात आहेत काय? नसल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये 6 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. परंतु भटक्या विमुक्तांसाठी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केली जात नाही. आणि म्हणून भटक्या विमुक्तांकरिता बंद असलेल्या आश्रमशाळा आपण पुन्हा त्वरीत चालू करणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्यामध्ये 140 योजनांतर्गत आणि 680 योजनेतर अशा एकूण 820 आश्रमशाळा आहेत. त्यापैकी 9 शाळा विविध कारणांमुळे बंद आहेत. या शाळा संस्थेने अनियमितता केल्यामुळे, बेकायदेशीररित्या संस्था चालविल्यामुळे बंद आहेत. त्या संस्थांवर आपण कारवाई केली आहे. त्यामध्ये 5 संस्थांची मान्यता रद्द केली आहे. मान्यता रद्द करण्यात आलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेमध्ये समायोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नवीन शाळा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. शाळा बंद केल्या आहेत म्हणून एकही नवीन शाळा सुरु करता येणार नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, भटक्या विमुक्तांचे शिक्षण आपण बंद करणार काय? नसेल तर या शाळांना आपण मान्यता देणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, भटक्या विमुक्तांचे शिक्षण बंद करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. ज्या शाळा चालू आहेत त्या व्यवस्थितपणे आणि चांगल्या क्वॉलिटीने चालल्या पाहिजेत यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. म्हणून त्याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. या शाळांमध्ये गैरव्यवहार होणार नाही व चांगल्या क्वॉलिटीचे शिक्षण दिले जाईल यासाठी निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6492...

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, साखर कारखान्यांच्या ठिकाणी भटक्या विमुक्त जातीचे कामगार असतात. ते आपल्या मुलांना सोबत घेऊन जातात. अनेक साखर कारखान्यांच्या ठिकाणी साखर शाळा नाहीत. त्यामुळे या साखर कारखान्यांच्या जवळ प्राथमिक शाळा काढून सात-आठ महिन्यात संपूर्ण वर्षभराचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या आश्रमशाळा काढण्याचे नियोजन करण्यात येईल काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने प्रश्न उपस्थित केला आहे. आणि शासनाचा सुध्दा विचार आहे की, साखर कारखान्याच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळत नाही. त्याठिकाणी शिक्षण देण्याची व्यवस्था नसते. म्हणून त्या संदर्भात लवकरात लवकर हे शासन धोरण तयार करील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. या राज्यामध्ये अनेक आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रचंड शोषण केले जाते. भ्रष्टाचार परवडला परंतु या मुलांच्या ताटातील अन्न त्या संस्था खातात. अशा शाळांवर आपण कठोर कारवाई करणार काय? दुसरा प्रश्न असा की, भटक्या विमुक्तांसाठी स्वतंत्र आश्रमशाळा न काढता भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्या कुटुंबाला व मुलांना थेट निधी आपण देणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या शाळा चांगल्या पध्दतीने चालल्या पाहिजेत अशी अपेक्षा माननीय सदस्यांनी व्यक्त केली. या शाळांमधील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा दिल्या पाहिजेत याचे निकष ठरविण्यात आले आहे. त्या निकषानुसार या शाळांची तपासणी केली जाईल. आणि ज्या शाळांमध्ये दोष आढळतील, गैरव्यवहार आढळेल त्या शाळांवर ताबडतोब कारवाई करण्यात येईल, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांना थेट निधी देण्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्या संदर्भात धोरण ठरविण्याचा विचार केला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणात आलेल्या फयान वादळांमध्ये मच्छिमारांच्या जाळयांची**

**नुकसान भरपाई देताना पावत्या दाखवण्याबाबत**

**(१) * ३०२८ श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात आलेल्या फयान वादळांमध्ये मच्छिमारांच्या नुकसानभरपाईतील जाळयांची भरपाई देताना पावत्या दाखविण्याची अट शिथिल करुन पंचनाम्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे विचार असल्याचे माहे डिसेंबर, २००९ च्या अधिवेशनात मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी नियम ९३ अन्वये चर्चेच्या वेळी दिलेल्या उत्तरांत दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही उपरोक्त बाबतीचा निर्णय न घेतल्याने पंचनाम्याप्रमाणे आठ कोटींची नुकसान भरपाई मिळण्याऐवजी ४ कोटी सिंधुदुर्ग जिल्ह्याला प्राप्त होवून फक्त १ कोटी रुपये वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त अट शिथिल करण्याबाबत निर्णय घेतला आहे काय,

(४) वरील नियम ९३ अन्वये चर्चेच्या वेळी सुके मासे खारवण्यासाठी असलेले मीठ व इतर बाबींचे नुकसान भरपाई देण्याकरिता अंतर्भूत करण्याबाबत चर्चा होवूनही अद्याप निर्णय झाला नाही हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास,याबाबतचा निर्णय शासन केव्हापर्यंत घेणार आहे ?

**श्री.गुलाबराव देवकर, डॉ. नितीन राऊत यांच्याकरिता** : (१) होय.

(२) रु.१.२२ कोटी इतका निधी वाटप करण्यात आला आहे.

(३) अद्याप निर्णय घेतलेला नाही.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे. याच विषयाच्या संदर्भात दिनांक १६.४.२०१० रोजी या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावेळी या विषयावर सविस्तरपणे चर्चा झालेली आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत पुन्हा चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

**सभापती** : सभागृहापुढे आता हा तारांकित प्रश्न चर्चेला आलेला आहे. त्यामुळे त्यावर एखाद-दुसरा प्रश्न विचारण्यास हरकत नाही.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ KTG/ पूवी श्री.सरफरे . . . . 10:50

ता.प्र.क्र.3028 . . . .

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे म्हटलेले आहे आणि तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "अद्याप निर्णय घेतलेला नाही." माझा असा प्रश्न आहे की, याबातीत शासन निर्णय घेणार आहे काय ? त्याचप्रमाणे 2009 सालामध्ये मच्छिमारांसाठी पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. तसेच त्या अनुषंगाने 9016 छोट्या मच्छिमार विक्रेत्यांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला आहे अशा प्रकारचे उत्तर गेल्या अधिवेशनाच्या वेळी नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेच्या संबंधात दिले आहे. त्याप्रमाणे 9016 लोकांना 2000 रुपये प्रमाणे जे अनुदान द्यावयाचे आहे, ते देण्यात येईल काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यामध्ये ज्या मच्छिमारांच्या जाळयांचे नुकसान झाले म्हणून नुकसान भरपाईच्या संबंधातील अटी शिथिल करुन देणार आहात काय ? असा एक विषय होता. याबाबतीत शासनाने संबंधित मच्छिमारांकडून काही पुरावे मागितले होते. जर मच्छिमारांनी ते पुरावे दिले तरच त्यांना ती नुकसान भरपाई देता येईल अशा प्रकारचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे यामध्ये पुन्हा सवलत देता येणार नाही. ज्या मच्छिमारांनी पुरावे सादर केले आहेत, त्यांनाच मदत केली जाईल असे शासनाचे धोरण आहे.

----

. . . .डी-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंमळनेर (जि.जळगांव) येथे परराज्यातील विद्यार्थी आणून आश्रमशाळांमध्ये शासकीय अनुदान मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याबाबत**

**(2) * 5710 श्री.गुरुमुख जगवानी, श्री.विनोद तावडे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अंमळनेर (जि.जळगांव) येथील अनुसूचित जाती, आदिवासी व भटक्या विमुक्त जमातींसाठीच्या आश्रमशाळांमध्ये शासकीय अनुदान मिळण्यासाठी नियमबाह्यरित्या तात्पुरत्या स्वरुपात परराज्यातील विद्यार्थी आणून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे माहे जुलै, 2009 च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी व्यक्तिंवर कोणती कारवाई करण्यांत आली आहे वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री. शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (1) नाही.
(2),(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेच्या निकषाप्रमाणे किमान 5000 आदिवासी लोकसंख्या आणि 5 कि.मी.च्या परिसरात एक आश्रम शाळा असणे आवश्यक आहे. जळगाव जिल्ह्यातील पहाडी तालुके वगळले तर निकषाप्रमाणे लोकसंख्येचे प्रमाण अतिशय तुरळक असताना सुध्दा या भागात आदिवासी आश्रम शाळा आहेत हे खरे आहे काय ? तसेच अशा एकंदर किती आश्रमशाळा आहेत ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच आदिवासी लोकसंख्या नसणाऱ्या भागामध्ये जर या आश्रमशाळा असतील तर या आश्रमशाळांची पटसंख्या पूर्ण आहे काय ? नसेल तर ती कशा प्रकारे पूर्ण होते ? हा माझा दुसरा प्रश्न आहे. त्याचबरोबर आमचे असे म्हणणे आहे की, बाहेरच्या राज्यातून विद्यार्थी आणून आश्रमशाळेतील पटसंख्या पूर्ण केली जाते. हे खरे आहे काय ? असा माझा तिसरा प्रश्न आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या 29 प्राथमिक आश्रमशाळा असून, 13 माध्यमिक आश्रमशाळा आणि 6 कनिष्ठ महाविद्यालये अशी एकूण 48 युनिटस् आहेत. तसेच अमळनेर तालुक्यामध्ये 4 प्राथमिक आश्रमशाळा, 2 माध्यमिक आश्रमशाळा आणि 1 कनिष्ठ महाविद्यालय आहे. या आश्रमशाळांमध्ये प्राथमिक आश्रमशाळेचे 120 विद्यार्थी शिकत आहेत. माध्यमिक शाळेमध्ये 120 विद्यार्थी शिकत आहेत. गडखांब शाळेमध्ये प्राथमिक शाळेमध्ये 120 आणि माध्यमिक शाळेमध्ये 120 आणि कनिष्ठ

. .. .डी-3



APR/ D/ KTG/ 10:50

विद्यालयामध्ये 80 विद्यार्थी शिकत आहेत. पारोळा तालुक्यातील वसंतनगर गाव आहे, तेथे प्राथमिक शाळेमध्ये 70 विद्यार्थी असून माध्यमिक शाळेमध्ये 170 विद्यार्थी आहेत आणि कनिष्ठ माध्यमिक विद्यालयामध्ये 80 विद्यार्थी आहेत म्हणजेच जवळपास सगळयाच आश्रमशाळांमध्ये ही पटसंख्या नियमानुसार बरोबर आहे आणि रावेर, चोपडा, यावल या तीन आदिवासी तालुके आहेत आणि जळगाव जिल्ह्यांमध्ये इतरही तालुक्यांमध्ये आदिवासी रहातात आणि त्या ठिकाणी युनिटप्रमाणे शासनाने शाळा सुरु केलेल्या आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्नाच्या बाबतीत महत्वाचा आक्षेप होता की, अनुसूचित जाती, आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या ज्या आश्रमशाळा आहेत, तेथे पुरेशी विद्यार्थी संख्या नसतानाही परराज्यातून विद्यार्थी आणून पुरेशी विद्यार्थी संख्या दाखवून, त्यांना मिळणारे अनुदान लाटण्याचा हा विषय आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, त्याठिकाणी 41 युनिट सुरु आहेत. माननीय मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांची संख्या सांगितली, शाळांची संख्या सांगितली.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5710....

श्री. रामनाथ मोते.....

या संदर्भातील जी माहिती या सभागृहामध्ये सांगण्यात आलेली आहे ती माहिती आपल्या अधिकाऱ्यांनी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करुन, पडताळणी करुन घेतलेली आहे काय? ही पडताळणी केव्हा केली? आणि यासंदर्भातील अहवाल सभागृहासमोर ठेवणार काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये वेळोवेळी तपासणी झालेली आहे त्यापध्दतीने हे रिपोर्ट दिलेले आहेत परंतु नेमक्या कोणत्या तारखेला तपासणी केलेली आहे यासंदर्भातील माहिती माझ्या जवळ नाही.

**सभापती** : ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/

**विनाअनुदानित इंग्रजी व भाषिक शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा मिळण्याबाबत केलेले आंदोलन**

**(3) * 5560 श्री.कपिल पाटील , श्री.संजय दत्त, श्री. एस. क्यु. ज़मा** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विनाअनुदानित इंग्रजी व भाषिक शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीचा परतावा मिळावा या मागणीसाठी मागासवर्गीय संघटनांनी आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, विनाअनुदानित शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क समितीने निश्चित केलेली फी देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(3) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (1) होय.
(2) इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करण्याचे शालेय शिक्षण विभागाचे धोरण नाही. तथापि मराठी माध्यमाच्या शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परीक्षा फीची प्रतिपूर्ती शालेय शिक्षण विभागाच्या प्रमाणित दराने करण्यात येते.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) विनाअनुदानित व कामय विनाअनुदानित शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती किती प्रमाणात करता येईल व किती वित्तीय भार पडेल याचा अभ्यास करण्यासाठी प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. सदरहू समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतरच त्यावर शासन अंतिम निर्णय घेईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहात परवाच्या दिवशीच या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी त्या दिवशी असे संगितले होते की, जी फी दिली गेली आहे ती परत करण्याच्या संदर्भात कारवाई सुरु आहे तिला स्थगिती देण्यात येईल परंतु नोटिसा अजून मागे घेतलेल्या नाहीत.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, जी फी दिली गेली, तिची वसुली पुन्हा केली जाणार नाही, असे निसंदिग्ध आश्वासन माननीय मंत्रिमहोदय देतील काय? जी प्रधान सचिवांची समिती नेमलेली आहे त्या समितीच्या शिफारशीनुसार जी फी ठरेल त्याची अंमलबजावणी जूनपूर्वी त्यासंस्थांना विश्वासात घेऊन करणार का? जिथे 50 टक्क्यापेक्षा जास्त एस.सी.,एस.टी. आणि ओ.बी.सी.चे विद्यार्थी आहेत अशा सर्व इंग्रजी शाळा किंवा अन्य भाषिक शाळांना अनुदानावर आणण्यासाठी मंत्रिमंडळाला आपण प्रस्ताव देणार काय?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5560...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी प्रथम सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सचिवांची जी समिती गठीत करण्यात आलेली आहे ती या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी गठीत करण्यात आलेली आहे. म्हणून दुसरे शैक्षणिक वर्ष येण्याच्या आधीच त्या समितीकडून रिपोर्ट मागवावा लागेल जेणेकरुन भविष्य काळामध्ये जो काही निर्णय होईल तो निर्णय येणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्याचे काम केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला त्याप्रमाणे तशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तशा सूचना गेल्या नसतील तर आजच्या आज तशा सूचना देऊन स्थगिती दिली जाईल. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न विचारला त्याबाबतीत समितीचा अहवाल आल्यानंतर केवळ मुबई शहरापुरते तसे करता येणार नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान न देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यामुळे निव्वळ एका शहरापुरता तो निर्णय लागू करता येणार नाही. कारण मागासवर्गीय एस.सी.,एस.टी.,ओ.बी.सी.चे विद्यार्थी संपूर्ण राज्यामध्ये असल्यामुळे समितीचा अहवाल त्वरित मागवून हा निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू करण्याची भूमिका राज्य शासनाची राहाणार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, जेथे 50 टक्क्यापेक्षा जास्त विद्यार्थी एस.सी.एस.टी. आणि ओ.बी.सी.चे आहेत अशा शाळा अनुदानावर आणण्यासाठी मंत्रिमंडळाला प्रस्ताव देण्यात येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी असे उत्तर दिलेले आहे की, जी परतावा फी परत घ्यावयाची आहे तिला स्टे देण्यात येईल. ही परतावा फी डायरेक्ट विद्यार्थ्यांना मिळालेली आहे. विद्यार्थ्यांच्या नावाने बँकेत जमा झालेली आहे. आता शिक्षण संस्था चालकाना या फी च्या परताव्या बाबत नोटिसा काढलेल्या आहेत. संबंधित शिक्षण संस्था चालक त्या विद्यार्थ्यांना आता कुठे शोधणार? संबधित विद्यार्थी पासआऊट झालेले आहेत. ते ऑलरेडी शाळा सोडून गेलेले आहत त्यामुळे त्यांच्याकडून फी परत घेता येणार नाही. शासनाने विद्यार्थ्यांना ही फी चुकीने दिलेली असेल तर ज्यांची चूक असेल त्यांनी ती पनिशमेंट घ्यावी पण ती विद्यार्थ्यांकडून आणि शिक्षण संस्था चालकांकडून परत घेण्यात येऊ नये त्यांना ती फी माफ करण्यात यावी. सरकार ती फी माफ करणार काय?असा माझा प्रश्न आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये यासाठीच समिती गठीत केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चुकून एका जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी सन 2003 च्या जी.आर.चा वेगळा अर्थ काढून ही फी देण्याचे काम केलले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट देखील आपण नाकारु शकणार नाही. परंतु समितीचा रिपोर्ट आल्यानंतरच याबाबतचा निर्णय घेतला जाईल.

यानतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5560....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी विचारलेला प्रश्न वेगळा नाही. आपण माननीय मंत्रिमहोदयांना समज द्यावी.

**सभापती** : आवश्यकता असली तरच मंत्रिमहोदयांना समज दिली जाईल.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, ज्या ठिकाणी 50 टक्क्याच्या वर अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे विद्यार्थी असतील त्या इंग्रजी शाळांना आपण ग्रॅंट देणार काय किंवा फी देणार काय ? शासनाचे धोरण इंग्रजी शाळांना देण्याचे नाही त्यामुळे तो प्रश्न उपस्थित होत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उपप्रश्न 4 च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की समिती गठीत केलेली आहे. त्या समितीचा निर्णय किती दिवसात येईल ? ही सर्व फी माफ केली तर राज्य शासनावर एकंदर किती बोजा पडणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुंबई शहराचा विचार केला तर एवढ्या वर्षाचे आतापर्यंत 43 कोटी रुपये झालेले आहेत. यामध्ये सरासरी काढली तर मोठी रक्कम होणार आहे. त्याला मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेल. सन्माननीय सदस्यांनी अहवालाबाबत विचारले. सदर अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्यास त्यांना भाग पाडू.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**वरळी डेअरीचें प्रभारी व्यवस्थापक रजेवर असतांना त्यांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त पदभार देण्यात आलेल्या प्रभारी व्यवस्थापनाने केंद्र मंजुरी आणि केंद्र बंद करण्याचा आदेशावर व इतर बाबतीतील गैरव्यवहार उघडकीस आल्याबाबत**

**(४) * ४०८० श्री.संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६७८ ला दिनांक १० डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी डेअरीचें प्रभारी व्यवस्थापक रजेवर असतांना त्यांच्या अनुपस्थितीत अतिरिक्त पदभार देण्यात आलेल्या प्रभारी व्यवस्थापकाने केंद्र मंजुरी आणि केंद्र बंद करण्याचा आदेश व इतर बाबतीत गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात कोणकोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे व एकूण किती रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे,

(३) तसेच मंडळ निरीक्षक व पर्यवेक्षकीय अधिकारी प्रथमदर्शनी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असता त्यांच्या विरुध्द असलेली विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार प्रश्न भाग (२) व (३) नुसार शासनाने तातडीने चौकशी करुन कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, डॉ. नितीन राऊत यांच्याकरिता** : (१) काही बंद करण्यात आलेले केंद्रे वरीष्ठांची अनुमती न घेता अनधिकृतपणे चालू ठेवण्याचा गैरव्यवहार उघडकीस आला आहे हे खरे आहे,

(२),(३) व (४)

श्री.डी.बी.राणा, सहाय्यक दूध वितरण अधिकारी
श्री.एन.आर.मोरे, मंडळ निरीक्षक
श्री.एन.एस.दांगट, मंडळ निरीक्षक
श्री.एम.के.पोळ, मंडळ निरीक्षक
श्री.एम.के.चव्हाण, मंडळ निरीक्षक
श्री.एस.जी.गायकवाड, मंडळ निरीक्षक
श्री.ए.आर.सिंह, मंडळ निरीक्षक
श्री.डी.एल.लहाने, लेखा लिपीक

या कर्मचाऱ्यांवर बंद असलेली दूध केंद्रे अनधिकृतपणे चालू ठेवल्याबद्दल दोषारोप बजावण्यात आले असून विभागीय चौकशीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, वरळी डेअरीच्या व्यवस्थापकाची जागा कधी पासून रिक्त आहे आणि ती जागा भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली ? दोषींवर दोषारोपपत्र



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4080 .... श्री. संजय दत्त ....

केव्हा बजावण्यात आले आणि त्या दोषारोपाचे स्वरुप काय आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, वरळी डेअरीचे जवळपास 70 केंद्रे विविध केंद्र चालकांनी बंद करावीत अशा सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे ती 70 केंद्रे बंद करावयास पाहिजे होती. परंतु संबंधित खालच्या कर्मचाऱ्यांनी परस्पर ही केंद्रे काही लोकांना चालविण्यासाठी दिली. त्यामुळे त्या ठिकाणी गैरव्यवहार झालेला आहे हे निदर्शनास आलेले आहे. याबाबतीत 9 कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये 3 कर्मचाऱ्यांची बदली केली आणि 9 कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विभागीय चौकशी सुरु आहे. 8 एप्रिल, 2010 पासून चौकशीच्या कामाला सुरुवात केलेली आहे. त्यांना आदेश दिलेले आहेत. यामध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्या संबंधित कर्मचाऱ्यांवर निश्चितपणाने कडक कारवाई करण्यात येणार आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, व्यवस्थापकाची जागा कधीपासून रिक्त आहे या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, 70 स्टॉल्स परस्पर निरीक्षकांनी देऊन टाकले. त्या ठिकाणी आमदार विनंती करतात, सामान्य जनता विनंती करते त्यांना ते स्टॉल देत नाहीत. परस्पर निरीक्षकांनी स्टॉल दिले. त्यांच्यावर काहीही कारवाई केलेली नाही. या दोषींना निलंबित करुन कायदेशीर कारवाई करणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आधी चौकशी करावी लागेल. चौकशीचा अहवाल आल्यानंतर मी सांगितल्याप्रमाणे जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. त्यांची कोणत्याही प्रकारे गय केली जाणार नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, ते दोषी आहेत हे उत्तरामध्ये मान्य केले आहे. त्यांना निलंबित केले पाहिजे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, जे प्रथमदर्शनी दोषी दिसत आहेत त्यांची ताबडतोब बदली केली. बाकीच्यांवर चौकशीची कारवाई सुरु केलेली आहे. अहवाल आल्यानंतर ताबडतोब कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो पहिला प्रश्न विचारला

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4080 ..... श्री. गुलाबराव देवकर....

होता की, व्यवस्थापकाची जागा कधी पासून रिक्त आहे. ती जागा 30.09.2000 पासून रिक्त आहे. त्यानंतर प्रभारी अधिकाऱ्यांकडे कार्यभार दिलेला आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, गैरव्यवहार झाला हे शासनाने मान्य केलेले आहे. बदली करणे ही कारवाई नाही. त्यांना तातडीने निलंबित करुन नंतर विभागीय चौकशी पूर्ण केली पाहिजे. ते शासन करणार काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, चौकशीचा अहवाल लवकरात लवकर मागवून घेण्यात येईल आणि त्यामध्ये जे दोषी असतील त्यांना निलंबित केले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. शासनाने 1963 पासून मराठीच्या संदर्भात आदेश जारी केलेले आहेत. त्याप्रमाणे मराठीमध्ये नाव लिहिताना मराठी आद्याक्षरे लिहिली पाहिजेत आणि इंग्रजीमध्ये नाव लिहिताना इंग्रजी आद्याक्षरे लिहिली पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4080..... श्री.दिवाकर रावते....

मराठीतून माझे नाव लिहिताना दि.ना.रावते असे लिहिले पाहिजे. लेखी उत्तरामध्ये मात्र डी.बी.राणा, एस.आर.वसावे, एन.आर.मोरे, एन.एस.दांगट अशाप्रकारे बाकीच्या अधिका-यांची नावे दिलेली आहेत. सभापती महोदय, यासंदर्भातील शासनाच्या आदेशानुसार अशाप्रकारे नावे लिहिणा-यांविरुध्द वेतनवाढ रोखणे, समज देण्याची कारवाई करता येते. त्याप्रमाणे या प्रश्नाच्या संदर्भात शासन कारवाई करणार का ?

श्री.गुलाबराव देवकर : या प्रश्नाबाबत संबंधितांना समज देण्यात येईल आणि नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संबंधित मंडळ निरीक्षकांनी ज्या जागा चालविण्यासाठी दिलेल्या आहेत त्या जागांची मुंबईच्या बाजार भावाप्रमाणे किती किंमत आहे, या दोषारोपाचे स्वरुप खूप मोठे व भयानक आहे. या जागांचे क्षेत्रफळ किती आहे, त्या कोणकोणत्या भागात आहेत आणि त्या भागामध्ये त्या जागांचे दर काय आहेत ?

श्री.गुलाबराव देवकर : ही सर्व केंद्रे वरळी परिसरातील आहेत. या जागांच्या भावाचा अंदाज करु शकत नाही इतक्या त्या महागडया आहेत. त्या जागा चालविण्यासाठी देताना त्यांनी किती भाडे दिले पाहिजे याचा दर ठरविलेला असतो. त्यांनी कोणत्या दराने दुधाची विक्री करावी, पूर्ण वेळ करावी, एक वेळ, दोन वेळ करावी हे निश्चित केलेले असते. त्याचप्रमाणे त्याठिकाणी एनर्जी केंद्र सुरु करण्यासाठी वेगवेगळे दर लावलेले आहेत. या जागांचे क्षेत्रफळ 8 x 5 चौरस फूट इतके आहे, त्याठिकाणी एकूण 73 केंद्रे आहेत. या केंद्राकडून भाडयापोटी 2 लाख रुपये येणे आहे, या रकमेचे शासनाचे नुकसान झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जागांचे दर विचारले आहेत, परंतु त्या जागा फार महागडया आहेत.

-----

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्यात खरीप पिके घेणाऱ्या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करुन स्थायी आदेशानुसार विविध सवलती लागू करणेबाबत**

**(5) * 4400 श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात 36 हजार 338 खरीप पिके घेणाऱ्या गावांपैकी सुमारे 20 हजार 240 गावांमध्ये खरीप पिकांची अंतिम पैसेवारी 50 पैसे वा त्यापेक्षा कमी असल्याने या गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उर्वरीत गावांना स्थायी आदेशानुसार विविध सवलती लागू केल्या जाणार आहेत काय,

(3) असल्यास, या संबंधीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे काय ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) उर्वरित गावांना सवलती लागू नाहीत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात एकूण 36,338 खरीप पिके घेणा-या गावांपैकी सुमारे 20,240 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आहे. यामध्ये कोकण विभाग, मराठवाडा विभाग, विदर्भ विभाग आणि उत्तर महाराष्ट्र या विभागातील गावांची संख्या किती आहे ? सभापती महोदय, आणेवारी काढण्याच्या पध्दतीबाबत मी अनेक वेळा सभागृहात बोललो आहे. आणेवारी काढण्याची पध्दत ब्रिटिश काळापासून चालत आलेली आहे त्यामध्ये बदल करण्यासाठी शासन धोरण निश्चित करील काय ? आणेवारीची पध्दत सर्कलनिहाय किंवा तालुकानिहाय काढण्याची पध्दत सुरु केली जाईल काय, याबाबत शासन ठामपणे धोरण स्वीकारणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार मी माहिती देऊ इच्छितो की, पुणे विभागातील 664 गावे आहेत, कोकण विभागातील 2 गावे, नाशिक विभागातील 204 गावे, औरंगाबाद विभागातील 3474 गावे, अमरावती विभागातील 724 गावे व नागपूर विभागातील 6818 अशी एकूण 20,240 गावांमध्ये टंचाईची परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. आणेवारी काढण्याची पध्दत ब्रिटिश काळापासून चालू आहे असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. या पध्दतीमध्ये फेरबदल करता येईल काय त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

3....



NTK/ KTG/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4400.......

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यातील निम्म्याहून अधिक गावे दुष्काळाच्या खाईत सापडली आहेत. ही अभूतपूर्व परिस्थिती आहे. दुष्काळग्रस्त सर्व शेतक-यांना शासनाने कोणता कार्यक्रम आखलेला आहे ? रोजगार हमी योजनेची कामे देणे, पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे, मुलांच्या शिक्षणाची सोय करणे यासंदर्भात शासनाने आराखडा तयार केला आहे का ?

श्री.प्रकाश सोळंके : ज्याठिकाणी टंचाई जाहीर केली जाते त्याठिकाणी जमीन महसूलात सूट दिली जाते, सरकारी कर्ज रुपांतरित केले जाते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:10

(ता.प्र.क्र.4400... (श्री. प्रकाश सोळंके...

वीज बिलामध्ये 33, 1/3 इतकी सूट देण्यात येते, रोजगार हमी योजनेंतर्गत जी कामे घेण्यात येतात त्यांच्या निकषामध्ये बदल करुन देण्यात येतो, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्यात येते, शेतीसाठी घेतलेल्या सर्व कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिली जाते. ही सगळी कार्यवाही सुरु झ ाालेली आहे. ज्या गावामध्ये टंचाई जाहीर झालेली आहे तेथील जनतेला सवलती लागू होतात.

श्री. हेमंत टकले : 20240 गावांची पैसेवारी 50 पैसे आणि त्यापेक्षा कमी आलेली आहे. शासनाने असा अभ्यास केलेला आहे काय, की 40 ते 50 पैसे अशा बॉर्डर लाईनवरच्या केसेस आहेत अशा गावांना टक्केवारीच्या प्रमाणात काही सवलती देण्याचे शासनाचे धोरण आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : 50 पैशापेक्षा कमी आणेवारी आली की सवलती देण्यात येतात. 50 टक्क्या पेक्षा जास्त आणेवारी असेल तर कोणतीही सवलत दिली जात नाही. प्रत्येक गावाची आणेवारी किती आली त्याची माहिती देता येईल. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या किती गावामध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्यात आलेली आहेत ? कामे सुरु करण्याकरिता मजुरांनी मागणी केलेली आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : रोजगार हमीच्या माध्यमातून मागेल त्याला काम देण्याची तरतूद आहे. त्या दृष्टीकोनातून प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मोठ्या संख्येने कामे शेल्फवर आहेत. ज्या ज्या ठिकाणी मागणी केली जाईल त्या त्या ठिकाणी काम उपलब्ध करुन दिले जाईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कुभारमाठ (ता.मालवण जि.सिंधुदुर्ग) येथील फाटक बंधूच्या आंब्याच्या कलम बागेस लागलेल्या आगीबाबत**

**(६) * ४५४९ श्री.राजन तेली, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुभारमाठ (ता.मालवण जि.सिंधुदुर्ग) येथील फाटक बंधूच्या आंब्याच्या कलम बागेत दिनांक १ फेब्रुवारी, २०१० रोजी सकाळी ११.०० वाजता आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या प्रकरणी शासन स्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती नुकसान किती झाले आहे व आग कशामुळे लागली आहे,

(४) असल्यास, झालेल्या नुकसानीबाबत शासन नुकसानग्रस्तांना मदत करणार आहे काय ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) प्राप्त अहवालानूसार श्री.फाटक बंधू यांच्या आंबा कलम बागेस अचानक आग लागून आंब्याची कलमे व इतर साहित्याचे जवळपास एकूण रुपये २,००,०००/- एवढे नुकसार झाले आहे.

(४) केंद्र शासनाच्या सीआरएफ/एनसीसीएफ निकषानुसार मदत व पुनर्वसन विभागामार्फत मदत दिली जात. तथापि, सदर प्रयोजनासाठी सीआरएफ/एनसीसीएफ अनुसार मदत अनुज्ञेय नाही.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तराच्या भाग (4)मध्ये थोडी सुधारणा करावयाची आहे. उत्तराच्या शेवटी "आगीच्या कारणाची फेर चौकशी करण्यात येत आहे" असे वाचावे.

श्री. राजन तेली : कोकणातील सगळया जिल्ह्यामध्ये आगी लागण्याचे प्रकार सातत्याने होत असतात. काही ठिकाणी हेतूपुरस्सर आगी लावण्यात येतात तर काही ठिकाणी निष्काळजीपणामुळे लागी लागतात. या आगीमुळे शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होतो. तेव्हा यासंबंधीच्या निकषामध्ये शासन बदल करणार आहे काय ? अशा प्रकारे आग लागल्याच्या प्रकरणामध्ये शासनाने प्रथम गुन्हा दाखल करुन घ्यावयास पाहिजे. वणवे लागण्याचे प्रकार होतात. मागे कोकण् रेल्वेच्या अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे रेल्वेच्या हद्दीमध्येच आग लागली आणि बाजूला असलेल्या 5 बागा नष्ट झाल्या. तेव्हा या प्रकरणी गुन्हा दाखल करुन तपास करण्यात येणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : आगी मुद्दाम लावल्या गेल्या असतील आणि त्याबाबतीत तक्रार प्राप्त झाली तर गुन्हा दाखल करण्यात येतो.

----

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोरपना (जि.गडचिरोली) येथील माणिकगड क्षेत्रात सागवान सोबतच खनिजाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन करुन तस्करी करण्यात येत असल्याबाबत**

**(७) * ६५१२ ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.गडचिरोली) येथील माणिकगड पहाडावरील क्षेत्रात सागवाना सोबतच जंगलातील गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन करुन त्याची तस्करी करण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साग व गौण खनिजाचे होत असलेली तस्करी रोखण्याबाबत तसेच तस्करी करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१), (२) व (३) हे खरे नाही.

माणिकगड पहाडावर माहे फेब्रुवारी २०१० मध्ये वा त्या दरम्यान मोठ्या प्रमाणात सागवान तस्करी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, माणिकगड पहाडावरील काही क्षेत्रात जिल्हाधिकारी, चंद्रपूर व जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी मंजूर केल्यानुसार खनिज उत्खननाचे काम केल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत काही प्रकरणे मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठाकडे तर काही प्रकरणात महसूल आयुक्त नागपूर विभागाकडे न्यायप्रविष्ठ करण्यात आली आहेत.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : गडचिरोली जिल्हयातील कोरपना येथील माणिकगड पहाडावरील क्षेत्रात सागवानाची आणि गौण खनिजाच्या होत असलेल्या तस्करी प्रकरणी शासनाने काय कारवाई केलेली आहे ?

डॉ. पतंगराव कदम : अशा प्रकारची तक्रार आली तर त्याबाबतीत चौकशी करुन कारवाई करु.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयामध्ये महसूल आणि वन विभागाच्या जमिनी लागून असतात. या क्षेत्रातील गौण खनिजांची तस्करी केली जाते, वन क्षेत्रातील वृक्षांची तोड केली जाते

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....... ता.प्र.क्र.6512....

याबाबत शासनाकडे अनेक तक्रारी आलेल्या आहेत. माणिकगड पहाडावरील क्षेत्रात तद्वत चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात परवानगी न घेता वन विभागाच्या क्षेत्रात उत्खनन केले जाते. मोठ्या उद्योगांना लाल माती विकली जाते. असा उत्खनन केलेला माल शासनाने जप्त केला आहे का? ज्याप्रमाणे चोरी करणाऱ्याला पकडले जाते त्याच धर्तीवर चोरीचा माल विकत घेणारे आहेत ते सुध्दा गुन्हेगार आहेत. त्यानुसार शासनाने कारवाई केली आहे का?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, अशा सर्व प्रकरणांमध्ये ताबडतोब कारवाई होते. जिल्हाधिकाऱ्यांनी वन विभागाची परवानगी नसताना एनओसी दिली होती. त्याबद्दल सांगूनही गुन्हा दाखल केला नाही म्हणून वन विभागाने विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अधिकृत तक्रार देतो. गडचिरोली जिल्हयामध्ये आंध्र प्रदेशच्या बॉर्डरवर नदी वाहते. त्याठिकाणी रोज मोठ्या प्रमाणात सागवानी लाकडाची बेकायदेशीर तोड करुन वाहतूक केली जाते. त्याची चौकशी करणार आहात का? तेथे जाण्याची तुमची हिंमत नाही. कारण तो नक्षलग्रस्त भाग आहे. त्यामुळे ताबडतोब उत्तर देऊ नका. तुमचे पोलीसही तेथे जात नाहीत. मंत्रीमहोदय पटकन उठून सांगतील की, आम्ही चौकशी करतो. तसे करु नये. चंद्रपूर जिल्हयात माणिकगड पहाडावरील क्षेत्रात जिल्हाधिकारी, चंद्रपूर व खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी मंजूर केल्यानुसार खनिज उत्खननाचे काम केल्याचे निदर्शनास आले. जी मंजुरी दिली त्यानुसार खनिज उत्खनन केले. याबाबत उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याचे उत्तरात म्हटले आहे. मंजुरीनुसार खनिज उत्खनन करण्यात येत असेल तर ही प्रकरणे का न्यायप्रविष्ठ झाली?

डॉ.पतंगराव कदम : काही प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर केली. त्या संदर्भात वन विभागाने हरकत घेतली. जिल्हाधिकाऱ्यांविरुध्द आयुक्तांकडे अपील दाखल केले आहे. या अपिलावर 26 तारखेला सुनावणी होणार आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अपंगाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी होत असलेल्या दिरंगाईबाबत**

**(८) * ५४४४ श्री.व्ही.यू. डायगव्हाणे, श्री.जयंत प्र. पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५१३३७ ला दिनांक २ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/निमशासकीय संस्थातील अपंगांसाठी आरक्षित असलेल्या एकूण संवर्ग निहाय १४३४ एवढया पदांचा अनुशेष दिनांक ३१ डिसेंबर,२००९ पर्यंत भरण्याच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) पदे भरली असल्यास, केव्हा व किती,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवाजीराव मोघे** : (१), (२) व (३) राज्यातील शासकीय / निमशासकीय सेवामध्ये अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदांपैकी शिल्लक असलेला अनुशेश भरण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे, दिनांक ३१/८/२००९ अखेर १४३४ पदांचा अनुशेष असून त्यापैकी ११०३ पदे ही विभाग प्रमुखांमार्फत व ३३१ पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणार आहेत. तत्पुर्वी ९३४० पदे प्रत्यक्ष भरण्यात ाअली असून विभागामार्फत भरावयाची ४८७ पदे शिल्लक आहेत. सदर पदेही जून, २०१० अखेर पर्यंत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. काही पदावर सुयोग्य उमेदवार उपलब्ध नसणे, निवड झालेले उमेदवार हजर न होणे या कारणास्तव अद्याप कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ९३४० पदे भरण्यात आली. भरण्यात आलेल्या पदांपैकी प्रत्यक्ष किती पदावर उमेदवार हजर झाले? अनुशेषांतर्गत १४४४ पदे रिक्त आहेत, ही पदे केव्हा भरण्यात येतील?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत दिनांक २.२.२०१० रोजी मंत्रालयात बैठक झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बैठकीत असा निर्णय घेतला की, जी पदे शिल्लक आहेत ती सर्व पदे ३० जून, २०१० पूर्वी भरण्यात यावीत.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर विधानपरिषद निवडणूक १८ डिसेंबर, २००९ मध्ये कामठी मतदान केंद्रावर गोपनीयता भंग प्रकरणी तेथील केंद्र प्रमुख व अधिकारी यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्याबाबत**

**(९) * ५८८०   श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे दिनांक १८ डिसेंबर, २००९ रोजी झालेल्या विधानपरिषद निवडणूकीत मतदानाच्या वेळी निवडणूकीची गोपनीयता भंग केल्यामुळे कामठी मतदान केंद्रावरील केंद्र प्रमुख व अधिकारी (दोघेही नायब तहसिलदार) यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग यांचेकडे दिनांक १ फेब्रुवारी, २०१० रोजी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली,

(३) नसल्यास, अद्याप कारवाई न करण्याची कारणे कोणती, शासन यावर केव्हापर्यंत कारवाई करणार आहे?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२) संबंधित नायब तहसिलदार यांना शासन आदेश दिनांक १५ एप्रिल, २०१० अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या जागेसाठी निवडणूक झाली. त्या निवडणुकीमध्ये गोपनीयतेचा भंग केला म्हणून कामठी मतदान केंद्रावरील केंद्र प्रमुख व अधिकारी यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांनी अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्याकडे १ फेब्रुवारी, २०१० रोजी पाठविला आहे काय? या प्रश्नाला "होय हे खरे आहे" असे उत्तर देण्यात आले आहे. निवडणुकीमध्ये गोपनीयतेचा भंग केल्याबद्दल दोन नायब तहसीलदार दोषी आढळले आहेत. त्या संदर्भातील व्हिडीओ कॅसेट उपलब्ध आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब निलंबित करण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविला. माझ्याकडे विभागीय आयुक्तांच्या पत्राची प्रत आहे. विभागीय आयुक्तांनी १ फेब्रुवारी, २०१० रोजी अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्याकडे निलंबनाचा प्रस्ताव पाठविला आहे. असे असताना १५ एप्रिल, २०१० रोजी निलंबन करण्यात आले आहे. म्हणजे अडीच महिन्यांच्या काळात निर्णय का झाला नाही? निलंबन करण्यास अडीच महिन्याचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत?

नंतर जे.१...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5880.........

श्री. प्रकाश सोळंके : दि. 15 एप्रिल, 2010 रोजी या दोन्ही तलसीलदारांना निलंबित केले आहे. सन्माननीय सदस्यांनी विलंब का लागला असा प्रश्न उपस्थित केला असून त्यासंबंधीची चौकशी करण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : महोदय, याप्रकरणी जे दोन नायब तहसीलदार दोषी आढळून आले आहेत त्यांची नावे काय आहेत ? तसेच व्हिडियो चित्रीकरणात त्यांच्याविरुध्द पुरावे मिळाल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी देखील मान्य केले आहे म्हणून त्यांची सखोल चौकशी करुन कारवाई करणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, निलंबित केलेल्या नायब तहसीलदारामध्ये एक श्री.एन.बी. तरोडकर आणि दुसरा मतदार अधिकारी क्र.1 श्री. आर.एन.भांडारकर अशी त्यांची नावे असून त्यांना निलंबित केलेले आहे. तसेच व्हिडियो चित्रीकरणात त्यांच्याविरुध्द पुरावे सापडले म्हणून त्यांची सखोल चौकशी करुन कडक कारवाई करण्यात येईल.

--------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड येथील सीना धरणासाठी संपादित केलेल्या सर्वे नं.39 मधील 3 एकर बारा गुंठे जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(11) * 5417 ॲड. उषाताई दराडे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड येथील सीना धरणासाठी सन 1983 संपादित केलेल्या श्री. लक्ष्मण धोंडीबा शंकर गाडे सर्वे नं.39 मधील 3 एकर बारा गुंठे जमिनीचा मोबदला सुमारे 27 वर्षे होऊनही देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.

(2) होय.

(3) व (4) सीना धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीमध्ये स.नं.39 मधील 3-61 हे.आर जमीन संपादित करण्यात आली. त्यामध्ये लक्ष्मण धोंडीबा गाडे यांची जमीन समाविष्ट आहे. श्री.लक्ष्मण गाडे यांना सदर जमीन महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, 1961 अन्वये वाटप करण्यात आलेली आहे. स.नं.39 मधील 3-61 हे.आर. जमिनीबाबत दिनांक 12.10.1979 रोजी निवृत्ती नामदेव गावडे यांनी सदर जमिनीबाबत वाद असल्याने संपादनाचा मावेजा वाटप करु नये अशी लेखी हरकत घेतली होती. त्यामुळे सदर जमिनीचा एकत्रित मावेजा रक्कम रु.14,378-45 दिनांक 24.2.1983 रोजी शासन खाती जमा केला आहे. सदरचा मावेजा हा कोषागारात परतावा देयक दाखल करुन रक्कम प्राप्त होताच संबंधितांना वाटप करण्यात येईल.

ॲड. उषा दराडे : महोदय, श्री. लक्ष्मण गाडे यांची जमीन सीना धरणासाठी दि. 12.10.1979 ला संपादित केली असून त्याला श्री. निवृत्ती नामदेव गावडे यांनी हरकत घेतली होती आणि आता सन 2010 वर्ष सुरु आहे. तरी देखील आतापर्यंत त्या जमिनीची मालकी कोणाची आहे हा निर्णय विशेष भू-संपाद अधिकाऱ्यांनी घेतला नाही. यासाठी विलंब लागण्याचे कारण शोधून यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ? तसेच जमिनीची मालकी सिध्द करण्यासाठी विलंब होत असल्याने भू-संपादन कायद्यातील सेक्शन 30 नुसार हे प्रकरण जिल्हा न्यायालयाकडे रेफर करणार काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5417.......

श्री. प्रकाश सोळंके : श्री. लक्ष्मण धोंडिबा गाडे यांच्या जमिनीबाबत जो आक्षेप अर्ज भू-संपादन अधिकाऱ्याकडे आलेला आहे त्या अर्जावर भू-संपादन अधिकाऱ्यांनी वेळेतच निर्णय घेणे आवश्यक होते, परंतु तो निर्णय त्यांनी घेतला नाही व याप्रकरणी 20 वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी देखील अद्यापही तसा निर्णय झालेला नाही म्हणून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई केली जाईल.

ॲड. उषा दराडे : महोदय, जमिनीचा मालकी हक्क ठरविण्याचा अधिकार भू-संपादन अधिकाऱ्यांचा असताना त्यांनी अद्यापही निर्णय न घेतल्याने हे प्रकरण जिल्हा न्यायालयाकडे भूसंपादन अधिनियमातील कलम 30 नुसार सादर करण्यात येते. त्यानुसार हे प्रकरण त्यांच्याकडे रेफर करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, भूसंपादन अधिकाऱ्यांनीच यासंबंधीचा अंतिम निर्णय घेणे अपेक्षित असते परंतु तो घेण्यास विलंब झालेला आहे, त्यामध्ये काही अडचणी असतील तर निश्चितपणे हे प्रकरण जिल्हा न्यायालयाकडे रेफर केले जाईल.

-------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भांबुर्डा वनविभागात संयुक्त नागरी व्यवस्थापनाद्वारे वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत**

**(12) * 4704 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.भगवान साळुंखे, श्री.विनोद तावडे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भांबुर्डा वनविभागात संयुक्त नागरी व्यवस्थापनाद्वारे वनाचे संरक्षण व संवर्धन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या योजनेत खर्च करण्यात येणाऱ्या निधीत राज्य शासनाचा किती हिस्सा आहे,

(3) नसल्यास, शासन या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देणार आहे का ?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) होय हे खरे आहे. भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील भांबुर्डा या गावात संयुक्त नागरी वनव्यवस्थापन प्रकल्पांतर्गत वनांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येत आहे.

(2) व (3) नागरी संयुक्त वनव्यवस्थापन प्रकल्पांतर्गत वनांचे संरक्षण व संवर्धन या कामासाठी पुणे महानगरपालिकेकडून निधी उपलब्ध करुन दिला जात आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत भांबुर्डा हे क्षेत्र येते. त्या ठिकाणी एक अभिनव प्रयोग सुरु केला असून त्यानुसार वनांचे संरक्षण करण्याचे काम चांगल्या प्रकारे होत आहे म्हणून असाच प्रयोग राज्यातील इतर शहरांमध्ये सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे काय ? तसेच पुणे महापालिकेच्या वतीने या अभिनव कार्यक्रमासाठी निधी दिला जातो तसेच वन विभागामार्फत देखील निधी देण्याचा विचार मंत्री महोदय करतील काय ?

श्री. पतंगराव कदम : महोदय, पुणे महापालिकेच्या वतीने या कार्यक्रमासाठी वर्षाकाठी एक कोटी इतका निधी दिला जातो. तसेच हा निधी कमी पडला तर वन विभागामार्फत सुध्दा या कामासाठी निधी दिला जाईल. तसेच पुण्यामध्ये हा अभिनव प्रयोग यशस्वी झाल्यामुळे इतर शहरातून हा कार्यक्रम घ्यावा यासाठी स्वयंसेवी संस्था पुढे आल्या तर त्यांनाही हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ ST/ SBT/ 11:25

**उपवन संरक्षक, सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) यांनी तेथील जमिनीत कांदळवन नसल्याचे दाखवून तीस बिनशेतीचा दाखला देऊन मा.उच्च न्यायालयाचा केलेला अवमान**

**(१३) * ३०३५ श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपवनसंरक्षक सावंतवाडी श्री.भा.स.खैरे यांनी विल्सन मॅन्युअल गुडीनो यांना जावक क्र. ब/कक्ष-३/जमिन/नाहरकत/३०८८/०६-०७ सावंतवाडी दिनांक २३ जानेवारी, २००७ त्याचप्रमाणे उपवनसंरक्षक सावंतवाडी श्री.नरेश झुरमुळे यांनी श्री.जावेद निरा सय्यद यांना जा.क्र.कक्ष-२/सर्वे/नाहरकत/७१४/०८-०९ दिनांक २० जुलै, २००८ याद्वारे तसेच श्री.भा.स.खैरे सदर जमिनीत कांदळवन नसल्याचा बिनशेती करण्याकरिता दाखला देवून मा.उच्च न्यायालयाचा अवमान केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या दोन्ही उपवनसंरक्षक यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) अद्याप कारवाई झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. पतंगराव कदम** : (१) श्री.विल्सन मॅन्यूअल गुडीनो आणि श्री.जावेद मिरा सय्यद यांना वन विभागामार्फत देण्यात आलेल्या अनुक्रमे दि.२३.१.२००७ व दि.२.७.२००८ च्या दाखल्यामध्ये त्यांच्या अर्जातील खाजगी जमिनीवर कांदळवने नाहीत असा उल्लेख नाही. वन विभागामार्फत देण्यात आलेल्या दाखल्यामध्ये "सदर क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारीत नाही आणि सदर क्षेत्र भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलम ३५ अंतर्गत गणले जात नाही" असे नमूद आहे. सदर दाखले नियमित स्वरुपात देण्यात आले आहेत तसेच " सदर क्षेत्र वनसंश्रेच्या व्याख्येत येते किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांच्या कार्यालयाशी संपर्क" साधण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे. बिनशेती करण्याची परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येते. याप्रकरणात वन विभागामार्फत बिगरशेती करण्याचा दाखला देण्यात आलेला नाही.

(२, (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाचा सन २००५ चा आदेश व राज्य शासनाने काढलेला २००५ चा आदेश यासंदर्भातील सर्व नोंदी सात-बारामध्ये करावयाच्या असतांना त्या नोंदी करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे नोंदी करण्याच्या संदर्भात वनविभागाकडून उपाययोजना केली जाणार आहे काय ? या ठिकाणी तीन्ही बाजूने खाडी असतांना सीआरझेडचे उल्लंधन करुन बीन शेतीचे जे आदेश दिलेले आहेत ते आदेश देणा-यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या ठिकाणी जिल्हाधिका-यांनी परवानगी दिलेली असून कांदळवनाची सात-बारामध्ये नोंद केली जाईल.

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ३०३५....

श्री. परशुराम उपररकर : सभापती महोदय, उच्च न्यायायाच्या आदेशाप्रमाणे जिल्हाधिका-यांनी सीआरझेडचे उल्लंघन करुन बीन शेतीचे परवाने दिलेले आहेत त्यामुळे आपण संबंधितांवर कारवाई करणार आहात की, नाही ?

डॉ. पंतगराव कदम : सभापती महोदय, यासंदर्भात चौकशी करुन कारवाई केली जाईल.

-----

...३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पश्चिम महाराष्ट्र आणि भूकंपाच्या धक्क्यांचा अभ्यास करण्यासाठी उपकरणे बसविण्याचा निर्णय घेतल्यासंदर्भात**

**(१४) * ४७८५ श्री.संजय दत्त, श्री.राजन तेली, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात भूकंपाच्या धक्क्यांची तीव्रता वाढत चालली आहे. त्यासाठी कोयना-वारणा धरण, चिपळूण -संगमेश्वर परिसरात भूकंप धक्क्यांचा अभ्यास करण्यासाठी ठिकठिकाणी अद्ययावरत उपकरणे बसविण्याचा शासनाने निर्णय घेतल्याचे माहे डिसेंबर, २००९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रश्नाबाबत घेतलेल्या निर्णयानुसार भूकंपाची अद्ययावत उपकरणे बसविण्याचे काम सुरु झाले आहे काय,

(३) असल्यास, होत असलेल्या कामाचा तपशील काय आहे,

(४) अद्याप उपरोक्त कामाविषयी कोणतेच काम सुरु केले गेले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांचे करिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात भूकंपाच्या धक्क्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. या ठिकाणच्या भूकंपाच्या संदर्भात दर १५ दिवसातून किंवा एक महिन्यातून वर्तमानपत्रातून बातम्या येत असतात. या भूकंपाची तीव्रता जरी जास्त नसली तरी या भूकंपामुळे या परिसराला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण मोठा भूकंप होई पर्यंत थांबणार आहात काय ? भूकंपाच्या संदर्भात शासनाने ठोस उपाययोजना केलेली आहे काय ? या ठिकाणी भूकंप मापक यंत्र बसविण्याची गरज असेल तर त्या प्रकारची यंत्रे बसविण्यात आलेली आहेत काय ? या ठिकाणी ही यंत्र बसविली नसतील तर यंत्रे न बसविण्याची कारणे काय आहेत ? त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदय सविस्तर माहिती देतील काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सविस्तर माहिती खूप मोठया प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे सदर सविस्तर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल. कोयना परिसरात जे भूकंपाचे धक्के बसतात त्यासंदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी अर्धातास चर्चा उपस्थित केली होती व त्या अर्धातास चर्चेला सविस्तर उत्तरही देण्यात आले होते. महाराष्ट्राची जी भौगोलिक रचना आहे त्या प्रमाणे महाराष्ट्राला ७ रिस्टर स्केलच्यावर भूकंपाचे धक्के बसणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ४७८५....

श्री. विजय वडेट्टीवार ....

नाहीत. त्यामुळे तशा प्रकारची हानी कोयना धरणाला किंवा कोयना परिसराला होण्याची भिती नाही. भुंकपाचे धक्के नोंद करण्याची आवश्यक अशी उपकरणे या परिसरात बसविण्यात आली असून ही उपकरणे कार्यरत आहेत. त्यामुळे या ठिकाणी नवीन यंत्रे बसविण्याची आवश्यकता नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, भुंकप जास्त रिस्टर स्केलचा झाला तर त्यामुळे मोठया प्रमाणात हानी होऊ शकते परंतु याचा अर्थ असा नाही की, कमी क्षमतेचे धक्के बसले तरी ते धोका दायक नसतात असा त्याचा अर्थ होत नाही. हा प्रश्न अगदी लाईटली घेण्यात आले असून त्याची उत्तरे सुध्दा लाईटली दिलेली आहेत. हा प्रश्न त्या भागाच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. कोयना परिसरात दर १५ दिवसांनी किंवा एक महिन्यांनी भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. खरे म्हणजे कमी रिस्टर स्केलमध्ये आपल्याला प्रिकॉशन घेता येईल. सन २००९ मध्ये या ठिकाणी अशा प्रकारची यंत्रणा बसविण्याचा पुनर्विचार केला होता त्यामुळे या ठिकाणी ही यंत्रणा बसविण्याचा आपण पुनर्विचार करणार आहात काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या ठिकाणी यंत्रणा बसविण्याची आवश्यकता नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोयना क्षेत्र भूकंप प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केले आहे काय ? जर हे भूकंप प्रवण श्रवण क्षेत्र असेल तर या ठिकाणी आवश्यक असलेली यंत्रणा बसविली जाणार आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, जगामध्ये कोठेही भूकंप झाला तरी त्यांची नोंद घेतली जात असते. त्यामुळे या ठिकाणी अद्यावत यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. या परिसरात आतापर्यंत १,१६,५५३ असे छोटे मोठे भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. या परिसरामध्ये कोयना किरसान भूकंप मापक वेध शाळा असून त्या ठिकाणी यासंदर्भातील अद्यावत चार यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. ज्या परिसरात भूकंप होतो त्या परिसरात भूकंप मापक यंत्रणा बसविली जात नाही कारण त्या ठिकाणी भूकंप झाला तर ती सर्व यंत्रणा उध्वस्त होईल त्यामुळे ही यंत्रणा थोडी लांब अंतरावर बसवावी लागते. या परिसरात जे वारंवार भूकंपाचे धक्के बसतात त्या धक्क्याची नोंद घेणारी यंत्रणा या ठिकाणी कार्यरत आहे.

...५...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ४७८५....

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, भूकंपाच्या प्रश्नावर या सभागृहात मी सातत्याने आवाज उठवलेला आहे. भूकंप होणार असेल तर त्याला आपण रोखू शकत नाही. परंतु लातूर, उस्मनाबाद किंवा कोयना असेल...

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ ST/ D/ SBT/ KTG/ जुन्नरे... 11:30

ता.प्र.क्र.4785...

डॉ.नीलम गोऱ्हे.....

तेथील लोकांमध्ये भूकंपासंबंधी जागृती करणे आवश्यक आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनासबंधी जागृती करणे आवश्यक आहे. माझ्या माहितीप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन आराखडा केलेला नाही. प्रत्येक वेळी चौकटीतले उत्तर दिले जाते. तेव्हा शासनाकडून कृतीशील उत्तर अपेक्षित आहे म्हणून सातरा,लातूर व अन्य भूकंपग्रस्त भागामध्ये शासनाने कोणती उपाययोजना केली आहे यासंबंधातील माहिती देणे आवश्यक आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, "पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात भूकंपाच्या धक्क्यांचा अभ्यास करण्यासाठी उपकरणे बसविण्याचा घेतलेला निर्णय" या विषयासंबंधी तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. भूकंप झाल्यानंतर त्याची नोंद व्हावी म्हणून उपकरणे, यंत्रसामुग्री आपल्याकडे आहे. तथापि, भूकंप आता होणार आहे, असे दर्शविणारे यंत्र जगाच्या पाठीवर नाही. जपानमध्ये देखील नाही. भूकंप झाल्यानंतर त्वरित नोंद होऊन त्याची माहिती सर्वत्र कळावी अशा प्रकारचे उपकरण आपण लावले आहे. आपल्या येथे जेथे छोटे-छोटे भूकंप होण्याचा संभव आहे, असे विभाग निश्चित केले आहेत. तेथेही आपण यंत्रणा बसविली आहे. मी येथे असेही सांगू इच्छितो की, मुंबईसह सर्व जिल्ह्यात आपण आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार केलेला आहे. त्यासाठी आवश्यक तो कर्मचारीवृंद, आवश्यक त्या बाबी पुरविलेल्या आहेत. लातूर, उस्मानाबाद,कोयना येथे आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवली तर लोकांना काय करावे, अधिकाऱ्यांनी काय करावे, घरे कशी असावित, कशी बांधावित, भूकंप होत असताना, भूकंप झाल्यानंतर कोणती काळजी घ्यावी इत्यादी संबंधातील माहिती आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातून देण्यात येत आहे. मी येथे पुन्हा सांगू इच्छितो की, भूकंप होणार असल्याबाबतची माहिती दर्शविणारे उपकरण जगामध्ये कुठेही नाही. तसे उपकरण निर्माण झाले तर आम्ही ते अवश्य लावू. भूकंप झाल्यानंतर त्याची तीव्रता मोजणारे अद्ययावत असे उपकरण आपल्याकडे आहे. मंत्रालयापासून जिल्हा पातळी पर्यंत आपत्ती व्यवस्थापन केंद्र आपल्याकडे अस्तित्त्वात आहे. एवढेच नव्हे तर आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये आपण व्हिडिओ कॉन्फरन्सिगसुद्धा करू शकतो. तेव्हा चांगल्या प्रकारचे आपत्ती व्यवस्थापन संपूर्ण राज्यात आपण सुरू केले आहे.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : सभापती महोदय, सभागृहात सकाळी मंत्री उपस्थित नसल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाची दहा मिनिटे वाया गेली आहेत.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराचा तास आज सकाळी 10.30 वाजता सुरू झाला. सुरूवातीची दहा मिनिटे वाया गेली आहेत हे मला मान्य आहे. प्रश्नोत्तराचा तास 11.30 वाजता संपायला पाहिजे होता. तथापि, तसे न करता मी प्रश्नोत्तराच्या तासासाठी तीन मिनिटे जास्त दिलेली आहेत.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आज सकाळी सभागृहात मंत्री नसल्यामुळे आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित केले. अधिवेशन सत्र कालावधीत मंत्री गैरहजर राहिल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याची पाळी पीठासीन अधिकारी म्हणून आपल्यावर येते. आपण मागच्या अधिवेशनामध्ये शासनाला ताकीद दिली होती. त्यामुळे मंत्री वेळेवर उपस्थित राहिले होते. अधिवेशन सत्र कालावधीत मंत्री उपस्थित रहात नसल्याबद्दल मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत श्री.हर्षवर्धन पाटील, माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी मला पत्र पाठविले आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, "दिनांक 22.12.2009 रोजी सभागृहात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्यात येते की, सभागृह सुरू असताना कॅबिनेट दर्जाचा एक मंत्री उपस्थित असणे अनिवार्य असते." सभापती महोदय, मला हेच वाक्य खटकते. "मंत्री" आणि "राज्यमंत्री" असा उल्लेख असतो. "कॅबिनेट मंत्री" असा उल्लेख नसतो.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

या पत्रात त्यांनी पुढे असे म्हटलेले आहे की, "कॅबिनेट दर्जाच्या किमान एका मंत्र्यांची सभागृहात उपस्थिती अनिवार्य असावी, यासाठी अनिवार्य उपस्थितीचे वेळापत्रक प्रत्येक अधिवेशनाच्या प्रारंभी सर्व मंत्री महोदयांना पाठविण्यात येते. तसेच सभागृहात कॅबिनेट दर्जाचे मंत्री उपस्थित नाहीत अथवा ज्या विषयाची चर्चा सुरु आहे त्या विषयाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित ठेवावी लागते. अशी परिस्थिती उद्‌भवू नये यासाठी सर्वांनाच सूचना देण्यात येतात तसेच अशा स्वरुपाचे निदेश माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर देखील देण्यात येतात त्या अनुषंगाने गत अधिवेशनातील सूचनांची प्रत आपल्या माहितीकरिता सोबत जोडली आहे " या सूचनांची प्रत मी या ठिकाणी वाचून दाखवत नाही. या सोबत माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीचे पत्र सर्व मंत्री महोदयांना देण्यात आले असून त्या पत्राची प्रत जोडली आहे ते महत्वाचे असल्यामुळे मी ते वाचून दाखवतो. त्या पत्रात असे म्हटलेले आहे की, " नागपूर येथे दिनांक 8 डिसेंबर 2009 पासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे अधिवेशनाच्या काळात सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री किंवा विधानसभा आणि विधान परिषद सभागृहात त्यांच्या खात्याशी संबंधित कामकाजाच्या वेळी तसेच त्यांना नेमून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सभागृहात उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सबंधित विभागाच्या मुद्यावर चर्चा सुरु असतांना संबंधित विभागाचे मंत्री वा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर सभागृहाला विभागाची माहिती मिळत नाही परिणामी शासनाला सभागृहाचा रोष पत्करावा लागतो. असे होऊ नये म्हणून सर्व मंत्री आणि राज्य मंत्री यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अपरिहार्य परिस्थिती उदभवल्यास माझ्याकडे पाठविला जाणारा सभागृहात अनुपस्थित राहण्याची पूर्व परवानगीचा विनंती अर्ज मंत्री संसदीय कार्य विभाग यांच्या मार्फत सादर करण्यात यावा . पूर्व परवानगी शिवाय सभागृहात अनुपस्थित राहू नये. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे कामकाज बंद पडणार नाही याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी.

आपला

अशोक चव्हाण

मुख्यमंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

अशा प्रकारे माननीय मुख्यमंत्र्यानी सूचना देऊन सुध्दा गेल्या अधिवेशनात सभागृहात कॅबिनेट मंत्री अनुपस्थित राहण्याचा प्रकार घडला होता त्याचबरोबर या अधिवेशनातसुध्दा तोच प्रकार घडला आज सकाळी दहा मिनिटासाठी सभागृह तहकूब करावे लागले. सभापती महोदय, याबाबतीत. आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना जे काही कळवावयाचे असेल ते कळवावे अशी मी हरकतीच्या मुद्याव्दारे विनंती करतो माननीय मुख्यमंत्र्यांचे कोणी ऐकत नाही असा यातून संदेश जातो.माननीय मुख्यमंत्र्यांची सुध्दा मंत्री मंडळातील मंत्र्यावर पकड राहिली नाही काय असा माझ्यासमोर प्रश्न निर्माण झाल्यामुळे मी हा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे आज सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे दहा मिनिटे वाया गेली आहेत तो वेळ वाढवून देण्यासबंधी आताच आपल्याला विनती देखील करण्यात आली होती.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदय्य आणि गट नेते श्री दिवाकर रावते यांनी सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करावी लागली या संबंधीचा विषय उपस्थित केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री आणि संसदीय कार्य मंत्री यांनी पाठविलेली पत्रेसुध्दा त्यांनी वाचून दाखविली आहेत. त्याचबरोबर त्यांनी काही बाबी हायलाईट केल्या आहेत अर्थात त्याबाबातीत मला काहीही म्हणावयाचे नाही. सभागृहात कॅबिनेट मंत्री असलेच पाहिजेत हा मुद्दा महत्वाचा आहे.कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते म्हणून सभागृहाची बैठक तहकूब करावी लागली. त्याचे मी समर्थन करीत नाही. आज सकाळी 10.15 वाजता कॅबिनेटची बैठक होती.ही बैठक चालू असताना कोणी तरी परवानगी घेऊन तेथे अनुपस्थित राहून सभागृहात यावयास पाहिजे होते परंतु तसे झाले नाही. याबाबतीत मी प्रथम दिलगिरी व्यक्त करतो .कोणी मुद्दाम असे करीत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचे कोणी ऐकत नाही असे सन्माननीय सदस्य म्हणाले आहेत. तेव्हा असे काही नाही. सन्माननीय सदस्य सुध्दा पूर्वी मंत्रीमंडळात होते आणि तेसुध्दा मुख्यमंत्र्यांचे ऐकत होते आजही सगळे मुख्यमंत्र्यांचे एकत आहेत. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, यासबंधीची नोंद आम्ही घेतलेली आहे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये आणि सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये याची आम्ही खबरदारी घेऊ.

---------



VTG/ ST/ SBT/ प्रथम श्री.भ्ंारवि 11.35

पृ.शी. लेखी उत्तरे

मु.शी. तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती फौजिया खान ( महिला व बाल कल्याण राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " ठाणे जिल्हयातील कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी बालविकास केन्द्र व बालवाडया सुरु करण्याबाबत " या विषयावरील सर्वश्री संजय दत्त, जैनुद्दिन जव्हेरी,प्रतापसिंह मोहिते -पाटील, राजन तेली, संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे,जयंत प्र.पाटील,वि.प.स. आणि सर्वश्री गोविंदराव आदिक,शरद रणपिसे, प्रा.शरद पाटील माजी वि.प.स.यांच्या दिनांक 7 एप्रिल 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 37301 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी आपण राज्य सरकारला काहीतरी मुदत दिली पाहिजे. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य निवृत्त होऊन चार-चार वर्षे झाल्यानंतर सुध्दा अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जात नाही. म्हणून या विषयाचे गांभीर्य आपण शासनाच्या लक्षात आणून दिले पाहिजे.

**सभापती** : तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती अक्षम्य दिरंगाईने सभागृहाच्या पटलावर ठेवण्याकरिता पाठविणे बरोबर नाही. ही अधिक माहिती तातडीने कशी सभागृहासमोर येईल याबाबत सन्माननीय मंत्रिमहोदयांनी नोंद घ्यावी. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेबांनी संबंधित मंत्रिमहोदयांना तसे कळविण्याची व्यवस्था करावी.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, निवृत्त झालेले व निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती त्वरित सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत नोंद घेण्यात येईल.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागात झालेले बालमृत्यू" या विषयावरील सर्वश्री संजय दत्त, सुभाष चव्हाण, चरणसिंग सप्रा, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री परशुराम उपरकर, विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांच्या दिनांक 5 एप्रिल 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 2888 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडण्यात आलेली अधिक माहिती छापावी.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात अति दुर्गम भागात बालमृत्युचे प्रमाण कमी करण्याबाबत" या विषयावरील डॉ. दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, वि.प.स. व श्री. अनंत तरे, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 24 जुलै 2003 रोजी उत्तरित झ ालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 33572 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडण्यात आलेली अधिक माहिती छापावी.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांनी मा. राज्यपालांना सादर केलेले दिनांक 21 फेब्रुवारी 2002, 17 एप्रिल 2003 व 4 ऑगस्ट 2008 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/129/2005/0116, दिनांकित 20 जानेवारी 2005 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/125/2005/1249, दिनांकित 21 जून 2005 व त्यास काढलेले शुध्दिपत्र क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/2012 दिनांकित 20 ऑक्टोबर 2005 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, 2006 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमईआरसी/एडीएम/168/2006/2333, दिनांकित 28 नोव्हेंबर 2006 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/129/2005/0115, दिनांकित 20 जानेवारी 2005 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/1718, दिनांकित 26 ऑगस्ट 2005 व त्यास काढलेले शुध्दिपत्र क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/2012, दिनांकित 20 ऑक्टोबर 2005 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:45

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, 2008 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवानाअटी/ आरईएल/ 2008/1665, दिनांकित 20 ऑगस्ट 2008 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, 2004 मधील सुधारणा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, 2006 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/130/2006, दिनांकित 10 जानेवारी 2010 व त्यास काढलेले शुध्दीपत्र क्रमांक मविनिआ/लिगल/132/2005/2012, दिनांकित 20 ऑगस्ट 2005 अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.गुलाबराव देवकर (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा सन 2006-2007 व 2007-2008 चा वार्षिर्क अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2009 रोजी संपणाऱ्या वर्षाचा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वाणिज्यिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2008-2009 या वर्षाचे (1) वित्तीय लेखे अहवाल, (2) विनियोजन लेखे अहवाल, 3) नागरी अहवाल 4) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल, 5) महसुली जमा अहवाल, 6) सन 2007-2008 या वर्षाचा स्थानिक संस्था अहवाल सभागृहासमोर ठेवतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010-2011 या वर्षाचे मासिक निधी विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

श्री.प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधानसभेकडून संमती मिळाल्याची यादी प्रधान सचिव वाचून दाखवतील.

सचिव : विधान परिषदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

(1) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक, 2010

(2) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 4 - महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता (सुधारणा) विधेयक, 2010

(3) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 5 - वेतन प्रदान व किमान वेतन (महराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2010

----

. . . .ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता संयुक्त

समिती नियुक्त करणे

**मु.शी.**: धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता संयुक्त समिती नियुक्त करण्याबाबत विधी व न्याय मंत्र्यांचा प्रस्ताव

श्रीमती वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते.

दिनांक 22 एप्रिल 2010 रोजी धर्मदाय रुग्णालयांच्या संदर्भात विधान परिषदेमध्ये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत झालेल्या चर्चेच्या वेळी माननीय विधी व न्याय मंत्री यांनी आश्वासित केल्यानुसार धर्मदाय रुग्णालयांच्या तपासणीसाठी विधानसभा/विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांची संयुक्त समिती गठीत करण्यात यावी व समितीची कार्यकक्षा मागाहून निश्चित करण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत</u>**

**सभापती** : आता प्रथम नियम 93 अन्वयेची निवेदने चर्चेला घेण्यात येतील त्यानंतर औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या सुरुवातीच्या आठवाडयात मी नियम 93 अन्वयेच्या सूचना दिल्या होत्या. त्या संदर्भातील निवेदने अद्याप आलेली नाहीत. नियम 93 च्या सूचनांची 7 ते 8 निवेदने आलेली नाहीत.आज अधिवेशन संपणार आहे तेव्हा ही निवेदने केव्हा करण्यात येणार आहेत?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांची निवेदने आलेली नाहीत.

डॉ. दीपक सावंत : दर अधिवेशनाप्रमाणे या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी नियम 93 अन्वयेच्या निवेदनांचा गठ्ठाच्या गठ्ठा येथे आला आहे. तरी देखील अजून काही निवेदने बाकी आहेत.

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील 24 निवेदने आलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन वेळा यासंदर्भात मला स्मरण केलेले आहे. मी सुध्दा या आसनावरुन माननीय संसदीय कार्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांना सूचना दिलेल्या आहेत की, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सात दिवसामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये आली पाहिजेत. आज जरी 24 निवेदने माझ्याकडे आली असली तरी आणखी पुष्कळ निवेदने यावयाची आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सुदैवाने याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या ही बाब नजरेस आणून देऊ इच्छितो की, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने असतील, औचित्याचे मुद्दे असतील किंवा विशेष उल्लेख असतील त्या त्या बाबींची निवेदने त्या त्या विभागाने तातडीने सभागृहात करणे गरजेचे आहे. मला खात्री आहे की, यादृष्टीने माननीय मुख्यमंत्री जरुर लक्ष घालतील.

श्री. अशोक चव्हाण : होय, सभापती महोदय.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राजगुरुनगरचे निवेदन विधानसभेमध्ये अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात झाले आणि विधानपरिषदेमध्ये ते तिसऱ्या आठवडयात झाले असा फरक देखील होत आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे. मी ते बघतो.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, बरीचशी निवेदने आज चर्चेसाठी आलेली आहेत. काही निवेदने सदनाच्या पटलावर ठेवण्याबाबत मी माहिती घेतो आणि त्याप्रमाणे ती निवेदने सदनाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

**सभापती** : ठीक आहे. आता नियम 93 अन्वयेची निवेदने चर्चेला घेण्यात येतील्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता औचित्याचे मुद्दे आणि विशेष उल्लेख घेण्यात यावेत. तोपर्यंत बाकीची नियम 93 अन्वयेची निवेदने येतील त्यानंतर एकत्रितपणे नियम 93 अन्वयेची निवेदने चर्चेला घेता येतील.

**सभापती** : नियम 93 अन्वयेची निवेदने आता चर्चेला न घेता ती थोडया वेळाने घ्यावयाची काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तोपर्यंत बाकीची नियम 93 अन्वयेची निवेदने आली तर तीही विचारात घेता येतील.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधीचा चार्ट अद्याप आलेला नाही.

**सभापती** : कालचे आणि आजचे विशेष उल्लेख आज घेण्यात येतील.

-----

...3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडतो.

"सध्या दूरदर्शनवर "माय मराठी" या वाहिनीतर्फे गजानन महाराजांच्या चरित्रावर आधारित ब्रम्हांडनायक ही मालिका दाखविण्यात येत आहे. परंतु या मालिकेत गजानन महाराजांच्या जीवन चरित्राचा विपर्यास करुन दाखविण्यात आलेला आहे.

गजानन महाराजांच्या जीवनकार्याबद्दल "श्री. गजान विजय" हा ग्रंथ सर्वत्र प्रमाण मानला गेला आहे पण त्या ग्रंथच्या आधारे चित्रण करण्याऐवजी वस्तुस्थितीचा विपर्यास करुन काही दृष्ये दाखविली आहेत.

गजानन महाराजांचे पट्टशिष्य संत भास्कर महाराजांना बैलासोबत नांगराला जुंपल्याचे दृष्य दाखविल्यामुळे गजानन महाराजांच्या भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. खरं म्हणजे श्री संत भास्कर महाराज हे वऱ्हाडातील एक श्रीमंत व दानशूर व्यक्ती म्हणून ओळखले जात होते परंतु या मालिकेत त्यांना दरिद्री दाखविण्यात आले आहे. भास्कर महाराजांच्या आकोलीजहागीर गावात माणसांना बैलासोबत जुंपण्याची प्रथाच नाही त्यामुळे भास्कर महाराजांची विटंबना करणाऱ्या या द्रष्टयांनी समस्त गजानन भक्त तसेच भास्कर महाराजांचे नातेवाईक अत्यंत व्यथित झाले आहेत. वारकरी प्रबोधन समितीचे विदर्भ प्रमुख ज्ञानेश्वर वाघ महाराज, वारकरी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश महाराज जवंजाळ, सप्तखंजिरीवादक प्रबोधनकार सत्यपाल महाराज आदी अनेक महनीय व्यक्तींनी मालिकेतील या प्रसंगांना तीव्र आक्षेप घेऊन मालिकेवर ताबडतोब बंदी घालण्याची व गजानन महाराजांचे चरित्र वास्तव स्वरुपात दाखविण्याची मागणी केली आहे. मालिकेच्या निर्मात्याने झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागावी व सुधारित प्रक्षेपण करावे अशीही मागणी करण्यात आलेली आहे. शासनाने या गोष्टींची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी आपले व सदनाचे लक्ष वेधीत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण मला महत्वाच्या प्रश्नावर औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. राज्यात अतिउष्णतेने जनतेची निर्माण झालेली हलाखीची परिस्थिती, या पार्श्वभूमीवर राज्यात वाढलेले भारनियमन, त्यामुळे त्रस्त झालेली जनता, अग्रक्रमाने वीज निर्मिती करणारे केंद्र असलेले चंद्रपूर जिल्ह्यातील सुपर थर्मल पॉवर स्टेशन पाणी पुरवठ्याअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असणे, तेथील क्षमता 2340 मेगावॅट वीज निर्मितीची असून त्यातील फक्त 500 मेगावॅटचे 1 युनिट चालू आहे. 1800 मेगावॅट वीज निर्माण करणारे युनिट बंद असणे, यामुळे राज्यात 5,500 मेगावॅट विजेची कमतरता निर्माण झाली आहे. ग्रामीण भागामध्ये भारनियमनामध्ये दोन ते तीन तासाने वाढ झालेली आहे. शहरी भागात एक ते दोन तासाने वाढ झालेली आहे. या अत्यंत कडक उष्ण तपमानाच्या महिन्याच्या कालावधीत विजेच्या या तुटवड्यामुळे निर्माण झालेल्या वाढत्या भारनियमनाच्या परिस्थितीमुळे राज्यातील जनता अधिक त्रस्त झाली आहे व त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना व चिंतेची भावना निर्माण झालेली आहे. अशा या गंभीर बाबीकडे शासनाने तातडीने लक्ष घालून भारनियमन कमी करण्याकरिता मी हा विषय औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहात उपस्थित करीत आहे. माननीय मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. या समस्येचे गांभीर्य बघून याबाबत लेटेस्ट काय माहिती आहे याबाबत ते सभागृहाला सांगू शकतील. त्यांनी त्याबाबत सांगावे अशी मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहादयांना विनंती करतो.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत नोंद घ्यावी.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, शासनाकडून काय पावले उचलण्यात येत आहे त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, याबाबतीत नोंद घेतलेली आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये पालघर, वसई या भागातील समुद्रकिनारी अवैधरीत्या सेक्शन पंपाचा वापर करुन रेतीचा उपसा होत आहे. सुप्रीम कोर्टाने त्यावर बंदी घातलेली आहे. तरी देखील शासनाची मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी बुडवून रेतीचा उपसा चालू आहे. त्याचे चित्रीकरण केलेली सीडी माझ्याकडे आहे. ती मी आपल्याकडे पाठवतो. ही सीडी आपण माननीय मंत्रिमहोदयांकडे द्यावी. माझा असा दावा आहे की, स्थानिक प्रशासन आणि पोलीस यांच्या संगनमताने हा रेतीचा उपसा होत आहे. त्यामुळे वैतरणा पुलाला धोका निर्माण झाला आहे. याबाबतीत शासनाने त्वरित कारवाई करावी असे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे सांगू इच्छितो.

---

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये विकास योजना विभाग टी.डी.आर. सेल आहे. सन 2007-08 मध्ये ज्या प्रकरणी भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाला अशी तक्रार अँटी करप्शन ब्युरो, पुणे यांच्याकडे केली होती. पुणे महापालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. नितीन करीर, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त (विशेष) श्री. दादासाहेब झगडे, नगर अभियंता श्री. प्रशांत वाघमारे व उपनगरअभियंता श्री. विजय मोहळकर यांच्या विरुध्द चौकशी झाली होती. त्यामध्ये कनिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदार धरले परंतु यामधील जे मोठे मासे आहेत ते सुटलेले आहेत. या महत्वाच्या औचित्याच्या मुद्याव्दारे मी अशी मागणी करतो की, याची सर्वंकष चौकशी व्हावी. अँटी करप्शनने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. मी अशी मागणी करतो की, अँटी करप्शनची काय कारवाई झाली याचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सन 2009 लोकसभा व विधानसभा निवडणुकीत बुथवर काम करणाऱ्या तालुक्यातील 20 कर्मचाऱ्यांना अद्याप भत्ते मिळाले नसून निवडणुका होऊन अनेक महिन्याचा कालावधी उलटला तरी तहसील कार्यालयाकडून भत्ता न मिळाल्याने कर्मचाऱ्यात संताप व्यक्त होणे, कर्मचाऱ्यांनी वारंवार तहसील कार्यालयात भत्त्यासाठी केलेली मागणी, जिल्ह्यातील इतर तालुक्यात भत्ते देण्यात आले परंतु फक्त वडवणी तालुक्यात भत्ते न देणे, विधानसभा निवडणुका 2004 या ऑक्टोबर, 2004 मध्ये संपन्न झाल्या, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी वि.सा.नि. चौसाळाचे मानधन अद्याप न देणे, यामुळे कर्मचाऱ्यात पसरलेला संताप व शासनाने करावयाची उपाययोजना याबाबत मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, मला वाचून दाखविण्यास सुध्दा खंत वाटते, अशाप्रकारची वाईट बातमी एका पेपरमध्ये छापून आलेली आहे.

सभापती महोदय, "दै.सनातन प्रभातमध्ये दिनांक 24.10.09 रोजी खालील वृत्त प्रसिध्द झाले आहे. मासिक पाळीच्या काळात स्त्रीचा देह, वाणी आणि मन अशुध्द असते. अस्पृश्य स्त्री बोलली तर तिच्या ठिकाणचे दोष पसरतात असे विज्ञानातील तरंगाने स्पष्ट दाखविते. जिथे ती निजते त्या अंथरुणावर विषाक्त सूक्ष्म पेशीचे सेल्स पडते. तिचे स्थूल शरीरच नव्हे तर सूक्ष्म शरीरही विषाक्त असते. हे आधुनिक विज्ञानही सांगते. अशा स्त्रीने शिजविलेले अन्न खाणारा हा नादान असला पाहिजे. अमेरिकेतील डॉ.जॉन्सन यांची एक परिचारिका रोज बागेतील फुले आणायची. एक दिवस डॉक्टरांना फुलदाणीतील फुले सुकलेली दिसली. त्यांनी चौकशी केली. त्याच नर्सला त्यांनी फूल आणावयास सांगितले. तिच्या हातातील ते फूल कोमेजलेले होते. त्यांनी कोमेजलेले फूल का आणले असे विचारल्यावर ती म्हणाली मासिक पाळीच्या काळात मी गुलाब पुष्पाला स्पर्श केला की, ती लगेच कोमेजतात. सगळेच स्थूल आहे तर स्थूलापेक्षा अनंतपटीने विघात आहे" सभापती महोदय, अशाप्रकारची बातमी वर्तमानपत्रामध्ये छापल्यामुळे तमाम स्त्री वर्गाचा अपमान झालेला आहे. तेव्हा दैनिक सनातनच्या बाबतीत शासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे. सर्व सन्माननीय सदस्यांचे औचित्याचे मुद्दे मांडून झाल्यावर मला एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी द्यावी.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सांगली शहरातील गणपतराव आरवाडे महाविद्यायात एम.ए.ची परीक्षा सुरु आहे. सांगलीच्या गणपतराव आरवाडे महाविद्यालयामध्ये एका वरिष्ठ पोलीस अधिका-याला भरारी पथकाने पकडले. परंतु सर्व प्रकारचा दबाव आणून त्यांना सोडण्यात आलेले आहे. औचित्याच्या मुद्याद्वारे मी हा विषय सभागृहासमोर आणू इच्छितो. एक वरिष्ठ पोलीस अधिकारी हिंदीचा पेपर प्राचार्याच्या केबिनमध्ये बसून लिहित होता, याकडे मी शासनाचे लक्ष वेधतो.

----

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे जिल्हयाचे प्रचंड नागरीकरण झाल्यामुळे डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये देखील मी हा मुद्दा मांडला होता. ठाणे जिल्हयात मोडकळीस आलेल्या इमारती आहेत, धोकादायक इमारती आहेत. यासंदर्भात मी प्रश्न विचारला होता, त्याबाबत सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सांगितले होते की, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. ती समिती दिनांक 31.12.2009 रोजी अहवाल देणार आहे. परंतु त्यानंतर 4 महिने होऊनही हा अहवाल जाहीर केलेला नाही. ठाणे शहरातील 21 हजार लोकांनी फॉर्म भरलेले आहेत. ते लोक सरकारकडे डोळे लावून बसलेले आहेत. तेथील इमारतींपैकी काही 30 वर्षापूर्वीच्या आहेत, त्यापेक्षा जास्त काळातील आहेत. अनधिकृत आहेत, मोडकळीस आलेल्या आहेत, धोकादायक स्थितीत झालेल्या आहेत. यासंबंधी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केलेली आहे. त्यांच्यादृष्टीने हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हे गरीब लोक आहेत. याविषयी आपल्या माध्यमातून शासनाकडे मागणी करतो की, यासंबंधीचे धोरण शासनाने जाहीर करावे आणि या नागरिकांच्या शिष्टमंडळाला भेट द्यावी आणि हा प्रश्न मार्गी लावावा.

----

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे येथील हिंजवडी येथे आय.टी. पार्कचे एमआयडीसीच्या माध्यमातून फेज 1,2,3 चे काम पूर्ण झालेले आहे. तेथे मोठमोठया आंतरराष्ट्रीय कंपन्या आलेल्या आहेत. जवळपास 50 हजार बीपीओचे कर्मचारी काम करतात. तेथे वर्ष दीड वर्षापासून महिलांवरील अत्याचाराचे प्रकार वाढत आहेत. बलात्कार करणे, खून करणे असे प्रकार झाले आहेत. हे गुन्हे सुध्दा त्याच परिसरामध्ये झालेले आहेत. त्याठिकाणच्या एमआयडीसी मध्ये पोलीस स्टेशन व्हावे ही मागणी 2 वर्षांपासून केली जात आहे. परंतु त्यासाठी विभागाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे पोलीस स्टेशन स्थापन केले जात नाही. तेथील गुन्हयांना आळा बसण्यासाठी पोलीस स्टेशन होणे अत्यंत आवश्यक आहे. पोलीस स्टेशनची तेथे गरज असल्यामुळे त्यासाठी एमआयडीसीने खर्च करावा अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. कुस्तीच्या क्षेत्रातील मल्ल हे महाराष्ट्राचे वैभव आहेत. महाराष्ट्रामध्ये 8 हिंद केसरी आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मोहन जोशी....

8 हिंद केसरीमधील एक हिंदकेसरी श्रीपती कंचनाळे यांची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची असून मधल्या काळामध्ये त्यांना पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेता आले नाही. या मल्लांना दरमहा 2 हजार रुपये मानधन देण्यात येत होते ते आता 7 हजार रुपये करण्याचे ठरविलेले आहे. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की हे त्यांचे मानधन दरमहा 10 हजार रुपये करण्यात यावे.

----

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. संपूर्ण देशामध्ये आणि जगामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये प्रत्येकाचे लक्ष आयपीएलवर लागलेले आहे. त्या आयपीएलचे ललित मोदी यांचा उल्लेख घाशीराम कोतवाल प्रमाणे होत आहे. सट्टेबाजी, काळाबाजार या क्रिकेट खेळाच्या माध्यमातून होत आहे. आज विधिमंडळाचे अधिवेशन चालू आहे, तसेच संसदेचेही अधिवेशन चालू आहे. परंतु सुनंदा पुष्कर यांचा आरोप असा आहे की, आयपीएलमध्ये दाऊदचे पैसे आहेत.,शाहरुख खान यांच्या घरावर धाड टाकण्यात आलेली आहे. अनेक उच्चपदस्थांच्या मुली, कोण लॅपटॉप घेऊन पळाले आणि कोणी कोणाला ई-मेल केला यासंबंधी वृत्तपत्रातून रकानेच्या रकाने छापून येत आहेत. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी उच्च न्यायालयात धाव घेतलेली आहे. काल आम्ही वृत्तपत्रामध्ये वाचले आणि चॅनेलवर देखील पाहिले की, सन्माननीय मुख्यमंत्री महोदय असे म्हणाले की, आयपीएलवर सरकार कर लावण्याचा विचार करीत आहे. मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे की, सर्वसामान्य जनता टंचाईच्या काळामध्ये भरडली जात आहे, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी उल्लेख केला की, हिंजवडीला पोलीस स्टेशन नाही, तर आयपीएलवर कर लावला गेला पाहिजे. माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना कार्यकारी प्रमुख श्री उद्धव ठाकरे यांनी या संपूर्ण व्यवहाराच्या चौकशीची मागणी केलेली आहे. तेव्हा आयपीएलवर कर लावण्याच्या संदर्भात

(डॉ. नीलम गो-हे....

शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे. हा जो काळाबाजार चाललेला आहे त्याकडे शासनाने लक्ष द्यावे आणि त्यातील पाळेमुळे खणून काढावित याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

----

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कोकणातील चार जिल्ह्यामध्ये वृक्षतोडीस कायमस्वरुपी बंदी घालण्याबाबत दिनांक 19.3.2010 रोजी विधानपरिषद सभागृहात जाहीर करणे, त्यानंतर दिनांक 23.3.2010 रोजी माननीय वनेमंत्री यांच्या दालनात बैठक होवून दिनांक 16.3.2009 रोजी मुख्य वनसंरक्षक कोल्हापूर यांनी सर्व वन अधिका-यांना अशा प्रकारची कोणत्याही प्रकारची बंदी घातली नसल्याचे पत्रक काढणे. म्हणजे सभागृहामध्ये घेतलेला निर्णय आणि निर्णय पारित होण्यापर्वी अशा प्रकारे अधिका-यांना पत्रक काढले आहे. त्यामुळे स्थगिरीवर होणारा परिणाम यासंबंधी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यानी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डीमध्ये पोलिसांना मारहाण करण्याचा प्रकार घडलेला आहे. मालकी हक्काच्या जमिनीतून खनिज वाहतूक डंपर नेण्यास न्यायालयाचा स्थगिती आदेश असतानाही डंपर नेण्याच्या कारणावरुन पोलिसांचा बंदोबस्त घेतला असता डंपर चालकाने पोलिसांना मारहाण केली. या प्रकरणी चौकशी करुन गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

----

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

..3..



MSS/ ST/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आपणा सर्वांचे दैवत आहे. महाराष्ट्र शासनाने अरबी समुद्रामध्ये 100 कोटी रु. खर्च करुन शिवरायांचे सुरेख स्मारक उभारण्याचे ठरविलेले आहे. माझी माहिती अशी आहे की, या संबंधीचे टेंडर महाराष्ट्र शासनाने थायलंड मधील बिल मेन्सले या परदेशी आर्किटेक्टला दिलेले आहे. हे आर्किटेक्ट मागच्या महिन्यामध्ये गोव्यामध्ये आले होते.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार......

गोव्यामध्ये एका कॉन्फरन्समध्ये त्यांना जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी त्या आर्किटेक्टने असे उद्‌गार काढले की, "होय, मला टेंडर मिळाले आहे." त्यांनी जे म्हटले आहे ते इंग्रजीमध्ये मी सांगू इच्छितो. "Yes. I was not expecting that tender will be granted to me, but some Mumbai's best Architect firm has done it. It is about somebody a man sitting on a horse." म्हणजे त्या व्यक्तीला छत्रपती शिवाजी महाराज काय होते हे माहिती नाही. अशा व्यक्तीला सरकारने टेंडर देणे योग्य आहे का? कोणीतरी एखादा माणूस घोड्यावर बसला आहे, त्याचे स्मारक आपल्याला करावयाचे आहे असे त्याला वाटते. त्या व्यक्तीला शासनाने टेंडर दिले ते योग्य आहे का? माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती आहे की, या प्रकरणाची शहानिशा करावी. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी बसलेले आहेत. त्या आर्किटेक्टने अशा प्रकारचे वक्तव्य त्या कॉन्फरन्समध्ये केले होते का? याचा तपास करावा. ज्या व्यक्तीला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर नाही त्या व्यक्तीला दिलेल्या टेंडरबाबत फेरविचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, तो आर्किटेक्ट असे बोलला की नाही याची चौकशी करण्याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याला प्रतिसाद द्यावा अशी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज ज्यांना माहिती नाही अशा व्यक्तीला हे काम देण्यात येत आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी खुलासा करावा.

श्री.दिवाकर रावते : दुपारपर्यंत निवेदन करण्यास सांगावे.

श्री.रामदास कदम : माननीय मुख्यमंत्री सभागृहात बसले आहेत. हा गंभीर विषय आहे.

डॉ.वसंत पवार : हे अवमानकारक आहे. त्या माणसाला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काहीही माहिती नाही.

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सभापती महोदय, या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेऊन सभागृहाला अवगत करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : आजच अवगत करावे.

--------

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. माननीय सदस्यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मंत्रालयातील सहाय्यक व लिपिक संवर्गाची सेवाप्रवेश ज्येष्ठता सूची तयार नसल्यामुळे पदोन्नतीमध्ये होत असलेला विलंब, सदर कर्मचाऱ्यांनी याबाबत प्रधान सचिव (सेवा) यांच्यासोबत अनेकवेळा चर्चा केलेली आहे. ज्येष्ठता सूची तयार करण्याबाबत वारंवार निवेदन दिल्यानंतर प्रधान सचिव (सेवा) यांनी कर्मचाऱ्यांची बाजू रास्त असल्याचे कबूल केले आहे. मग घोडे कुठे अडले आहे? मंत्रालयातील सहाय्यक व लिपिक संवर्गात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना शासन केव्हा न्याय देणार आहे? याबाबत शासनाची भूमिका तात्काळ स्पष्ट होणे आवश्यक आहे. या विषयाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

------

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. माननीय सदस्यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. 29 नोव्हेंबर, 2009 रोजी "दि विक" या मॅगेझिनमध्ये तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्त श्री.हसन गफूर यांनी नियमबाह्य मुलाखत दिली आहे.

"विशेषत: 26/11 च्या अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याच्या वेळी श्री.परमबीर सिंग, अतिरिक्त पोलीस आयुक्त (दहशतवाद विरोधी पथक), श्री.के.व्यंकटेशन, अतिरिक्त पोलीस आयुक्त (साऊथ विभाग), अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यस्था) हे अधिकारी बोलावूनही आले नाहीत असा गंभीर आरोप जाहीरपणे वर्तमानपत्रात केला आहे. याबाबत सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहामध्ये याची चौकशी करण्याचे ठोस आश्वासन दिले. त्या चौकशीचा अहवाल सभागृहासमोर आला नाही. उलट श्री.हसन गफूर यांना मात्र अँटी करप्शन ब्यूरोचे प्रमुख म्हणून बढती देण्यात आली आहे." या गंभीर बाबीकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

..3..



SGB/ SBT/ ST/ 12:10

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, दि विक या मॅगझिनमध्ये काय छापून आले आहे ते सन्माननीय सदस्यांनी सभागृहाला वाचून दाखवावे. एकच विषय किती वेळा उपस्थित केला जातो.

**उपसभापती** : माननीय मंत्रीमहोदय, माननीय सभापतींनी औचित्याचे मुद्दे मांडण्यास माननीय सदस्यांना अनुमती दिलेली आहे. त्या क्रमवारीमध्ये हा मुद्दा मांडण्यात आला आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या एकाच विषयावर सभागृहामध्ये अनेकदा चर्चा झाली आहे.

श्री.रामदास कदम : माननीय सभापती महोदयांनी मला हा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली आहे.

श्री.नारायण राणे : दि विक या मॅगझिनमध्ये काय छापून आले ते वाचून दाखवावे. मग पाहू.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण मला मुद्दा मांडण्यास परवानगी दिली असताना अशाप्रकारे हरकत घेणे योग्य नाही. सभागृह संपण्यापूर्वी शासनाने या प्रकरणाबाबतची माहिती सभागृहाला द्यावी. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांना मी सांगू इच्छितो की, ही अतिशय गंभीर बाब असताना गृह विभागाला का मदत करीत आहात?

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : मी सरकारमध्ये असल्यामुळे मला तसे करणे आवश्यक आहे.

श्री. रामदास कदम : माननीय मंत्री महोदय, आपण जरी सरकारमध्ये असला तरी एखादा आयुक्त जाहीरपणे स्पष्टीकरण देत असेल तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याऐवजी सरकार त्याला प्रमोशन देत आहे. यासंबंधीची चौकशी करण्यात येईल असे माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते आणि आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे म्हणून हे सभागृह संपण्यापूर्वी त्या चौकशीचे काय झाले, त्यातून काय निष्पन्न झाले याची माहिती देखील सदनाला मिळणे आवश्यक आहे.

-------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ. गोपाळराव विनायक देशमुख हे मुंबईचे पहिले महापौर झाले. हे डॉक्टर देशमुख कोण होते याबाबत सांगायचे झाले तर डॉक्टर देशमुख हे महात्मा गांधीच्या आजारपणात त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर होते. त्यांनी डॉ. सुभाषचंद्र बोस, मोतीलाल नेहरु, जवाहरलाल नेहरु यांच्या पत्नी, वल्लभभाई पटेल, मोहम्मद अली शौकत अली जिना, मदनमोहन मालवीय, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांचेही ते वैद्यकीय सल्लागार होते. इंदिरा गांधींच्या टॉन्सिल्सचे ऑपरेशन सुध्दा त्यांनी केले होते. क्रिकेट पटू सी.के.नायडू यांचे सल्लागार व मित्रही ते होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांचा सहभाग होता आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पहिल्या अधिवेशनाचे ते पहिले अध्यक्ष होते. अशा या धन्वंतरी गोपाळराव देशमुख यांचे नाव "पेडर रोड" या रस्त्याला देण्यात आलेले आहे. पण पेडर रोड या रस्त्याला आजही कायमस्वरुपी पेडर रोड म्हणूनच ओळखले जाते. हे नाव देऊन 40 वर्षे झाली आहेत तरी देखील ते नाव प्रचलित नाही. यासंबंधीचा ठराव मुंबई महापालिकेत दि. 9 फेब्रुवारी, 1968 रोजी मंजूर करण्यात आला आणि त्या मार्गाला रितसर डॉ. गोपाळराव देशमुख असे नाव देण्यात आले. हा रस्ता पेडर रोडपासून गवालिया टँक असा असून त्यावर जो उड्डाण पूल तयार करण्यात आला आहे त्याला लोकहितवादी डॉ. गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल असे कोणीही म्हणत नाही आणि याला शासनाचा हलगर्जीपणा कारणीभूत आहे. सभागृहात ज्या ज्या वेळेस उड्डाण पुलासंबंधीची चर्चा होते तेव्हा मी नेहमीच हाच मुद्दा मांडत असतो की, पेडर रोडवरील उड्डाण पूल म्हणण्यापेक्षा त्याचा उल्लेख गोपाळराव देशमुख मार्गावरील उड्डाण पूल असाच करावा असे वारंवार सांगत होतो. या भागात राहणारे हायफाय लोक तसेच त्यांची रेसिडेन्शियल असोसिएशन हे सर्व लोक सुध्दा गोपाळराव देशमुख यांचे नाव घेत असताना म्हणतात की, "कोण हे गोपाळराव देशमुख ?" याचा अर्थ ते हिंदुस्थानात राहतात की नाही याबद्दलच मला शंका येते. ते गोपाळराव देशमुख यांना ओळखत नाही म्हणून सांगतात आणि "पेडर हा फेमस होता" असे सांगतात. अशी स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या व्यक्तिबद्दलची भावना या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

भागातील हायफाय लोकांची आहे. म्हणून मी विनंती करीत आहे की, 40 वर्षापूर्वी याबाबतचा ठराव पास करुन गोपाळराव देशमुख मार्ग असे नाव या रस्त्याला दिलेले असतानाही ते स्वीकारले जात नाही याबाबत शासनाने विचार करावा. त्याचबरोबर या भागातील केंद्रीय आस्थापनांचे जे फलक लावलेले आहेत त्या फलकांवर देखील "पेडर रोड" असाच उल्लेख आहे. ती नावे काढण्याबाबतची कारवाई करावी असे पत्र मी मुंबई महानगरपालिकेला पाठविलेले आहे. तसेच ज्या राष्ट्रीयकृत बँका आहेत त्यांच्या फलकांवर देखील "पेडर रोड" असेच नाव दिलेले आहे ती सर्व नावे काढून "डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग" असाच उल्लेख करण्याची व्यवस्था करावी, अन्यथा ती नावे पुसून टाकण्यासाठी कायदा हातात घेतला म्हणून कोणतीही कारवाई करु नये या माध्यमातून मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्यातील भारनियमनाच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडला होता त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांकडे माहिती नव्हती परंतु आता त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी यासंदर्भात माहिती द्यावी अशी विनंती आहे.

---

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. प्रतिवर्षी क्रीडा विभागामार्फत 10 दिवसाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण दिले जाते. त्यातून अनेक खेळाडू निर्माण व्हावेत, हा मुख्य व प्रांजळ हेतू असून गेली 30 ते 35 वर्षे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. क्रिडा विभागामार्फत या खेळाडूंना 35 वर्षापूर्वी 2 रु. अल्पोपहार भत्ता दिला जात होता. तो अजूनही रुपये 2 प्रमाणे कायम असणे, आजच्या महागाईच्या काळात फक्त दोन रुपये भत्ता किती परवडणारा आहे. राष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंना 2 रुपये अल्पोपहार भत्ता देण्यात येत असून या अल्पोपहार भत्त्यात अजूनपर्यंत वाढ का करण्यात आली नाही. यंदाच्या काळात दोन रुपयांत अर्धा कप दूधही मिळत नाही, एक चॉकलेटही मिळत नाही परंतु खेळाडूंना दोन रुपये अल्पोपहार भत्ता मिळणे ही गंभीर बाब आहे, त्यामुळे खेळाडूंचे मनोधैर्य खचत आहे. अशी ही गंभीर बाब मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहात मांडत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षापासून बेपत्ता असूनही शोध न लागलेल्यांची संख्या किती, 2009 मध्ये राज्यात एकूण किती आत्महत्या झाल्या, 31 जानेवारीपर्यंत राज्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना किती घडल्या, किती वाहने चोरी गेली अशी विचारणा माहितीच्या अधिकारात 5 फेब्रुवारी रोजी वा त्या सुमारास केली असता सदर माहिती राज्याच्या पोलीस मुख्यालयातच उपलब्ध नसल्याचे उत्तर देण्यात आले आहे. अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडे ती उपलब्ध होवू शकेल असे बेजबाबदार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

लेखी उत्तर देण्यात आलेले आहेयेणे, राज्यात गेल्या काही वर्षापासून शेतक-यांच्या आत्महत्या सुरु आहेत. त्यातच यंदा विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्यांमुळे संपूर्ण राज्यच हादरुन गेलेले असतांना राज्याच्या पोलीस मुख्यालयात यांची नोंदच नाही यावरुन शासन आणि प्रशासन या आत्महत्यांबाबत किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. या गंभीर विषयाबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेख**</u>

**पृ. शी.** : मौजे काळेगाव, (ता.जि.- बीड ) येथील दारुचे दुकान बंद करण्याबाबत

**मु. शी.** : मौजे काळेगाव, (ता.जि.- बीड ) येथील दारुचे दुकान बंद करण्याबाबत याबाबत ॲड. उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, मौजे काळैगाव, ता. बीड, जि.बीड येथे अनेक वर्षापासून परवानाधारक देशी दारुचे दुकान असून गावात 90 टक्के लोक अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर आहेत, गावातील 90 टक्के शेतकरी शेतमजूर दारुच्या आहारी गेले, अनेक संसार उध्वस्त झाले. अनेक आत्महत्या झाल्या. अलिकडच्या काळात शेतकरी मुलेही नादी लागले आहेत. या गावातील राहीबाई कचराप्पा धुमाळ या 80 वर्षे वयाच्या वृध्देने दारुबंदीचा लढा महिलांसह सुरु केला आहे. दि. 24.10.09, 1.2.10,10.2.10,15.2.10,29.3.10 अशा चार वेळा महिलांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन दिले. देशी दारुचे दुकान बंद करण्यासाठी मतदान घेण्याची विनंती केली. गावात ग्रामसेवक सरपंच दुर्लक्ष करतात. ग्रामसभा पेपरवरच होतात. आता जर दारुबंदीसाठी मतदान घेतले नाही तर दि. 1 मे रोजी आत्मदहन करु असा इशारा महिलांनी दिलेला आहे. याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांवर चर्चा सुरु करण्यात येईल.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस असल्यामुळे आजची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अजून ब-याच निवेदनांची उत्तरे आलेली नाहीत. त्यामुळे प्रथम औचित्याचे सर्व मुद्दे घेण्यात येतील व नंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील असा माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिलेला आहे.

**उपसभापती** : मी एवढेच म्हणालो होतो की, आता नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने घ्यावयाची की पटलावर ठेवायची ?

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदन पटलावर ठेवण्याचा विषय नाही. अजून काही निवेदने आलेली नाहीत. ती आपण नंतर घेणार काय ? बाकीची निवेदने येई पर्यंत आपण विशेष उल्लेख घ्यावेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना रास्त आहेत. आज दोन्ही बाजूने कामकाज आहे. आज अधिवेशनचा शेवटचा दिवस आहे. शेवटच्या दिवशी आपण निवेदने पटलावर ठेवतो. तशी आपली परंपरा आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की,आता मी विशेष उल्लेख घेत आहे. निवेदने चर्चेला घेण्यात येणार नाहीत, असे आपल्याला कोणी सांगितले. निवेदने चर्चेला घेण्यात येणार नाहीत असे मी बोललेलो नाही. मी निवेदने घेणार आहे. आपण नीट ऐकत चला. मी सभागृहाला असे विचारले की, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने घ्यायची की, पटलावर ठेवायची ?

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विशेष उल्लेख आधी न घेता आपण प्रथम निवेदने घ्यावीत. निवेदने पटलावर ठेवण्यासंबंधी कोणीही सूचना केलेली नाही.

**उप सभापती** : मी सभागृहाला पुन्हा एकदा नीट समजावून सांगतो. नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनासंबंधीची चर्चा सुरू करण्यापूर्वी मी सभागृहाला असे सांगितले की, एकूण 25 निवेदने आहेत. प्रत्येक सदस्यांना यावर एकच प्रश्न विचारता येईल. त्यानंतर माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी आणखी काही निवेदने येणार आहेत. ती आपण पटलावर ठेवणार की चर्चेला घेणार, अशी विचारणा केली. हे सर्व चालू असताना सन्मानननीय सदस्य श्री.कपिल पाटील उठले. त्यानंतर सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर उठले. म्हणून मी सभागृहाचा कल घेतला. मी विशेष उल्लेख चर्चेला घेण्याच्या विचारात होतो. म्हणूनच मी सन्माननीय सदस्य श्री.टकले यांचे नाव पुकारणार होतो. दरम्यानच्या काळात मी सदर निवेदने पटलावर ठेवली असे सन्माननीय सदस्यांना वाटले. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी मी काय बोलतो हे संपूर्ण ऐकून घ्यावे.

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे गैरसमज करून घेतात आणि कारण नसताना तो सगळीकडे पसरतो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मला सोडले आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना पकडले. काल आपण आम्हाला निरोप दिला. काल आमच्याबद्दल दोन शब्द चांगले बोललात आणि आज असे करता? आता मी विशेष उल्लेख घेतो.

....3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित तंत्रशिक्षण अभ्यासक्रम अंध व अपंगासाठी सुरू करणे.

**मु. शी.** : आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित तंत्रशिक्षण अभ्यासक्रम अंध व अपंगासाठी सुरू करणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाल्याने पूर्वापार चालत आलेले अनेक तांत्रिक शिक्षणाचे कौशल्य अंध व अपंगांना उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांच्या रोजगारावर विपरित परिणाम झाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित तंत्रशिक्षण अभ्यासक्रम अंध व अपंगांसाठी हाती घेणे आवश्यक आहे. शासनाने याबाबत एक तज्ज्ञांचा विशेष गट तयार करून संशोधन व तांत्रिक उद्योगातील अंध व अपंगांच्या शिक्षणासाठी विशेष संस्था राज्य पातळीवर गठीत करावी अशी विनंती मी ह्या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बालसदन,बालकाश्रम,अनाथालय,बालगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी मंजूर करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांबाबत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणे.

**मु. शी.** : बालसदन,बालकाश्रम,अनाथालय,बालगृह कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी मंजूर करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांबाबत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणे. याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"राज्यात महिला व बालविकास खात्याच्या स्वयंसेवी संस्थेमार्फत निराधार,निराश्रीत, अनाथ तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे पालनपोषण संगोपनाचे कार्य बालसदन,बालकाश्रम,अनाथालय,बालगृह यांचे मार्फत चालत असून अशा एकूण 550 संस्था कार्यरत असून सदर संस्थांना दिनांक 29 जुलै 2006 नुसार आकृतीबंध मंजूर केला असून वेतनश्रेणी मंजूर न करणे तसेच राज्यात विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रमशाळा व आदिवासींच्या आश्रमशाळा, मतीमंद,अंध,अपंग शाळांना वेतनश्रेणी प्रमाणे वेतन व मूल्यांकनाच्या 75 टक्के इमारत भाडे दिले जात त्याच धर्तीवर महिला व बालविकास खात्यामार्फत चालत असलेलया स्वयंसेवी संस्थातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व मूल्यांकनाच्या 75 टक्के इमारत भाडे न दिले जाणे,

...5



BGO/ D/ ST/ KTG/ SBT/ जुन्नरे... 12:25

ॲड्.उषा दराडे....

सदर संस्थांना केंद्र शासनाचे 50 टक्के व राज्य शासनाचे 50 टक्के असू सूत्र असून अनुदान न मिळणे, तसेच सदर संस्थातील विद्यार्थ्यांना परिपोषणासाठी दिले जाणारे अनुदान रूपये 635/- तुटपुंजे असून वाढलेल्या महागाईनुसार प्रती मुलामागे दरमहा दरडोई रूपये 1200/- व बालसदन, बालकाश्रम, अनाथालय परीक्षणगृहातील विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांबाबत देण्यात येणाऱ्या रूपये 315/- च्या अनुदानात रूपये 700/- इतकी वाढ करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाशेजारील बफर अधिसूचना त्वरित काढण्यासबंधी केन्द्र सरकारने राज्य सरकारला दिलेली सूचना

मु.शी. :चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाशेजारील बफर अधिसूचना त्वरित काढण्यासबंधी केन्द्र सरकारने राज्य सरकारला दिलेल्या सूचनेबाबत श्री.जैनुद्दिन जव्हेरी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे,त्यांनी ती मांडावी

श्री.जैनुद्दिन जव्हेरी (वर्धा,चंद्रपूर,गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाशेजारील बफर अधिसूचना त्वरित काढण्याच्या सूचना माननीय केद्रीय पर्यावरण मंत्री यांनी दिनांक 17 मार्च 2010 रोजी राज्य शासनास देऊनही अद्यापि यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. वन्यजीव सुरक्षा कायद्यानुसार अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्पांच्या 15 किलोमिटर परिसरातील क्षेत्रांना इकोसेन्सेटीव्ह झोन घोषित करण्याच्या अधिसूचना काढण्याचे अनेक वेळा आदेश देऊनही खाण माफीया व उद्योगपतींच्या दबावामुळे या आदेशाचे पालन केले जात नाही. यामुळे अभयारण्यातील वन्य प्राण्यावर त्याचा मोठया प्रमाणात विपरित परिणाम होत आहे यामुळे ही अत्यंत चिंतेची बाब असून अतिशय गंभीर आहे. म्हणून मी या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : हुतात्मा स्मारकावरील नावे राजपत्रात प्रसिध्द करणे

मु.शी. : हुतात्मा स्मारकावरील नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यानी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे,त्यांनी ती मांडावी

श्री.दिवाकर रावते (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय,संयुक्त महाराष्ट्र लढयाच्या वेळी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांची आठवणं रहावी म्हणून मुंबईमध्ये हुतात्मा चौकात हुतात्मा स्मारकामधील शिल्पावर 106 हुतात्म्यांची नावे कोरलेली आहेत . तत्कालीन महापौर श्री.छगन भुजबळ यांनी हे स्मारक बनविण्याची संकल्पना महापालिकेत मांडली होती आणि त्या ठिकाणी स्मारक पूर्ण झाल्यानतर त्या ठिकाणी हुतात्म्यांची नावे कोरण्याची संकल्पना त्यांच्यामुळे आली म्हणून आज त्या ठिकाणी हुतात्म्यांची नावे दिसत आहेत. राज्य शासनाने 106 हुतात्म्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करावी यासाठी गेल्या 25 वर्षापासून हुतात्म्यांचे नातेवाईक व बंधू यांनी आता पर्यत सर्व मुख्यमंत्र्यांकडे मागणी केलेली आहे. राज्याच्या प्रत्येक मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र वाहून श्रध्दांजली अर्पण करीत असतात. दिनांक 1.4.1987 रोजी महाराष्ट्र विधानसभेत तत्कालीन आमदार श्री केशवराव धोंडगे यांनी ही बाब उपस्थित केली असता तत्कालीन मुख्यमंत्री कै.शंकरराव चव्हाण यांनी चुकीच्या नोंदी काढून टाकण्याचे आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये हुतात्मा झालेल्यांना स्वातंत्र्य सैनिक मानण्याची घोषणा केली होती तथापि 1987 ते 2010 पर्यत याबाबतीत कोणतीही कार्यवाही झ ाालेली नाही. हुतात्मा स्मारकावरील हुतात्म्यांची नावे आधारभूत मानली पाहिजेत व ती नावे राजपत्रात प्रसिध्द केली पाहिजेत. त्यांच्यामुळे आज महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करीत आहे. त्यांच्या बलिदानाची आपण आठवण ठेवली पाहिजे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री श्री अशोकराव चव्हाण उपस्थित आहेत. त्यांचे वडील कै.शंकरराव चव्हाण हेमुख्यमंत्री असतांना वरील प्रमाणे सागितले होते तेव्हा मा श्री अशोक चव्हाण

3..



VTG/ KTG/ SBT/ D/ ST/ प्रथम श्री.भारवि 12.30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांनी ती बाब अंमलात आणण्याच्या बाबतीत आजच घोषणा केली तर ते औचित्याला धरुन होईल. आणि आपल्या वडिलांनी जो शब्द दिला होता त्याचाही सन्मान होईल. योगायोगाने माननीय मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण या ठिकाणी हजर आहेत तेव्हा या सुवर्ण महोत्सवी वर्षात ज्यांच्यामुळे आम्ही आजचा दिवस पहात आहोत त्यांना सन्मानित करावे व त्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी करावी अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : माजलगाव (जि.बीड)शहरात दूषित पाण्यामुळे उद्‌भवलेली गॅस्ट्रोची साथ

मु.शी. : माजलगाव (जि.बीड) शहरात दूषित पाण्यामुळे उद्‌भवलेली गॅस्ट्रोच्या साथी बाबत श्री जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्‌खाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आह,त्यांनी ती मांडावी

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" माजलगाव (जि.बीड) शहरातील अनेक भागात नगरालिकेकडून पाणीपुरवठा करीत आहे सदर पाणी हे दूषित असल्यामुळे शहरात गॅस्ट्रोची साथ सुरु आहे. तसेच या भागातील आझादनगर,भीमनगर, सन्मित्र कॉलनीसह अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटलेल्या असून या जलवाहिनीन्यातून सांडपाण्याच्या नालीतील घाण येत असल्याने पाणी मोठया प्रमाणात दूषित झालेले आहे.

शहरातील सुमारे 100 लोकांना या दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची लागण झाल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलेले आहे.

शहरात एवढया मोठया प्रमाणात गॅस्टोची साथ सुरु असतांना पालिकेचे मुख्याधिकारी हे कार्यालयीन वेळेत उपस्थित न राहता त्यांचे वास्तव्य बीड शहरातच आहे.

माजलगाव शहरात नगरपालिकेकडून सर्वत्र नवीन जलवाहिनीचे काम अद्यापपर्यत सुरु करण्यात आलेले नाही व पाणी शुध्द करण्यासाठी औषधांचा वापर केलेला नाही यामुळे येथील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

---------

नंतर श्री.सरफरे

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे-बेंगलोर महामार्गावरील खंबाटकी घाटामध्ये वारंवार होत असलेले अपघात

**मु.शी.**: पुणे-बेंगलोर महामार्गावरील खंबाटकी घाटामध्ये वारंवार होत असलेले अपघात याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय,"पुणे-बेंगलोर या महामार्गावरील खंबाटकी घाट हा प्रवाशांसाठी अतिशय धोकादायक बनला आहे. 15 दिवसामध्ये या खंबाटकी घाटात आणि कात्रजच्या भागात व परिसरात अनेक प्रकारचे अपघात झाले. या अपघातामध्ये अनेक प्रवाश्यांचा मृत्यू होऊन अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले. महामार्गावरील या खंबाटकी घाटामध्ये वारंवार अपघात घडण्याचे प्रकार दिवसें दिवस वाढत आहेत. याकडे वहातूक पोलीस आणि आर.टी.ओ. यांचे दुर्लक्ष होत आहे. त्याठिकाणी गेल्या दहा दिवसापूर्वी सातारा जिल्हयामध्ये नीता ट्रॅव्हल्स या बसवर दरोडा घालण्यात आला. त्याचप्रमाणे लूटमार करण्याचे व खून करण्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहेत.. या सर्व गोष्टींना आळा घालणे अतिशय महत्वाचे असल्यामुळे या एका महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: 26/11 च्या हल्ल्यात अतुलनीय कामगिरी केलेल्या पोलिसांना शौर्य पुरस्कारापासून वंचित ठेवणे

**मु.शी.**: 26/11 च्या हल्ल्यात अतुलनीय कामगिरी केलेल्या पोलिसांना शौर्य पुरस्कारापासून वंचित ठेवणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, अतुलनीय कामगिरी करुनही 26 जानेवारीला दिल्या जाणाऱ्या राष्ट्रपती पदकांच्या यादीत 15 पोलिसांची नावे नसल्यामुळे पोलीस दलातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. 26 नोव्हेंबरच्या हल्ल्यात अनेक पोलीस जखमी झाले होते. यातील 15 पोलिसांना गेल्या वर्षी म्हणजेच 15 ऑगस्ट, 2009 ला शौर्य पुरस्काराने गौरविण्यात येणार होते. परंतु प्रस्ताव पाठविण्यास उशीर झाल्याने पोलिसांना शौर्य पुरस्काराने गौरविले गेले नाही. या सर्व प्रक्रियेस चार महिने उलटून गेले आहेत. शौर्य पुरस्काराचा देखील प्रत्येक राज्याकरिता एक आरक्षण कोटा असतो. महाराष्ट्र राज्याकरिता 34 पोलिसांचा कोटा आहे परंतु 100 पोलिसांची यादी शौर्य पुरस्काराकरिता पाठविण्यात आली होती. या अत्यंत गंभीर व अति महत्वाच्या विषयाबाबत मी विशेष उल्लेखांची सूचना उपस्थित करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे जिल्हयातील तीन महानगरपालिकांसाठी वेगवेगळे तहसील कार्यालय सुरु करणे

**मु.शी.**: ठाणे जिल्हयातील तीन महानगरपालिकांसाठी वेगवेगळे तहसील कार्यालय सुरु करणे याबाबत श्री. सुभाष भोईर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष भोईर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष भोईर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडीत असतांना आदरणीय मुख्यमंत्री व माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

"ठाणें जिल्हयाच्या विभाजनासंदर्भात निवेदने, धडक मोर्चे, उपोषण, सत्याग्रह तथा अनेकविध अहिंसक मार्गाने जिल्हयातील जनता मागील 18 वर्षापासून आंदोलन करीत आहे. परंतु शासनाकडून प्रकरणी दुर्लक्षच होत आहे. सन 2001 च्या खानेसुमारीनुसार जिल्हयाची लोकसंख्या 81,28,833 होती व आता ती दुप्पटीने वाढली आहे. व त्यामुळे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर कामाचा भार दिवसें दिवस वाढतच चालला आहे. व जिल्हयाच्या विकासाच्या कामाचा खोळंबा होत आहे. याच अनुषंगाने मी असेही मांडू इच्छितो की, संपूर्ण ठाणे जिल्हयात 24 आमदार आहेत. तथा फक्त ठाणे तालुक्यात साडे सात आमदार आहेत. तसेच ठाणे तहसील कार्यालयाअंतर्गत 1) ठाणे मनपा 2) नवीन मुंबई मनपा 3) मीरा-भाईंदर महानगरपालिका अशा तीन महानगरपालिका ज्यांची लोकसंख्या 50 लाखाच्या वर गेली आहे. प्रचलित नियमानुसार तालुकानिहाय तहसीलदार कार्यालय असल्यामुळे या तिन्ही महानगरपालिका एकाच तहसील कार्यालयाच्या कक्षेत येतात व त्यामुळे जनतेच्या कामाच्या दृष्टीने फारच गैरसोय होत आहे व त्यामुळे या तिन्ही महानगरपालिकेतील जनता फार हवालदिल झाली आहे. व म्हणून विभाजनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत या तिन्ही महानगरपालिकांसाठी वेगवेगळे तहसील कार्यालय देण्यात यावे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बदलापूर येथील शाळांमधून भरमसाठ शैक्षणिक फीची आकारणी करणे

**मु.शी.**: बदलापूर येथील शाळांमधून भरमसाठ शैक्षणिक फीची आकारणी करणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधरे) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, मुंबईमधील शाळांमध्ये इयत्ता 5 वीची फी पाच रुपये असणे, तसेच 10 वीची शैक्षणिक फी दहा रुपये असणे, मुंबईतील माध्यमिक शिक्षण हे मुंबई इतरेतर भागांपेक्षा स्वस्त असणे, परंतु मुंबईजवळ सुमारे 60 कि.मी. अंतरावर असलेल्या बदलापूर येथील शाळांची शैक्षणिक फी मात्र 500 रुपये ते 600 रुपये असणे, इंडियन एज्युकेशन सोसायटीचे कात्रप विद्यालय, फातिमा हायस्कूल व डॉन बॉस्को व अन्य या शाळा बदलापूर याठिकाणी शैक्षणिक फी जादा घेणे, त्यामुळे शैक्षणिक फीमध्येही दुजाभाव होणे, शिक्षण स्वस्त होण्याऐवजी महाग झाल्याने याचा त्रास विद्यार्थी व पालकांना होणे. सदर विषय अति महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहामध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करु इच्छितो.

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:40

**पृ.शी.**: प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षण या विषयाचे पुनर्जीवन करणे

**मु.शी.**: प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षण या विषयाचे पुनर्जीवन करणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी आर्थिक ताण नसलेल्या, पण गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. आपल्या राज्यात गेल्या पंधरा वर्षापासून प्राथमिक व माध्यमिक शाळांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा यासाठी मूल्यशिक्षण हा विषय शिकविला जातो. हा विषय 100 गुणांचा असून सप्ताहात सहा तासिकांमधून दहा मूल्यांच्या सहाय्याने शिकविला जात होता व आहे. या विषयाचे सर्व स्तरातून उत्स्फूर्त स्वागत झाले होते.

दरम्यान गेल्या काही वर्षापासून मूल्यशिक्षण या विषयाच्या काही तासिका काढून घेऊन इतर विषयाला दिल्या आहेत. तसेच दहा मूल्ये एवढाच अभ्यासक्रम न ठेवता त्याचा फेरविचार करावा व वयोगटानुसार फेरमांडणी व्हावी, असे असताना केवळ उपचारापुरता हा विषय आता अभ्यासक्रमात राहिला असून सकाळी प्रार्थनेच्या वेळी सुरु असलेल्या परिपाठापुरताच राहिला आहे. वाढती व्यसनाग्रस्तता,आतंकवाद, नक्षलवाद, विषमता, फुटीरवाद, चंगळवाद, नैतिक अध:पतन, जातीयवाद, भ्रष्टाचार इत्यादी सामाजिक समस्यांपासून नवीन निढीची सुटका करण्यासाठी मूल्यशिक्षण या विषयाचे पुनर्जीवन करुन सुधारित स्वरुपात शिकविण्याची पूर्वतयारी येत्या शैक्षणिक वर्षापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश दिले जावेत अशी विनंती या विशेष उल्लेखाव्दारे माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि शासन या दोघांनाही करीत आहे."

----

. . . .झेड-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल प्राधिकरण तातडीने अस्तित्वात येणे

**मु.शी.**: महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल प्राधिकरण तातडीने अस्तिवात येणे याबाबत डॉ.वसंतराव पवार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल या प्राधिकरणाची निवडणूक दि.2 एप्रिल 2009 मध्ये होऊन एक वर्षानंतरही प्राधिकरण अस्तित्वात न येणे, त्यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांविरुध्द रुग्णांना तक्रार करण्यास वाव न मिळणे, 12 वर्षापासून ॲडहॉक प्राधिकरणानेच काम करणे, सन्माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाने दि.2 एप्रिल 2009 मध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निवडणूक घेणे, त्यामध्ये कायद्याप्रमाणे 9 सदस्य निवडून येणे, त्यांचे गॅझेट निघणे, परंतु शासनाने नियुक्त करावयाचे 5 सदस्य यांची नेमणूक न करणे, त्यामुळे त्यांचे प्राधिकरण होणेस विलंब, त्यामुळे रुग्णांनी डॉक्टरांविरुध्द केलेल्या कोणत्याही तक्रारींचे निवारण न होणे, सध्या अस्तित्वात असलेले प्राधिकरण कुचकामी ठरणे, सदर प्राधिकरणाकडून फक्त ॲक्रीडेशन व रजिस्टेशनची कामे होणे, त्यामुळे डॉक्टरांमध्ये त्याचप्रमाणे रुग्णांमध्ये निर्माण झालेला असंतोष, चिंतेचे वातावरण तसेच शासन नियुक्त 5 सदस्यांची तातडीने नियुक्ती करुन प्राधिकरण अस्तित्वात आणणेबाबत होत असलेली आग्रही मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल असे प्राधिकरण 1965 च्या कायद्यानुसार अस्तित्वात आलेले आहे. गेली 12 वर्षे त्या प्राधिकरणावर प्रशासक आहे. म्हणून काही डॉक्टर कोर्टामध्ये गेल्यानंतर,उच्च न्यायालयाच्या आदेशाने महाराष्ट्र सरकारने त्याठिकाणी निवडणूक घेतली.दिनांक 02 एप्रिल 2009 रोजी त्याची निवडणूक झाली आणि दिनांक 02 मे 2009 रोजी निकाल लागला.हा निकाल लागल्यानंतर दिनांक 11 जूनला महाराष्ट्र शासनाने गॅझेट देखील प्रसिध्द केले आणि जे 9 सदस्य निवडून येणार आहेत,त्यांची नावे गॅझेटमध्ये प्रसिध्द

. . . .झेड-3



APR/ D/ KTG/ 12:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाली. परंतु शासनाने 4 मेडिकल व 1 नॉन मेडिकल अशा 5 सदस्यांची नेमणूक करावयाची आहे. यासाठी विलंब झाल्यामुळे एकतर या प्राधिकरणाचे काम हे सर्व डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन करण्याचे आहे आणि त्याचबरोबर सर्व रुग्णांच्या ज्या तक्रारी आहेत, त्या तक्रारींची सुध्दा सुनावणी करुन, त्यांना योग्य तो न्याय आणि डॉक्टरांच्या ज्या निग्लिजन्स्च्या केसेस असतील, त्यांना शिक्षा सुनविण्याचे काम याठिकाणी प्राधिकरणाकडे आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना त्याठिकाणी तक्रार करता येत नाही. जरी रजिस्ट्रेशनचे काम सुरु असले तरी तक्रार निवारण्याचे काम त्याठिकाणी होत नाही. म्हणून मी या विशेष उल्लेखाव्दारे सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो की, या रुग्णांमध्ये जो काही असंतोष निर्माण झाला आहे आणि त्याचबरोबर डॉक्टरांची निवडणूक घेतल्यानंतरही प्राधिकरण अस्तित्वात आलेले नाही. तरी त्वरित प्राधिकरण अस्तित्वात आणावे आणि त्यांना 1965 च्या कायद्याप्रमाणे काम करु द्यावे, जेणेकरुन पुढे 29 क्रमांकाचे जे बिल मांडण्यात येणार आहे त्यानुसार हे प्राधिकरण चांगल्या प्रकारे काम करु शकेल अशा प्रकारची सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

---

. . . .झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: विदर्भ पाटबंधारे मंडळाकडून होत असलेला मनमानी

कारभार

**मु.शी.**: विदर्भ पाटबंधारे मंडळाकडून होत असलेला मनमानी कारभार याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो आणि आपल्या माध्यमातून सभागृहाचे आणि माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

"विदर्भामध्ये पाटबंधारे प्रकल्पाची जी विविध कामे आतापर्यंत झालेली आहेत, त्या कामाचे तसेच भूसंपादनाचे सुमारे 3 हजार कोटी रुपये देणे बाकी आहे. जल आणि नियोजन आयोगाने गोसीखूर्द प्रकल्पाची कामे टप्याटप्याने करण्याचे व त्यासाठी सन 2009 ते 2014 या पाच वर्षाच्या कालावधीत प्रत्येक वर्षी 1000 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहेत. परंतु असे असताना विदर्भ पाटबंधारे महामंडळाने सन 2013 मध्ये करावयाच्या असोलमेंडा व गोसीखूर्द प्रकल्पाचा भाग असलेल्या कामासाठी निविदा काढलेल्या आहेत. पुढील पाच वर्षात जी कामे करावयाची आहेत, त्या कामाच्या निविदा चढ्या भावाने काढलेल्या आहेत. जल आयोगाच्या शिफारशीनुसार एखाद्या कालव्याचे बांधकाम झाल्यानंतर दोन-तीन वर्षानंतर आवरणाचे काम करता येते. परंतु विदर्भ पाटबंधारे महामंडळाने यासाठी घाईघाईने निविदा मागविल्या व ते काम पूर्ण केले. त्यामुळे कालव्याच्या मजबुतीकरणावर परिणाम होऊन आवरणाला भेगा पडलेल्या आहेत. या भेगा बुजविण्यासाठी विदर्भ पाटबंधारे मंडळाने पुन्हा निविदा मागविलेल्या आहेत. अशा प्रकारे याठिकाणी मनमानी कारभार सुरु आहे व शासकीय निधीचा अपव्यय होत आहे म्हणून मी विशेष उल्लेखाव्दारे ही बाब याठिकाणी उपस्थित करु इच्छितो.

----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात खरीप हंगाम अगदी जवळ असताना निर्माण झालेला बियाणांचा तुटवडा.

**मु. शी.** : राज्यात खरीप हंगाम अगदी जवळ असताना निर्माण झालेला बियाणांचा तुटवडा याबाबत श्री.गोपीकिसन बाजोरिया वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.गोपीकिसन बाजोरिया ( स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "राज्यात खरीप हंगाम अगदी जवळ एक ते दीड महिन्यावर आला असतांना निर्माण झालेला बियाणांचा तुटवडा, त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, कृषि आयुक्तांडकून अद्यापपर्यंत बी.टी. कॉटनला परवानगी देण्यात न येणे, तसेच गेल्या दोन वर्षापासून नवीन वाण तयार असूनही त्यासही परवानगी देण्यात न येणे, बी.टी.कॉटनला तसेच नवीण वाणाला परवानगी देण्याचे अधिकार पूर्वी कृषि संचालक मंडळाकडे असतांना कृषि आयुक्त यांनी हे सर्व अधिकार आपल्याकडे घेऊन निर्णय घेणे, परिणामी कृषि विभागाचे अधिकारी निर्णय घेण्यास हतबल होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, माननीय कृषि मंत्रिमहोदयांनी याकडे गांभीर्याने पाहण्यासाठी तसेच खरीप हंगाम आता जवळच येत असल्यामुळे या गंभीर विषयावर निर्णय होणे गरजेचे असल्यामुळे मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय सेवेत असलेल्या अविवाहित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आईवडिलांना निवृत्ती वेतन,स्वग्राम रजा सवलत व वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणे

**मु. शी.** : शासकीय सेवेतील अविवाहित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आईवडिलांना निवृत्ती वेतन,स्वग्राम रजा सवलत व वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

राज्यात शासकीय सेवेत असलेल्या अविवाहित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना ते अधिकारी व कर्मचारी शासकीय सेवेत काम करत असताना मृत्युमुखी पडल्यास त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या आईवडिलांना निवृत्ती वेतन देण्यात येत नसणे, विवाहित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन देण्यात येत असणे, तसेच अविवाहित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुज्ञेय नसलेले इतर लाभ उदा. त्यांचे आईवडिलांना स्वग्राम रजा सवलतीचा लाभ मिळत नसणे, ही सवलत विवाहित अधिकारी/कर्मचाऱ्यांना मिळत असणे, ही सवलत सध्या केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू होत असणे, परंतु राज्य शासनाने ही सवलत त्यांच्या अविवाहित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या आई-वडिलांना न देणे, त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे केंद्र शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतीपूर्ती मिळते त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या निवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देण्यात येत नाही. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत

**उपसभापती** : आता नियम 93 अन्वयेची निवेदने चर्चेला घेण्यात येतील. याबाबतीत मला दोन पत्रे प्राप्त झालेली आहेत. एक पत्र माननीय राज्यमंत्री श्री. रमेश बागवे यांच्याकडून आलेले आहे. सदर पत्रात त्यांनी असे म्हटलेले आहे की, "विधानसभेमध्ये स्थगन प्रस्तावावरील निवेदन मला करावयाचे आहे" त्यामुळे त्या विभागाशी सबंधित निवेदने शेवटी चर्चेला घेण्यात येतील.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, गृहराज्य मंत्र्यांच्या निवेदनांचा क्रम बदलण्यात यावा व त्यांची निवेदने शेवटी घेण्यात यावीत.

**उपसभापती** : दुसरे पत्र माननीय मंत्रिमहोदय श्री. सचिन अहिर यांचे आहे. ते देखील विधानसभेत कामकाजामध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे आता गृहनिर्माण विभागावरील निवेदने क्रमांक 6,8,12,16 व 17 चर्चेला घेण्यात येतील.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची उत्तरे मी देणार आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोयना धरणामुळे बाधित झालेल्या विस्थापितांना बाळगंगा धरण प्रकल्पामुळे पुनर्विस्थापनाला सामोरे जावे लागणे

**मु. शी.** : कोयना धरणामुळे बाधित झालेल्या विस्थापितांना बाळगंगा धरण प्रकल्पामुळे पुनर्विस्थापनाला सामोर जावे लागणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नारायण राणे( महसूल व खार जमीन मंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कोयना धरणामुळे बाधित झालेल्या विस्थापितांना बाळगंगा धरण प्रकल्पामुळे पुनर्विस्थापनाला सामोरे जावे लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोयना धरणामुळे विस्थापित झालेले लोक बाळगंगा नदीच्या परिसरामध्ये जेथे आता धरण होत आहे तेथे राहात होते आता परत त्यांना तेथून विस्थापित होण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी त्यांचे प्रचंड आंदोलन चालू आहे. माननीय मंत्रिमहोदय नारायण राणे विरोधी पक्षात होते त्यावेळी ते धरणग्रस्तांच्या प्रश्नाच्या बाबतीत आग्रही भूमिका मांडत होते. ते या धरणग्रस्तांना न्याय देतील अशी आमची अपेक्षा आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सिडकोच्या बाळगंगा प्रकल्पातील पाण्यासाठी यापूर्वी आंदोलने सुरु होती. तेथील सर्व आंदोलकांना, नागरिकांना मी स्वत: बोलाऊन घेऊन त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांना आवश्यक असलेल्या जमिनीच्या भावाबाबत त्यांची जी मागणी होती त्याचा शासनाने विचार केला आहे आणि त्यानुसार त्यांना भाव वाढवून देण्याचा निर्णय सरकार लवकरच घेत आहे. त्यांचे जे पुनर्वसन आहे ते चांगल्या दर्जाचे करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. त्यासाठी शासनाने आवश्यक तो निधी उपलब्धही केलेला आहे. त्यांची कोणतीही तक्रार राहाणार नाही अशा प्रकारे त्यांचे पुनर्वसन केले जाईल आणि त्यांना घरे दिली जातील.

....

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वरळी कोळीवाड्याच्या मूळ गावकऱ्यांच्या मालकी हक्कावर गदा आणण्याचा होत असलेला प्रयत्न

**मु. शी.** : वरळी कोळीवाड्याच्या मूळ गावकऱ्यांच्या मालकी हक्कावर गदा आणण्याचा होत असलेला प्रयत्न याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अशोक चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी "वरळी कोळीवाड्याच्या मूळ गावकऱ्यांच्या मालकी हक्कावर गदा आणण्याचा होत असलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या निवेदनामध्ये थोडी विसंगत माहिती आलेली आहे त्याकडे मी माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. कोळीवाड्यांच्या हक्कांवर गदा येऊ नये यासाठी मी ही नियम 93 अन्वये सूचना दिली होती. 3 डिसेंबर, 1925 रोजी ब्रिटिशांनी आणि त्यावेळच्या नगरपालिकेने ठराव करुन वरळी कोळीवाड्याकडून कोणताही प्रॉपर्टी टॅक्स घेतला जाणार नाही अशा पध्दतीचा निर्णय घेतलेला होता. तेव्हापासून आजतागायत मुंबई महानगरपालिका सुध्दा प्रॉपर्टी टॅक्स घेत नाही. यामध्ये दुसरी विसंगती अशी आहे की, कोळीवाड्याने पुरावे दिले नाहीत असे म्हटले आहे. कोळीवाड्याच्या जमात कमिटीने 23 फेब्रुवारीच्या बैठकीमध्ये 160 पानी पुरावे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. निवेदनामध्ये पुरावे दिले नाहीत असे म्हटले आहे. तिसरा मुद्दा असा की, त्या ठिकाणी झोपडपट्टी आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. माहितीच्या अधिकारात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने असे स्पष्टपणे म्हटले आहे की, भूखंड क्रमांक 991 हे क्षेत्र इ ोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित झाल्याचे दिसून येत नाही. असे स्पष्ट पत्र 11.2.2009 ला दिलेले आहे. या तीनही बाबी लक्षात घेऊन हा कोळीवाडा त्या कोळीवाड्याच्याच ताब्यात राहील, त्यावर इतर कोणतीही अतिक्रमणे येणार नाहीत, त्यांचा हक्क शाबीत राहील याची ग्वाही माननीय मुख्यमंत्री देणार काय ? या कोळीवाड्याच्या विकासासाठी त्यांनी जी योजना आपल्याकडे सादर केलेली आहे त्यासाठी आपण स्वत: बैठक घेऊन त्यांना आश्वासित करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, नऊपाटील जमात आणि या क्षेत्रातील जे गावकरी वगैरे आहेत त्यांच्या कोळीवाड्याच्या जागेच्या मालकी हक्कासंबंधी काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेले आहेत. त्या ठिकाणी या कोळी जमातीने 700 वर्षापूर्वीचे पुरावे आहेत असे नमूद केलेले आहे. सध्या जिल्हाधिकाऱ्यांसमोर प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे. पुरावे सिध्द झाल्यास काही अडचण येणार नाही. त्या भागाचे व्यवस्थित पुनर्वसन व्हावे, त्या ठिकाणी पुनर्वसनाच्या योजना राबविण्याच्या बाबतीत किंवा एस.आर.ए. च्या अंतर्गत त्या भागाच्या विकासासाठी जे काही करणे अपेक्षित आहे याबाबतचा प्रश्न आहे. यामध्ये सुध्दा तक्रारी आल्या.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी जी झोपडपट्टी आहे ती रस्त्यावर आहे. त्या भूखंडावर झोपडपट्टी घोषित केलेली नाही अशी माहिती माहितीच्या अधिकाराखाली दिलेली आहे. अधिकारी आपल्याला अडचणीत आणत आहेत. आपण याबाबत बैठक घ्यावी.

श्री. अशोक चव्हाण : बैठकीच्या ऐवजी जागेचे पुरावे महत्वाचे आहेत. ही जागा नेमकी कोणाच्या मालकीची आहे ? जुन्या 700 वर्षापूर्वीच्या पुराव्याबाबत आपण सांगत आहात ते तपासावे लागेल. जिल्हाधिकाऱ्यांकडे आतापर्यंत तीन वेळा सुनावण्या झालेल्या आहेत. त्याबाबतची पूर्ण सुनावणी होऊ द्यावी. कागदोपत्री रेकॉर्डवरुन जे काही सिध्द होईल त्याबाबत शासनाची सकारात्मक भूमिका राहणार आहे. मध्ये स्थगिती दिली होती नंतर विभागाने जी माहिती सादर केली ती योग्य असल्याची माहिती त्यांनी दिलेली आहे आणि त्या माहितीच्या आधारे स्थगिती उठवावी लागली. वारंवार स्थगिती देणे आणि उठविणे उचित होणार नाही. म्हणून सुनावणी पूर्ण होऊ द्या त्यानंतर पुढचा निर्णय घेता येईल.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

**पृ. शी.** : आदिवासी मुलींनी हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करुनही त्यांना हवाई सुंदरी म्हणून सेवेत सामावून घेण्यात न येणे

**मु. शी.** : आदिवासी मुलींनी हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करुनही त्यांना हवाई सुंदरी म्हणून सेवेत सामावून घेण्यात न येणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. पद्माकर वळवी ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "आदिवासी मुलींनी हवाई प्रशिक्षण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण करुनही त्यांना हवाई सुंदरी म्हणून सेवेत सामावून घेण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. सुधारित निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, महत्वाची बाब अशी आहे की, काल हे निवेदन राखून ठेवले होते आणि आज सुधारित निवेदन आलेले आहे. कालचे उत्तर शासनाने बदललेले आहे आणि आज दुसरे उत्तर दिलेले आहे. परंतु कालही मी असे म्हटले होते की, हे जे उत्तर आहे ते पूर्ण आदिवासी समाजाचा अवमान करणारे आहे. श्री. प्रफुल्ल पटेल यांचे वक्तव्य लोकमत वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या आदिवासी मुली आहेत त्या सुंदर नसतात, त्या गावंढळ असतात, त्यांना इंग्रजी बोलता येत नाही, त्यांची उंची आणि वजन कमी पडते त्यामुळे त्यांना हवाई सुंदरी म्हणून घेता येणार नाही. अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात आली होती. या ठिकाणी काल लेखी निवेदन आले होते आणि आज शासनाने निवेदन बदललेले आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांचे नाव घेतलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी वृत्तपत्राच्या आधारे वक्तव्य केलेले आहे. सन्माननीय श्री.प्रफुल्ल पटेल या सभागृहाचे सदस्य नसल्यामुळे त्यांना उत्तर देण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे त्यांच्या विषयी सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कालच्या निवेदनात त्यांचे नाव आलेले आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आज सुधारित निवेदन सादर केलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, केंद्रीय मंत्र्यांनी आदिवासींचा अवमान केल्यामुळे त्यांनी माफी मागितली पाहिजे.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आज नियम 93 वरील एकूण 25 निवेदने आलेली आहेत. ती आपल्याला वेळेवर संपवावयाची आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर द्यावे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, काल जे निवेदन वितरित केले होते त्यात सुधारणा करुन आज वितरित करण्यात आलेले आहे. कालच्या निवेदनात श्री.प्रफुल्ल पटेल यांचे नाव आले होते. कालच्या निवेदनामध्ये शासनाने चुकीचे उत्तर दिलेले आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की, "तथापि, आदिवासी मुलांची पार्श्वभूमी ग्रामीण भागाची असल्याने त्यांना या क्षेत्रात नोकरी मिळण्यासाठी अस्खलित इंग्रजी भाषा येत नसल्यामुळे अडचणी येतात. त्याशिवाय शारीरिक उंची, वजन व इतर व्यवसायिक स्वरुपाचे शिष्टाचार" आदिवासी हा माणूस आहे, ढोर नाही. आदिवासींना शिष्टाचार समजत नाही हे शासनाला कोणी सांगितले ? त्यामुळे शासनाने यासंबंधी माफी मागितली पाहिजे. आदिवासी मुलामुलींना गावंढळ असे संबोधत असाल तर त्यासाठी प्रथम माफी मागावी आणि त्यानंतर उत्तर द्यावे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, कालचे जे स्टेटमेंट होते ते वादग्रस्त होते. त्यामुळे आज सुधारित उत्तर दिलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय मंत्री महोदय, आदिवासी समाजाचे आहेत, त्यामुळे निवेदनामध्ये जे नमूद केले होते त्यांना मान्य आहे काय ते सांगावे.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, कालच्या निवदेनातील शब्दांविषयी मी दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, शासनाने 97 आदिवासी मुलामुलींना प्रशिक्षण दिले होते. ते सगळे उमेदवार उत्तीर्ण झाले. परंतु त्यापैकी केवळ 5 जणांना नोकरीत सामावून घेतले आहे. उर्वरित मुलामुलींना नोकरी मिळालेली नाही, त्यामुळे त्यांनी घेतलेले प्रशिक्षण व्यर्थ जाणार आहे. उर्वरित मुलामुलींना हॉटेल व्यवस्थापन, हवाई सुंदरी, वाहतूक व्यवस्थापन यामध्ये शासन किती दिवसात सामावून घेणार आहे ? या मुलामुलींच्या प्रशिक्षणासाठी 1 कोटी रुपये खर्च केला आहे. या आदिवासी तालुक्यातील मुलांना कोर्सेसची माहिती नसते. ठाणे जिल्हयामध्ये असे अनेक तालुके आहेत. या कोर्सेसच्या व्यतिरिक्त जे कोर्सेस आहेत त्याची माहिती त्यांना करुन देण्यासाठी शासन योजना आखणार आहे काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना विमान सेवेत हवाई सुंदरी, हॉटेल व्यवस्थापन, वाहतूक व पर्यटन व्यवस्थापन या क्षेत्रासाठी एक वर्षाचे प्रशिक्षण देण्याची योजना होती. या योजनेंतर्गत सन 2006-07 मध्ये 1 कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत 100 प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यापैकी 37 विद्यार्थ्यांना नोक-या लागल्या आहेत. सभापती महोदय, या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे व त्यांच्यात क्षमता निर्माण करणे हे विभागाचे काम आहे. आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार प्रशिक्षण दिलेले आहे. या उमेदवारांना नोकरी देण्याची प्रक्रिया सुरु होईल. सध्या 37 विद्यार्थ्यांना नोकरी मिळालेली आहे. आदिवासी विकास विभाग उर्वरित विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करणार नाही. त्यांना वेगळया विभागामध्ये नोक-या कशा देता येतील, त्यासाठी कोठे ॲप्रोच व्हावे लागेल यादृष्टीकोनातून आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रयत्न करतील.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पद्माकर वळवी...

सन्माननीय सदस्यांनी आदिवासींना योजनांची माहिती देण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. आदिवासींसाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती प्रत्येक प्रकल्पस्तरावर आणि वृत्तपत्राच्या माध्यमातून देण्यात येते. आमच्याकडे फार मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त झालेले आहेत. यावरुन योजनाची जाहिरात दिलेली आहे आणि आदिवासींना योजना माहीत झालेल्या आहेत हे सिध्द होते. योजनांची अमलबजावणी करणा-या यंत्रणेमध्ये त्रुटी असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ही यंत्रणा सुधारण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण शासकीय तंत्रनिकेतनामध्ये काम करणा-या कंत्राटी अधिव्याख्यात्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेणे

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण शासकीय तंत्रनिकेतनामध्ये काम करणा-या कंत्राटी अधिव्याख्यात्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेणे याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

प्रा. वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण शासकीय तंत्रनिकेतनामध्ये काम करणा-या कंत्राटी अधिव्याख्यात्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : हे कंत्राटी अधिव्याख्याते 2003 सालापासून काम करीत आहेत. यांना नियमित केल्यास आयोगाकडून शिफारस झालेल्या उमेदवारांकडून न्यायालयीन प्रकरण उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. याबाबतीत ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतलेले आहे काय ? या कंत्राटी अधिव्याख्यात्यांना न्याय देण्याच्या बाबतीत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : 10 एप्रिल 2005च्या उमादेवी विरुध्द कर्नाटक शासन या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने बॅकडोअर एण्ट्री अलाऊड नाही, असा निर्णय दिलेला आहे. या बाबतीत ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतलेले आहेत. विधी व न्याय विभागाचेही मत घेतलेले आहे. त्यानीही हेच सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार बॅक डोअर एण्ट्री अलाऊड नाही.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : शिवणगांव फाटा, वर्धा रोड नागपूर येथील शांतीनिकेतन

ज्ञानपीठ कॉन्व्हेण्ट शाळेच्या व्यवस्थापनाने बदलेली शाळेची वेळ

**मु.शी.** : शिवणगांव फाटा, वर्धा रोड नागपूर येथील शांतीनिकेतन ज्ञानपीठ कॉन्व्हेण्ट शाळेच्या व्यवस्थापनाने बदलेली शाळेची वेळ याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री)) : सभापती महोदय, श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "शिवणगांव फाटा, वर्धा रोड, नागपूर येथील शांतीनिकेतन ज्ञानपीठ कॉनव्हेण्ट शाळेच्या व्यवस्थापनाने बदललेली शाळेची वेळ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. रामनाथ मोते : शिवणगांव फाटा, वर्धा रोड नागपूर येथील शांतीनिकेतन ज्ञानपीठ कॉन्व्हेंट शाळेच्या व्यवस्थापनाने शाळेच्या वेळेमध्ये बदल केल्याप्रकरणी माननीय मंत्री महोदयांनी

संबंधित शिक्षणाधिका-यांना निर्देश दिले आणि शाळेची वेळ पूर्ववत करण्याच्या सूचना दिल्या याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, ग्रामीण भागातील विद्यार्थी या शाळेमध्ये शिकतात. भविष्यामध्ये पुनश्च शाळेच्या व्यवस्थापनाकडून वेळ बदलण्यासंबंधीचा प्रस्ताव येण्याची शक्यता आहे. म्हणून विद्यार्थ्यांची आणि पालकांची गैरसोय होणार असेल तर ती वेळ बदलण्यास शासन परवानगी न देण्याची भूमिका घेईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : पालक आणि शिक्षक संघाच्या संमती शिवाय वेळ बदलण्याची परवानगी देता येणार नाही.

----

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभाग
कार्यालयात होत असलेला गैरव्यवहार

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयात होत असलेला गैरव्यवहार याबाबत ॲड. अनिल परब, सर्वश्री. परशुराम उपरकर व किरण पावसकर, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, ॲड. अनिल परब,सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपप्रादेशिक परिवहन विभाग कार्यालयात होत असलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. परशुराम उपरकर :48 वाहनांपैकी 38 वाहनांवर टु पॉईंट कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी 76 हजार रु. इतका दंड वसूल केलेला आहे. याबाबतीत मी स्वत: तक्रार केली.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ 13:05

श्री.परशुराम उपरकर...... निवेदन क्रमांक..4.....

गोवा राज्यातील, कर्नाटक राज्यातील वाहने सिंधुदुर्ग जिल्हयात येत असतात. रेड्डी येथून कळणे अशी टू पॉईंट वाहतूक करतात. त्या वाहनांवर कठोर कारवाई केली जाईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, प्रामुख्याने टू पॉईंट वाहतूक ही नियमानुसार होत असते. काही वाहने परराज्यातून आपल्या राज्यात येतात. याबाबतीत नियम असा आहे की, गोव्याहून आलेल्या वाहनांना माल वाहतूक करण्यासाठी तात्पुरता परवाना आपल्या राज्याकडून दिला जातो. त्यांनी या राज्यातून गोवा राज्यामध्ये माल नेण्याचे काम करावे हा एक नियम आहे. पॉईंट टूच्या संदर्भात राज्यातील राज्यात त्यांनी माल वाहतूक करण्यास परवानगी घेतल्यानंतर स्थानिक ठिकाणी वाहतूक केली पाहिजे असा एक नियम आहे. या संदर्भात तात्पुरता परवाना दिला जातो, त्यांच्याकडून टॅक्स सुध्दा वसूल केला जातो. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात जवळपास 48 वाहनांकडून जादा माल वाहतूक करीत असल्यामुळे दंड वसूल केला आहे. सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली असली तरी आमचे काम रेग्युलर चाललेले आहे......(अडथळा).. 2009 पासून 31 मार्च, 2010 पर्यंत गोवा राज्यातील 48 वाहनांवर कारवाई करुन 3,63,500 रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. लोड बॉडीपेक्षा जादा माल वाहतूक करणाऱ्या 17 वाहनांकडून 8500 रुपये दंड वसूल केला आहे. लोड बॉडी आच्छादन न केलेल्या वाहनांकडून 2200 रुपये दंड वसूल केला आहे. ही सर्व वाहने टू पॉईंटमध्ये वाहतूक करणारी आहेत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, फक्त 17 वाहनांवर कारवाई केली आहे?

**उपसभापती** : मी हात जोडून सभागृहाला विनंती करीत आहे. एका निवेदनावर एकच उपप्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल हे मी यापूर्वीच सांगितले आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे. मी तक्रार दिल्यानंतर कारवाई सुरु झाली का?

**उपसभापती** : मंत्रीमहोदयांनी सांगावे की, सन्माननीय सदस्यांनी तक्रार केल्यानंतर कारवाई करण्यात आली.

श्री.रामदास कदम : माननीय सभापती महोदय, एक प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

श्री.परशुराम उपरकर : आम्ही प्रश्न विचारण्यासाठी सभागृहात येत असतो.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो म्हणून त्यांना प्रश्न विचारण्याची अनुमती द्यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही आमची चूक आहे का? एकाच दिवशी नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदने मोठ्या प्रमाणात चर्चेला येतात, एकाच दिवशी मोठया प्रमाणात बिले दाखविली जातात. ही आमची चूक आहे का? शासनाला दोष देणार नाही का? अधिकारी एवढे दिवस काय करीत होते? आपण निदेश दिल्यानंतर सुध्दा निवेदने का सादर होत नाहीत?

श्री.रामदास कदम : अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे, तो आमचा हक्क आहे. तो अंतिम आठवडा प्रस्ताव देखील सभागृहात चर्चेला येत नाही?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी दुसरा उपप्रश्न विचारला तर मी सर्वच सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास संधी देईन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण चिडू नका. सरकारला सुध्दा सांगावे.

--------

..3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे पिंपळगाव राजा, ता.खामगाव, जि.बुलढाणा येथील गट क्र.170 मध्ये विनापरवाना वीटभट्टी सुरु असणे

**मु. शी.** : मौजे पिंपळगाव राजा, ता.खामगाव, जि.बुलढाणा येथील गट क्र.170 मध्ये विनापरवाना वीटभट्टी सुरु असणे याबाबत श्री पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "मौजे पिंपळगाव राजा, ता.खामगाव, जि.बुलढाणा येथील गट क्र.170 मध्ये विनापरवाना वीटभट्टी सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-5.......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनामध्ये नमूद केल्याप्रमाणे मौजे पिंपळगाव राजा, ता.खांमगाव, जि.बुलढाणा येथील शेत क्र.170 मध्ये विनापरवाना वीटभट्टी सुरु असल्याची तक्रार दि.5.11.2009 रोजी प्राप्त झाली....

नंतर 2एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.......

सदर तक्रारीची चौकशी नायब तहसीलदार, खामगांव यांनी केली असून त्या चौकशी अहवालात इम्रान खान शफाकत खान याने उपरोक्त 170 मधील 0.10 हेक्टरमध्ये विना रॉयल्टी 419.50 ब्रास माती व 60 हजार कच्च्या वीटा थापल्याचे आढळून आले. त्यानुसार त्यांचा वीट भट्टा जप्त करण्याची कारवाई करण्यात आली असारिपोर्ट आहे. अशा प्रकारे विनापरवाना वीट भट्टा सुरु झाल्यानंतर तक्रारी झाल्यातरी देखील तहसीदाराने या प्रकरणी लक्ष दिले नाही आणि नायब तहसीलदाराने माव 419.50 ब्रास माती आणि 60 हजार वीटा थापल्याचा अहवाल दिला आहे. तसेच उत्तरात विसंगती आहे ती म्हणजे दुसऱ्या परिच्छेदातमध्ये तहसीलदार, खामगांव यांनी सुनावणी घेण्याचे काम केले असे म्हटले आहे. अशा प्रकारे नायब तहसीलदाराने चौकशी अहवाल दिल्यानंतर ताबडतोब कारवाई करणे आवश्यक होते तरी देखील अशा प्रकारची सुनावणी करण्यात आली. नियमानुसार 13 लोकांवर यामध्ये दंड करण्याची आवश्यकता होती त्याऐवजी फक्त 36 हजार दंड करण्यात आला आणि त्यातही दंडाची माफी देऊन तो दोन हप्त्यात भरण्याची मुभा दिली व हा दंड माफ करण्याबाबत अपिलात जाण्यास सांगितले. तसेच अपिलाची सुनावणी होण्यापूर्वीच त्याला पुन्हा वीट भट्टा सुरु करण्याची परवानगी देण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी हा वीट भट्टा बंद करा म्हणून सांगितले असतानादेखील अशा प्रकारे विना परवाना भट्टा चालू करण्याची पुन्हा परवानगी देण्यात आली, या प्रकरणी खामगाव तहसीलदार जबाबदार आहेत. तसेच शासनाचे जे 13 लाखाच्या वर महसुलाचे नुकसान झाले त्यासंबंधीची कारवाई सुध्दा केली नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, शासनाचे मोठ्या प्रमाणात महसुलाचे नुकसान करण्यात आले, महसुलाची चोरी होत असताना अशा लोकांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? त्याचबरोबर खामगाव तहसीलदाराला शासन निलंबित करणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय सदस्यांनी कारवाईसंबंधी तसेच परवानगीसंबंधी अशा प्रकारे दोन प्रश्न विचारलेले आहेत. त्या अनुषंगाने मी असे सांगणार आहे की, श्री. इम्रान खान यांनी वीट भट्टयासाठी दि. 11.11.2009 रोजी परवानगी मिळावी म्हणून अर्ज दाखल केला होता. त्याबाबतीतील जाहिरनामा दि. 2.12.2009 रोजी प्रसिध्द करण्यात आला व त्यानंतर श्री. अलाऊत खान लतीफ खान यांचा हरकत अर्ज दि. 2 फेब्रुवारी रोजी मिळाला. यासंदर्भातील

......2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

चौकशी दि. 10 डिसेंबर, 2009 रोजी करण्यात आली व त्यानंतर पुन्हा तक्रारदार आणि 58 नागरिकांच्या हरकतीचा ठराव दि. 11.12.2009 रोजी सादर करण्यात आला. या सर्व प्रकरणांचा विचार करुन दि. 30.1.2010 च्या माध्यमातून चौकशी करुन दि. 10.2.2010 रोजी परवाना इश्यू करण्यात आला, अशा प्रकारे ही दोन्ही प्रकरणे वेगवेगळी आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, परवाना देताना निमांचे पालन केलेले नाही तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाचा ना हरकत दाखला सुध्दा घेतलेला नाही.

श्री. प्रकाश सोळंके : विना परवाना वीट भट्टयासंबंधीचा हरकतीचा अर्ज अगोदर आला होता म्हणून त्यांच्याकडून दंड वसूल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नायब तहसीलदाराने रिपोर्ट देतांना असे म्हटले आहे की, "या विटभट्टीवाल्याने विना परवाना, विना रॉयल्टीने 419.50 ब्रास माती व 60 हजार कच्च्या विटा थापल्याचे आढळून आल्यानंतर सदरहू माती व थापलेल्या विटांचा पंचनामा करुन त्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. इम्रान खाँ शफाखत खाँ यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करुन परवाना मंजूर होईपर्यंत विट भट्टी बंद ठेवून शासनाच्या अटी व शर्थीची पूर्तता करीत असल्यास". सभापती महोदय, इतका स्पष्ट अहवाल नायब तहसीलदाराने दिलेला असतांना संबंधितांना आपण केवळ 36 हजार रुपये दंड आकारलेला आहे. 419 ब्रासचा दंड आणि रॉयल्टी जमीन महसूल अधिनियमाप्रमाणे किती होते ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदरील इसम हा गेल्या दोन तीन वर्षापासून वीट भट्टीचा व्यवसाय करीत आहे. या ठिकाणी नायब तहसीलदाराने 419 ब्रास माती जप्त केलेली आहे परंतु ही यातील 90 ब्रास माती ही आधीच्या वर्षाची होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा सर्व प्रकार संशयास्पद आहे. आधीच्या वर्षीच्या मातीची विल्हेवाट पावसाळा संपण्यापूर्वी लावावी लागते नाही तर ही माती पावसाळयात वाहून जाते. त्यामुळे आधीच्या वर्षीची माती या ठिकाणी कशी काय शिल्लक राहणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते सांगत आहेत त्या प्रमाणे या प्रकरणी जबाबदार असणा-या अधिका-याची उच्च अधिका-याकडून चौकशी केली जाईल व संबंधित अधिकारी दोषी आढल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : साध्वी प्रज्ञा सिंग यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असणे

**मु. शी.** : साध्वी प्रज्ञा सिंग यांना मानसिक त्रास सहन करावा लागणे असणे याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे व इतर वि.प.स. यांनी साध्वी प्रज्ञा सिंग यांना मानसिक त्रास सहन करावा लागत असणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, साध्वी प्रज्ञा सिंग यांच्यावर खटला सुरु आहे. खटला सुरु असतांना जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत महिला रुग्णांना कशा प्रकारे वागवले जावे यासंदर्भात अनेक नॉर्म्स आहेत. या विषयाच्या संदर्भात मी जी 93 अन्वये सूचना दिली होती त्याचे उत्तर उशिरा आले परंतु मधील काळात प्रज्ञा सिंग यांना हृदय विकाराचा सौम्य झटका येऊन गेलेला आहे त्याचा उल्लेख या निवेदनामध्ये करण्यात आलेला नाही. माझ्याकडे आरोग्य शाळा रुग्णालय, आयुर्वेद सेवा संध यांचा रिपोर्ट आहे तसेच इसीजी सुध्दा आहे. या इसीजीवरुन तसेच लिस्टवरुन असे दिसते की, प्रज्ञा सिंग यांना हृदयाच्या उपचारासाठी औषध पाणी करावे लागले एवढा त्यांना मानसिक किंवा शारिरीक ताण सहन करावा लागतो आहे परंतु आपल्या निवेदनामध्ये यासंदर्भात काहीच उल्लेख नाही. आता आपल्याकडून सुधारीत उत्तर मागण्यासाठी सुध्दा वाव राहिलेला नाही. त्यामुळे माझी मागणी अशी आहे की, महिला तज्ञ डॉक्टरांचे पॅनल तयार करुन प्रज्ञा सिंग यांना योग्य तो उपचार मिळेल अशा प्रकारची व्यवस्था आपण नाशिक जेल मध्ये करणार आहात काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, साध्वी प्रज्ञा सिंग यांना हृदय विकाराचा झटका आला होता परंतु त्यांची जेव्हा तब्येत खराब झाली होती तेव्हा त्यांना नाशिक येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी पाठविण्यात आले होते. त्यांच्या वैद्यकीय तपासणीमध्ये त्यांना हृदय विकाराचा झटका आला नसल्याचे अभिप्राय डॉक्टरांनी दिलेले आहे. नाशिक येथील ख्यातनाम हृदय तज्ञ डॉ.धर्माधिकारी हे साध्वी प्रज्ञा सिंग यांचेच डॉक्टर असून त्यांना हृदय विकाराचा झटका आला नसल्याचा वैद्यकीय अहवाल दिलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, अशा प्रकारचा उपचार नाशिक जेलमध्ये देण्यात येतो का ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की,..

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्याकडे साध्वी प्रज्ञा सिंग यांचे हॉस्पिटलचे कागदपत्र आहेत. या कगदपत्रामध्ये म्हटले आहे की, त्यांच्या इसीजी मध्ये एसटीव्हेव्ह चेंजेस दिसतात.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

सभापती महोदय, एच.टी.वेव्हज् चेंजेस असल्यामुळे त्यांच्यावर एन.टी.जी.ड्रीप, टॅब.सॉरबीट्रेट ट्रीटमेंट सुरू आहे. ज्यावेळी हृदयविकाराचा झटका येतो त्यावेळी ही ट्रीटमेंट देण्यात येते. माझ्याकडे त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा जो अहवाल आहे, तो आपल्याकडे पाठवून देतो.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सांगितले आहे की, आमच्याकडे जो वैद्यकीय अहवाल आहे तो डॉक्टर धर्माधिकारी यांचा आहे. या डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली असून तपासणी अहवालामध्ये त्यांना हृदयविकाराचा झटका आलेला नाही असे नमूद केलेले आहे. माझ्याकडे आता जो अहवाल आहे, तो आपल्या माध्यमातून आपण तपासावा.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण दोन्ही अहवाल तपासून पहावेत. मी आपल्याकडे डॉक्टरांचा अहवाल पाठविला आहे. तो आपण तपासून पहावा.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वैद्यकीय उपचारासंबंधीचा अहवाल तपासून घेऊ.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, दोन्ही अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ. शी.** : वसई-विरार महानगरपालिकेची स्थापना.

**मु. शी.** :वसई-विरार महानगरपालिकेची स्थापन याबाबत श्री.संजय केळकर व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, श्री.संजय केळकर व इतर वि.प.स. यांनी "वसई-विरार महागनरपालिकेची स्थापना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी महिन्यापूर्वी म.वि.स.नियम 93 ची सूचना दिली होती. वसई-विरार मधील काही गावांचा समावेश वसई-विरार महानगरपालिकेत करण्यात येणार आहे. त्यासंबंधातील मी नियम 93 ची सूचना दिली होती. दरम्यानच्या काळात डोक्यावरून बरेच पाणी गेलेले आहे. आता निवडणुकांचा कार्यक्रम देखील जाहीर झालेला आहे. लेखी निवेदनात 53 गावे मिळून "अधिक मोठे नागरी क्षेत्र" घोषित करण्याचा शासनाचा इरादा आहे असे म्हटलेले आहे. या 53 गावांपैकी शासनाने 35 गावे नागरी क्षेत्रातून वगळली आहेत. तरी देखील तेथे निवडणुका होणार आहेत. शासनाने जाहीर केलेल्या अधिसूचनेमुळे ग्रामपंचायतीचे दफ्तर शासन त्याब्यात घेणार आहे, बँक खाती गोठवणार आहे. तेव्हा शासन बँक खाती गोठवणार आहे हे खरे आहे काय ? प्रशासकीय यंत्रणा ठप्प होणार असल्याने किरकोळ दैनंदिन कामकाजाबरोबरच साधा ना-हरकत दाखला, जन्म-मृत्यू दाखला मिळणे नागरिकांना कठीण झालेले आहे. याबाबत ग्रामस्थांचे फार मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. याबाबत शासन कोणते नियोजन करणार आहे ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, वसई-विरार मधील काही ग्रामपंचायतींचे महानगरपालिकेत रूपांतर करण्याची प्रक्रिया मधल्या काळात सुरू झाली होती. पूर्वीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची मालमत्ता, निधी, बँक खाती,अभिलेख महानगरपालकेला हस्तांतरित केले होते.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KTG/ प्रथम श्री.भारवि 13.25

श्री.अशोक चव्हाण ...

त्यामुळे बँक खाती गोठविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही आणि हा कारभार काही थांबत नाही. त्यांच्याकडे जी मालमत्ता आहे ती आपोआपच महानगरपालिकेकडे हस्तांतरित होत असते. त्याचबरोबर दाखले देण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, चार विभागीय कायार्लये स्थापन करण्यात आली असून उपआयुक्त दर्जाचा अधिकारी देण्यात आला आहे. त्याचबरोबर दैनंदिन नागरी सुविधा, अत्यावश्यक सुविधा तसेच प्रशासकीय कामे विनाविलंब पार पाडण्यासाठी अधिनियमात तरतूद केली असून त्याप्रमाणे कामे केली जात आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे, नवी मुंबई व मुरबाड परिसरात अन्न व्यावसायिकांकडून नियमांचे होत असलेले उल्लंघन

**मु. शी.** : ठाणे, नवी मुंबई व मुरबाड परिसरात अन्न व्यावसायिकांकडून नियमांचे होत असलेले उल्लंघन याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रमेश बागवे (गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ठाणे, नवी मुंबई व मुरबाड परिसरात अन्न व्यावसायिकांकडून नियमांचे होत असलेले उल्लंघन या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदना नंतर

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात असे म्हटलेले आहे की, " तक्रारीत नमूद केलेल्या विविध मुद्यांची चौकशी सह आयुक्त, मुख्यालय तथा औषध नियंत्रण प्राधिकारी, अन्न व ओषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्फत सुरु आहे." ही चौकशी केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे आणि या चौकशीत काही अधिकारी दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.रमेश बागवे : या संदर्भातील चौकशी लवकरात लवकर करण्यात येईल . आणि त्यामध्ये जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : चौकशी करण्यासाठी काही कालमर्यादा घालण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे :एक महिन्याच्या आत चौकशी करण्यात येईल आणि त्या चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिका-याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.

$$$$$$

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. अकोला जिल्हा परिषदेच्या लघू सिंचन योजनेतील भ्रष्टाचार

मु.शी. अकोला जिल्हा परिषदेच्या लघू सिंचन योजनेतील भ्रष्टाचाराबाबत श्री.गोपीकिसन बाजोरिया,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. गुलाबराव देवकर ( कृषी राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी अकोला जिल्हा परिषदेच्या लघू सिंचन योजनेतील भ्रष्टाचार या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



निवेदना नंतर

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला जिल्हापरिषदेच्या 38 कोल्हापुरी बंधा-याच्या संदर्भातील हा विषय असून दोन वर्षापासून या कामाच्या भ्रष्टाचारासंबंधी सातत्याने चौकशी आणि कारवाई सुरु आहे त्यामुळे त्या भागातील शेतक-याच्या सिंचनाची गेरसोय झालेली आहे त्यामुळे माननीय मंत्री महोदय त्यांच्या दालनात बैठक बोलावून 38 कोल्हापुरी बंधा-याचा प्रश्न निकाली काढणार आहेत काय आणि किती दिवसात हा प्रश्न निकालात काढण्यात येणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : होय

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II 6

VTG/ D/ KTG/ प्रथम श्री.भारवि

पृ.शी. ठाण्यातील राबोडी येथे दिनांक 17.3.2009 रोजी झालेली जातीय दंगल

**मु. शी.** : ठाण्यातील राबोडी येथे दिनांक 17.3.2009 रोजी झालेली जातीय दंगल याबाबत सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते.वि प.स यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना .

श्री. रमेश बागवे ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर,रामनाथ् मोते यांनी ". ठाण्यातील राबोडी येथे दिनांक 17.3.2009 रोजी झालेली जातीय दंगल या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर ... ...

श्री.संजय केळकर :सभापती महोदय,ठाणे येथील राबोडी येथे 29 सप्टेंबर 2009 रोजी एक दगल झाली होती त्यानंतर दिनांक 17 मार्च 2009 रोजी दुसरी ंदगल झ्ाली होती. या विषयासंबंधी

आम्ही वेळोवेळी शासनाला पत्रे लिहिली आहेत. या दंगलीशी सबध नसलेल्या व्यक्तिंना पूर्वग्रहदूषित विचाराने अटक करण्यात आली आहे. त्यांचा या दंगलीशी काहीही सबंध नाही याचे पुरावे सादर करण्यात आले होते. श्री.माटे बाहेर गावी गेले होते, श्री.रामदेवीया बाहेर गावी गेले होते.श्री.विक्रम भोईर यांचे घर जाळण्यात आले होते.त्यांच्या घरांना पोलिसांचा बंदोबस्त होता त्यांच्यावर राबोडी पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी सात केसेस दाखल केल्या आहेत. श्री. राजेंद्र पाटील या दंगलीच्या वेळी तेथे नव्हते ते बाहेरगावी होते त्यांच्याविरुध्द देखील केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. या निवेदनात असे म्हटलेले आहे की ," शासनाने 79 व्यक्तिविरुध्द केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत दोन्ही धर्मियांच्या लोकाविरुध्द खटले दाखल करण्यात आलेले आहेत." परंतु या मध्ये अनेक निरपराध लोकांविरुध्द खटले दाखल करण्यात आलेले आहेत त्यातील पाच लोक या घटनेशी संबंधित नव्हते. एका गणपती उत्सव मंडळाचे ते कार्यकर्ते आहेत आणि पोलिसांना त्रास होतो म्हणून जाणुनबुजून त्यांच्याविरुध्द केसेस दाखल केल्या आहेत . त्यांच्या विरुध्द तडीपाराच्या नोटीसेस बजावून त्यांना तडीपार करण्यात आले आहे याबाबतीत माझा स्पेसिफिक असा प्रश्न आहे की, राबोडी पोलीस स्टेशनने राबोडी दंगलीच्या प्रकरणात अनेक निरपराध लोकांच्या विरुध्द केसेस दाखल करुन त्यांना त्रास दिलेला आहे याबाबत चौकशी करण्यात येणार आहे काय तसेच या प्रकरणी सबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-यांची चौकशी करण्यात येणार आहे काय ? तसेच ज्या पाच लोकाविरुध्द तडीपाराच्या नोटीसेस देऊन त्यांना तडीपार करण्यात आलेले आहे . या दंगलीशी त्यांचा काहीही संबंध नाही याचे त्यांनी पुरावे दिलेले आहेत.तरी तडीपाराच्या केसेस मागे घेण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, ऑटो रिक्षा आणि मारुती झेन या दोन वाहनाची टक्कर झाल्यामुळे दोन वाहन चालकांमध्ये वाद झाला होता व त्यातून त्या भागात दंगल झाली होती. त्या प्रकरणी काही निरपराध लोकांविरुध्द केसेस दाखल करण्यात आल्या आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सागितले आहे. ही बाब तपासून पाहण्यात येईल. तसेच काही जणांना



श्री.रमेश बागवे ....

तडीपार करण्यात आलेले आहे असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तेव्हा ही बाब सुध्दा तपासून पाहण्यात येईल............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये मी हस्तक्षेप करतो. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारत असतांना आणि श्री.विक्रम भोईर व श्री राजेंद्र पाटील यांच्या नावाचा उल्लेख केला होता हे दोघेही जण सामाजिक संस्थामध्ये चांगले काम करणारे आहेत. गुन्हेगाराविरुध्द तडीपाराच्या केसेस दाखल केल्या जातात. परंतु पोलिसांनी मात्र समाजामध्ये चांगले काम करणा-या व्यक्तीविरुध्द तडीपाराच्या केसेस दाखल केल्या आहेत. तेव्हा अशा प्रकारे जर त्यांच्यावर अन्याय केला असेल तर तो थांबविण्यात आला पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, होय. आपल्या सूचनेचा नक्की विचार केला जाईल...

डॉ.दीपक सावंत : विचार नको, आपण कारवाई करा.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, याठिकाणी सांगण्यात आलेल्या ज्या इनोसंट लोकांवर तडीपारीची कारवाई केली असेल तर ती बाब तपासून पाहून योग्य ती कारवाई नक्की करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील क्रीडा संकुलासाठी आरक्षित जागेवर व्यापारी संकुल उभारणे

**मु.शी.**: कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील क्रीडा संकुलासाठी आरक्षित जागेवर व्यापारी संकुल उभारणे बाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी "कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील क्रीडा संकुलासाठी आरक्षित जागेवर व्यापारी संकुल उभारणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

JJ 3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय याठिकाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी, मुलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी, क्रीडा संकुलासाठी औद्योगिक विकास महामंडळाचा जवळ जवळ 77435 चौरस मीटरचा प्लॉट नं. पी-49 फेज 1 हा 1991 मध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला देण्यात आला. महानगरपालिकेने त्या जागेवर क्रीडा संकुलाचे बांधकाम न करता व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु केले आहे. व्यापारी तत्वावर चालणारे काही गाळे त्याठिकाणी बांधण्यात आले आहेत, हे उत्तरामध्ये मान्य करण्यात आले आहे. ही जागा औद्योगिक विकास महामंडळाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे अद्यापि हस्तांतरीत केली नाही. अशा परिस्थितीत कल्याण डोंबिवली-महानगरपालिकेने त्या जागेवर क्रीडा संकुलाच्या जागी मॉल आणि अन्य व्यापारी तत्वाच्या उपयोगासाठी बांधकाम सुरु केले. आणि म्हणून आपण हे बांधकाम ताबडतोबीने थांबविणार काय? या जागेचा उपयोग क्रीडा संकुलासाठी करण्याकरिता आपण कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला आदेश देणार काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, संदर्भिय जागा एम.आय.डी.सी. ची आहे, ही वस्तुस्थिती आहे. एम.आय.डी.सी. ने ही जागा 1991 साली ताबा पावतीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केली. सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या विकास नियमानुसार एक तृतियांश जागा म्हणजेच 25,811.66 चौ.मी. इतकी जागा वाणिज्यिक प्रयोजनासाठी देण्यात येते. माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या जागेचा व्यापारी वापर बदलण्यासाठी जी प्रक्रिया पार पाडावयाची असते त्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने एम.आय.डी.सी. ची त्याकरिता परवानगी घेतली पाहिजे, ती घेण्यात आलेली नाही. त्याठिकाण्‍ी कमर्शिअल वापर करण्यासाठी एम.आय.डी.सी. ची रितसर परवानगी घेतली पाहिजे. त्याकरिता कल्याण डोंबिवली-महानगरपालिकेने एम.आय.डी.सी. कडे पैसे भरले पाहिजेत. ही कामे पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी निश्चितपणे प्रयत्न केले पाहिजेत. ते करीत असतांना कल्याण डोंबिवली-महानगरपालिकेने एम.आय.डी.सी.कडे रितसर पैसे भरल्यानंतर ते रेग्युलराईज करता येईल. ते करण्याची आपली तयारी आहे. परंतु त्यांनी रितसर पैसे भरुन हे काम पूर्ण करावे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सोलापूर जिल्हयातील उस्मानिया उर्दू हायस्कूलच्या संस्थाचालकांच्या अमानुष मारहाणीमध्ये सहशिक्षकाचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: सोलापूर जिल्हयातील उस्मानिया उर्दू हायस्कूलच्या संस्थाचालकांच्या अमानुष मारहाणीमध्ये सहशिक्षकाचा झालेला मृत्यू याबाबत श्री. दिलीपराव सोनावणे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

माननीय गृहमंत्री अनुपस्थित

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा शल्य चिकित्सकाची पदे ग्रामीण भागात वर्ग करणे

**मु.शी.**: जिल्हा शल्य चिकित्सकाची पदे ग्रामीण भागात वर्ग करणे याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "जिल्हा शल्य चिकित्सकाची पदे ग्रामीण भागात वर्ग करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांचा निर्णय मला मान्य आहे. परंतु वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्यामध्ये धोरणात्मक मतभेद आहेत. ते मिटविण्याचे काम माननीय मुख्यमंत्री करतील काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांबरोबर चर्चा करुन हा निर्णय घेण्यात आला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गालगत रस्ते विकास महामंडळ, वन खात्याची जमीन विकासकांनी हडप करणे

**मु.शी.**: पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गालगत रस्ते विकास महामंडळ, वन खात्याची जमीन विकासकांनी हडप करणे याबाबत श्री.किरण पावस्कर, यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.प्रकाश सोळंके (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री किरण पावसकर यांनी "पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गालगत रस्ते विकास महामंडळ, वन खात्याची जमीन विकासकांनी हडप करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

JJ 8/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जे नवीन उद्योग सुरु झाले आहेत त्याठिकाणी जमीन हडप करण्याचा सपाटा लावला आहे. त्या संदर्भात मला प्रश्न विचारावयाचा आहे. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूला पिंपळोली, ताजे आणि उर्से या गावांच्या हद्दीमध्ये रस्ते विकास महामंडळ आणि वन खात्याची हजारो एकर जमीन असून त्याबाबत लोणावळी, वडगाव येथील विकासकांनी 2800 एकर जमीन हडप केल्याचे निदर्शनास आले आहे.

()यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . ..

माननीय मंत्री महोदयांनी निवेदनाच्या चारही परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, 13 लाख, 20 लाख मुद्रांक शुल्क अदा करण्यात आले, पण काही रद्द करण्यात आले. त्याचप्रमाणे लोणावळा येथे श्रीमती ए.ए.क्षीरसागर, दुय्यम निबंधक यांना दि.27-10-2009 च्या कायद्यान्वये शासकीय सेवेतून निलंबित केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, आय.आर.बी.च्यावतीने आयर्न इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने 527 हेक्टर म्हणजे 76.16 इतकी जी जमीन खरेदी केली आणि उत्तरामध्ये असे दिलेले आहे की, 311 हेक्टर जमीन क्षेत्राची नोंदी व इतर हक्कामध्ये खाजगी वने हा शेरा असल्यामुळे मंडळ अधिकारी कार्यालयाने नोंदी रद्द केलेल्या आहेत. एकीकडे या मोठया प्रमाणातील 500 हजार हेक्टर जमिनी खरेदी केल्या जातात आणि नंतर त्या रद्द केल्या जातात. शासनाला मुद्रांक शुल्क मिळत आहे आणि मग कोणी तरी निदर्शनास आणून दिल्यानंतर आपण पुढील कार्यवाही करीत आहात. पण आय.आर.बी.विषयी मी स्पेसिफीकली असे म्हणेन, सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री साहेब उपस्थित आहेत. आय.आर.बी.च्या बाबत सांगावयाचे तर वेंगुर्ला येथील 931 हेक्टर जमीन आहे, ज्याला आपण पेन्सिलने रिमार्क केलेली आहे. आता पुण्यातील 311 हेक्टर जमीन रद्द केली आहे असे सांगत आहात, तर अशा बड्या विकासकांना जमिनीची विक्री करणे, नंतर ती रद्द करणे असे जे प्रकार घडत आहेत, तर त्यांना काळया यादीमध्ये टाकणार आहात काय ? त्यांच्यावर काही कारवाई करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण निवेदनामध्ये स्पेसिफीकली म्हटलेले आहे की, आता या नोंदी महसूल विभागाने रद्द केलेल्या आहेत, सगळे फेरफार रद्द झालेले आहेत आणि याबाबतीत निश्चितपणे जी काही कारवाई करणे अपेक्षित होते, ती सर्व झालेली आहे. वन विभागाचे जे काही ऑब्जेक्शन आहे,त्यासंबंधातील फेरफार देखील रद्द करण्यात आलेले आहेत. आता त्यामध्ये कोणत्याही कारवाईची गरज नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्व ठिकाणी हीच कंपनी दिसत आहे.

----

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 अन्वये दिलेल्या निवेदन क्रमांक 16 बाबत**</u>

**उपसभापती** : आता निवेदन क्रमांक 16 चर्चेसाठी घेण्यात येईल.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधातील प्रश्नांना उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

<u>**नियम 93 अन्वये दिलेल्या निवेदन क्रमांक 17 बाबत**</u>

**उप सभापती** : आता निवेदन क्रमांक 17 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधातील प्रश्नांना उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे ते राखून ठेवण्यात यावे.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

. . . .2 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सरस्वती एज्युकेशन सोसायटीव्दारा संचालित यादवराव तासगांवकर इन्स्टिटट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॅजी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मासिक वेतन अदा करण्यास होणारा विलंब

मु.शी. : सरस्वती एज्युकेशन सोसायटीव्दारा संचालित यादवराव तासगांवकर इन्स्टिटट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॅजी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मासिक वेतन अदा करण्यास होणारा विलंब याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर व रामनाथ मोते वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर व रामनाथ मोते यांनी "सरस्वती एज्युकेशन सोसायटीव्दारा संचालित यादवराव तासगांवकर इन्स्टिटट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॅजी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मासिक वेतन अदा करण्यास होणारा विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यादवराव तासगांवर इन्स्टिटट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी हे विद्यालय आहे, त्याबाबत निवेदनामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये असे सांगितले

आहे की, आता प्रलंबित रक्कम अदा करण्यात आलेली आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, हे कर्जत तालुक्यातील इन्स्टीट्युट आहे. निवेदनामध्ये पान क्र.2 वर असे म्हटलेले आहे की, सन 2007-2008 मध्ये 152 मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृतीबाबत संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार रक्कम रु.35,24,900/- संस्थेस अदा करण्यात आलेली आहे. सन 2008-2009 करीता संस्थेने सादर केलेल्या 317 मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार रु.31,11,763/- इतकी रक्कम संस्थेस अदा करण्यात आलेली आहे. माझा असा प्रश्न आहे की, ही रक्कम कोणत्या तारखेला अदा करण्यात आली आणि दुसरा प्रश्न असा आहे की, यादवराव तासगांवकर इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिक्षण व इतर शुल्काची मागणी करणारे सन 2007-2008 व 2008-2009 चे परिपूर्ण प्रस्ताव 2009 मध्ये सादर करण्यात आलेला आहे, परंतु तो देखील अद्याप प्रलंबित आहे. तेव्हा याबाबत केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे व ती रक्कम केव्हा अदा करण्यात येणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सदरहू संस्थेकडून 2009-2010 चा प्रस्ताव उशीरा आल्यामुळे 79 हजाराच्या वर जी रक्कम आहे, ती या आर्थिक वर्षामध्ये देण्यात येईल.

----

. . . .2 के-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : कणकवली येथील गांगो देवालय परिसरामध्ये कोकण प्राईड बिअरबार सुरु असणे

**मु.शी.**: कणकवली येथील गांगो देवालय परिसरामध्ये कोकण

प्राईड बिअरबार सुरु असणे याबाबत सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "कणकवली येथील गांगो देवालय परिसरामध्ये कोकण प्राईड बिअरबार सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 के-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, भूषण परुळेकर यांचे कोकण प्राईड हे हॉटेल पत्र्याच्या शेडमध्ये कणकवली नगर पंचायतच्या एरियामध्ये येते. तेथे दोन पत्र्याच्या शेड आहेत आणि रस्त्यापासून 17 मीटर अंतरावर असलेल्या या पत्र्याच्या शेडनां आपल्याकडून बिअर बारची परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, सदर जागेपासून 68

मीटरवर गांगोचे मंदिर आहे आणि कोकणातील सर्वच मंदिरे ही धर्मदाय आयुक्तांकडे रजिस्टर झालेली नाहीत. जर हे मंदिर धर्मदाय आयुक्तांच्या कार्यालयाकडे रजिस्टर झालेले नाही म्हणून तुम्ही बिअर बारला आणि परमिट रुमला परवानगी दिलेली आहे. उद्या अशी परिस्थिती येईल, कारण कोकणातील पुष्कळ मंदिरे अशी आहेत . . . .

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर..

ज्यांचे रजिस्ट्रेशन झालेले नाही. या मंदिराच्या बाजूला चहा सारखी टपरी टाकून बिअरबार आणि परमिट रुमला परवानगी द्याल काय? या बिअरबार व परमिट रुमला सन 2005 ला परवानगी दिली आणि आता अपर आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक 18/3/2010 ला हा निर्णय दिलेला आहे आणि त्यांचे अपीलही अमान्य केलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अपर आयुक्त विभागीय अधिकारी यांचे दिलेले आदेश खरे आहेत काय? आपण त्यांना एकदा अपीलात जायला देता, एकदा परवानगी देता आणि त्याचबरोबर उत्पादन शुल्क विभाग असे म्हणतो की, हे अपील अमान्य झालेले आहे म्हणून आम्ही त्यांना पुन्हा 2010 ला नुतनीकरणाची परवानगी दिलेली आहे हा नक्की काय प्रकार आहे? मंदिरापासून जवळच पत्र्याची शेड टाकण्यात आलेली आहे. मुंबई-गोवा महामार्गापासून ते 17 मीटर अंतरावर आहे. उत्तरामध्ये ते 22 मीटर अंतरावर आहे असे म्हटले आहे. म्हणजे तेथे मंदिर आहे, रस्त्याच्या जवळच्या भागात आहे तरी बिअरबारच्या नुतनीकरणास परवानगी दिली जात आहे तेव्हा ही परवानगी रद्द करण्यात येईल काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, चौकशी करुन जर नियमात असेल तर ती परवानगी रद्द करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हा बिअरबार व परमिटरुम मंदीरापासून 65 मीटरच्या अंतरावर आहे. परवानगी मिळण्यासाठी मंदिरापासून किती मीटर अंतर लागते.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, संबंधित केसमध्ये बिअरबार व परमिट रुम मंदिराजवळ असेल तर ते पाहून, चौकशी करुन ती परवानगी रद्द करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, परवानगी मिळण्यासाठी मंदिरापसून किती मिटर अंतर असावे लागते?

**उपसभापती** : 100 मीटरचा नियम आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, उत्तरामध्ये मंदिराच्या जवळ आहे असे म्हटले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन ते नियमात नसेल तर रद्द करण्यात येईल.

( काही सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य किरण पावसकर, माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफिक उत्तर दिलेले आहे. तुम्ही तक्रार केली की, परमिट रुम हे 60 ते 65 मीटर अंतरावर आहे. तुमची तक्रार तपासून पहाण्यात येईल आणि त्यामध्ये जर तथ्य असेल तर योग्य ती कारवाई करण्यात येइल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. याच्यापेक्षा वेगळे उत्तर काय असू शकते?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या उत्तरातच असे म्हटले आहे की, गांगो देवालय हे 68 मीटर अंतरावर आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर जागेपासून गांगो देवालय मंदिर हे 68 मीटरवर आहे. आणि 100 मीटरचा कायदा असेल तर ते परमिट रुम रद्द झाले पाहिजे.

श्री. किरण पावसकर : बिअरबार व परमिट रुमला परवानगी देण्याच्या कुठल्याही अटी व शर्तीमध्ये हा बिअरबार बसत नाही.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी सांगितलेले आहे की, चौकशी करुन रद्द करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, थोडयावेळा पूर्वी उत्तर देतांना याठिकाणी सांगण्यात आलेले आहे की, मंदिर रजिस्टर असो अथवा नसो सदर मंदिरापासून 100 मीटरवर बिअरबार व परमिट रुमला परवानगी देता येणार नाही.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जर मंदिर बिअरबारला परवानगी देण्यापूर्वीचे असेल आणि त्यापासून शंभर मीटरच्या आत बिअरबार असेल तर कोणत्याही परिस्थितीत.... कारण हे लायसन्स पोलीस देत नाहीत, जिल्हाधिकारी हे लायसन्स देतात म्हणून जिल्हाधिकाऱ्यांना तशा सूचना देण्यात येतील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्हयात उपाहारगृह व भोजनालयात लहान मुलांच्या मार्फत दारु विकली जाणे

**मु. शी.** : दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्हयात उपाहारगृह व भोजनालयात लहान मुलांच्या मार्फत दारु विकली जाणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे,कपिल पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे,कपिल पाटील यांनी "दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्हयात उपाहारगृह व भोजनालयात लहान मुलांच्या मार्फत दारु विकली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. वर्धा जिल्हयामध्ये दारुबंदी आहे. दारुबंदी असताना त्याठिकाणी लहानमुलांच्या मार्फत हॉटेलमध्ये, उपहारगृहात दारुची विक्री होते. सभापती महोदय, ही केवळ विक्रीच होत नाही तर वर्धा जिल्हयापरिषद कार्यालय, रेल्वेस्थानक, कृषी अधिक्षक कार्यालय, सार्वजनिक बांधकाम या कार्यालयाच्या कॅन्टीनमध्ये दारु विक्री होते.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

दारु विक्रीच्या संदर्भात 2009-10 मध्ये 335 गुन्हे दाखल झालेले आहेत आणि 2007 मध्ये एकूण 2231 गुन्हे दाखल केलेले आहेत असे निवेदनात नमूद केलेले आहे. वर्धा जिल्हयामध्ये दारुबंदी आहे. तरी सुध्दा तेथे असे प्रकार होत असतील तर ते गंभीर आहे. यामुळे संबंधित अधिका-यांवर कारवाई होईल काय ? त्याचप्रमाणे उपहारगृहांवर कारवाई होईल काय, कायदेशीर कारवाई होईल काय आणि जी सरकारी कार्यालये आहेत त्याठिकाणी दारुची विक्री होते त्यामुळे त्या कार्यालयातील अधिका-यांवर कारवाई होईल काय ?

श्री.रमेश बागवे : त्याठिकाणी दारु सापडली असेल तर त्यांचे परवाने रद्द केले जातील आणि त्या अधिका-यांवर सुध्दा कारवाई केली जाईल.

----

निवेदन क्रमांक 21 बाबत

**उपसभापती** : सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे मी हे निवेदन राखून ठेवत आहे.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिवंडी येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अनधिकृत इमारतीमध्ये सुरु करणे

**मु. शी.** : भिवंडी येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अनधिकृत इमारतीमध्ये सुरु करणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ( विधी व न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "भिवंडी येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) अनधिकृत इमारतीमध्ये सुरु करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, भिवंडीच्या न्यायालयाचे उद्‌घाटन झाले आहे ती इमारत अनधिकृत होती अशी माझी माहिती आहे. भिवंडी महानगरपालिकेने सुध्दा ही माहिती व्हेरिफाय करुन घेतली आहे. निवेदनात ती इमारत अधिकृत होती असे म्हटले आहे, ही माहिती शासनाने तपासली आहे काय ? शासनाने त्याठिकाणी वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन केले आहे. अशाप्रकारचे न्यायालय स्थापन करण्याचे किती प्रस्ताव आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशांमार्फत दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर स्थापन करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. ठाणे जिल्हयासाठी अशाप्रकारचा विचार करीत असताना भिवंडीच्या लोकांची मागणी होती, त्यानुसार ते न्यायालय स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात आली. ज्या इमारतीत हे न्यायालय स्थापन करण्यात आले होते ती इमारत बेकायदेशीर होती ते मान्य आहे. त्यामुळे ती इमारत बंद करण्यात आली असून त्याच इमारतीच्या अन्य भागामध्ये जेएमएफसी, सिनियर डिव्हिजन सुरु करण्यात येत आहे. सभापती महोदय, यासंदर्भात आपल्या उपस्थितीत एक बैठक झाली होती. ठाणे जिल्हा बार असोसिएशनचे सदस्य संपावर गेले होते, त्यांनी चक्री उपोषणाचा मार्ग अनुसरला होता. परंतु उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी प्रधान सचिव, बार असोसिएशनचे पदाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेण्याचे सूचित केले आहे. मुख्य न्यायाधीश यांच्यामार्फत याविषयी पाठपुरावा सुरु आहे. मुख्य न्यायाधीशांनी बार असोसिएशनला चर्चेला बोलविलेले आहे असेही मला सांगण्यात आले आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

**पृ. शी.** : धारावी येथील कामराज हौसिंग सोसायटीच्या लिफ्टमध्ये सात वर्षाची मुलगी चिरडून मृत्यूमुखी पडणे

**मु. शी.** : धारावी येथील कामराज हौसिंग सोसायटीच्या लिफ्टमध्ये सात वर्षाची मुलगी चिरडून मृत्यूमुखी पडणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.विजय वडेट्टीवार ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "धारावी येथील कामराज हौसिंग सोसायटीच्या लिफ्टमध्ये सात वर्षाची मुलगी चिरडून मृत्यूमुखी पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यात सुमारे 80 हजार लिफ्ट आहेत. या लिफ्टच्या माध्यमातून अनेक दुर्दैवी घटना सातत्याने घडत आहेत. इतक्या मोठया प्रमाणावर असलेल्या लिफ्टचे परीक्षण करण्यासाठी राज्यात जी यंत्रणा आहे ती पुरेशी नाही. त्यामुळे या सर्व लिफ्टचे परीक्षण नीट होत नाही, देखभाल होत नाही. त्यामुळे सातत्याने असे अपघात होत आहेत. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे उदवाहन निरीक्षकाची 62 पदे मंजूर आहेत, त्यापैकी फक्त 16 पदे भरलेली आहेत. त्यामुळे ख-या अर्थाने या उदवाहनांचे या तज्ज्ञ मंडळींकडून परीक्षण झाले पाहिजे तसे ते होत नाही. यामध्ये शासन सुधारणा करण्यासाठी कोणते प्रयत्न करणार आहे ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : 62 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 16 पदे भरलेली आहेत. 46 पदे भरण्यासाठी पी.डब्ल्यू.डी.च्या माध्यमातून लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. 80 हजार लिफ्ट आहेत. त्यामुळे ही पदे तातडीने भरण्याची कारवाई शासन लवकरात लवकर पूर्ण करील.

डॉ. दीपक सावंत : साधारणपणे दरवर्षी 6 हजार लिफ्टस्ची नव्याने भर पडत असते. यासंदर्भात आपण समिती गठीत करणार आहात काय ? या लिफ्टची तपासणी करुन त्यांची वार्षिक देखभाल होते की नाही हे पाहणार आहात काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : वर्षातून दोन वेळा लिफ्टची तपासणी झाली पाहिजे. तांत्रिक दोष काय आहेत हे बघितले पाहिजे. यासंबंधात व्यवस्था आहे. तरी पण दरवर्षी वाढणारी लिफ्टची संख्या, जुन्या लिफ्टमधील होणारे बिघाड, बिघाडामुळे होत असलेले अपघात या संदर्भात प्रभावी अशी उपाययोजना करण्यासाठी शासन काम करील. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे अपघाताच्या संदर्भात मुख्य अभियंत्याच्या प्रमुखत्वाखाली समिती नेमलेली आहे. या समितीने अहवाल दिल्यानंतर लवकरात लवकर शासन प्रभावी उपाययोजना करील.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक खोटे दस्तऐवज करुन निवडून येणे

**मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक खोटे दस्तऐवज करुन निवडून येणे याबाबत सर्वश्री. जयंत प्र. पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. प्रकाश सोळंके ( सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक खोटे दस्तऐवज करुन निवडून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : या प्रकरणी चालू असलेली चौकशी लवकरात लवकर पूर्ण होईल काय ?

श्री. प्रकाश सोळंके : होय.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>26/11च्या दहशतवादी हल्ल्याच्या वेळी बोलावून देखील न आलेल्या पोलीस अधिका-यांवरील कारवाईची माहिती देण्याबाबत.</u>**

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, 26/11ला अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केला होता. त्या हल्ल्यामध्ये अनेक लोक मृत्यूमुखी पडले होते. या गंभीर विषयाकडे मी आपले लक्ष वेधित आहे. राज्याचे तत्कालीन पोलीस आयुक्त श्री. हसन गफूर यानी 23 नोव्हेंबर 2009 रोजी द विक या मॅगझिनला जाहीरपणे मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीमध्ये त्यांनी असे म्हटले होते की. 26/11च्या अतिरेक्यांच्या हल्ल्याच्या वेळी परमवीर सिंग, अतिरिक्त पोलीस आयुक्त, नक्षलवाद विरोधी पथक, श्री के. व्यकटेशन अतिरिक्त पोलीस आयुक्त, साऊथ विभाग, अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. देवेन भारती, सहपोलीस आयुक्त, के.एल.प्रसाद हे अधिकारी बोलावून देखील आले नव्हते. हा विषय विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये उपस्थित करण्यात आला होता. या गंभीर प्रकरणी सन्माननीय गृहमंत्र्यांनी या सदनाला असे आश्वासित केले होते की या गोष्टीची तात्काळ चौकशी करुन कारवाई करणार. आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. ..

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा...

श्री. रामदास कदम : मी प्रश्नच विचारत आहे. या प्रकरणी चौकशी करण्याचे राहिले बाजूला. उलट या अधिका-याला पदोन्नती देण्यात आली. हा विषय मी अनेक वेळा सभागृहामध्ये उपस्थित केलेला होता आणि माझ्या मागणीवरुन शासनाने राम प्रधान समिती नेमली होती. पोलीस आयुक्त आणि पोलीस महानिरीक्षक यांच्यावर कारवाई करावी अशी माझी मागणी होती. आज देखील मी माझ्या मुद्यावर ठाम आहे. या सभागृहामध्ये चौकशी करण्याचे जे आश्वासन दिले होते ती चौकशी आपण केलेली आहे काय ? त्या चौकशीचा अहवाल काय आहे ? तसेच या हसन गफूरवर आपण ताबडतोब कारवाई करणार आहात काय ? सभापती महोदय, या अधिका-यांच्या चौकशी बाबतीत माननीय गृह मंत्र्यांनी सभागृहामध्ये जाहीर स्टेटमेंट केलेले होते. त्या चौकशीचे काय झाले ? उलट हसन गफूरला प्रमोशन दिलेले आहे. त्या अधिका-यावर आपण नेमकी काय कारवाई करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : ही गोष्ट खरी आहे की जे स्टेटमेंट केले होते त्या संदर्भात चौकशी करु असे आश्वासन शासनाने दिले होते.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, या सगळ्या प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे याची माहिती घेऊन योग्य वेळी पटलावर ठेवली जाईल. हे सेशन संपत असले तरी......

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिले होते. आज अधिवेशन संपणार आहे. चौकशीचा अहवाल कधी पटलावर ठेवणार आहात?

श्री.आर.आर.पाटील : पुढील अधिवेशनात ठेवला जाईल. तारांकित प्रश्न विचारला तर 45 दिवसांची मुदत दिली जाते. लगेच उत्तर दिले जात नाही.

श्री.रामदास कदम : माननीय गृहमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाला कधी हरताळ फासलेला नाही. आपण जे जे सांगितले त्याप्रमाणे केले आहे.

श्री.आर.आर.पाटील : याबाबतीत देखील सांगितले ते केले जाईल. सद्यस्थितीची माहिती घेऊ आणि पटलावर ठेवू.

श्री.रामदास कदम : अधिकाऱ्यांना का पाठीशी घालत आहात? 200 लोक मेले आहेत. इतक्या मोठया प्रमाणात दहशतवादी हल्ला होऊनही आयुक्त जाहीरपणे स्टेटमेंट देतात. जे दोषी अधिकारी आहेत त्यांच्या बाबतीत काय कारवाई करणार आहात? जे लोक मेले त्याला कोण जबाबदार आहे?

**उपसभापती** : माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे की, ते पुढील अधिवेशनात पटलावर माहिती ठेवतील.

श्री.रामदास कदम : पुढील अधिवेशनात का? त्यांनी आश्वासन दिले होते. मला हक्कभंगाचा प्रस्तावा आणावा लागेल. मला नियमाची माहिती आहे. आपण सभागृहात शब्द दिला होता, त्या शब्दाचे पालन करणार की नाही?

श्री.आर.आर.पाटील : हक्कभंग आणण्याची परिस्थिती माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्यावर येऊ देणार नाही. जी काही चौकशी केली, प्रक्रिया असेल त्याची सद्यस्थिती पटलावर ठेवतो असे मी यापूर्वीच सांगितले आहे.

श्री.रामदास कदम : या अधिवेशनात ठेवा.

-------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**दिनांक 22.4.2010 रोजीच्या अ.क्र.18 व्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण काल नियम 93 अन्वये मांडलेल्या सूचनेसंबंधीचे निवेदन क्रमांक-18 संबंधी मंत्रीमहोदयांना अधिक माहिती घ्यावयास सांगितले होते. त्या निवेदनावर प्रश्न विचारण्याची संधी मला मिळावी. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत.

**उपसभापती** : ठीक आहे. प्रश्न विचारण्यात यावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल अकोला शहराच्या पाणीपुरवठ्यासंबंधी निवेदन करण्यास सांगितले होते. अकोला शहराच्या महापालिका क्षेत्रामध्ये 7-7 दिवस पाणीपुरवठा होत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने यासंबंधी निविदा काढली होती. तांत्रिक मान्यता दिली होती. ती योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही. भीषण पाणीटंचाई आहे. 7-7 दिवस जनतेला पाणी मिळत नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली नाही. महापालिका फक्त 10 टक्के लोकवर्गणी भरावयास तयार आहे. महापालिका अतिरिक्त खर्चाचा भार उचलू शकत नाही. मंत्रीमहोदयांनी माझी विनंती आहे की, खास बाब म्हणून तेथील अधिकारी, लोकप्रतिनिधी यांना बोलावून या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी एखादी बैठक घेऊन अकोला शहराला पाणीपुरवठा करण्यासंबंधी शासन काय कार्यवाही करणार आहे हे सभागृहाला सांगितले तर तेथील जनतेला दिलासा मिळू शकेल.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मला जी माहिती मिळाली त्यानुसार याठिकाणी लोकवर्गणीचा प्रश्न विचाराधीन आहे. लोकवर्गणी कदाचित.......

श्री.पांडुरंग फुंडकर : महापालिकेने प्रस्ताव तयार करुन जीवन प्राधिकरणाकडे पाठविला आहे. महापालिका लोकवर्गणी भरावयास तयार आहे. परंतु 20 टक्के कर्जाची आवश्यकता आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली नाही. कर्मचाऱ्यांचे पगार झालेले नाहीत. शासनाकडून खास बाब म्हणून या योजनेला मंजुरी दिली जाईल काय?

श्री.अशोक चव्हाण : महापालिकेला कशा पध्दतीने सॉफ्ट लोन उपलब्ध करुन देता येईल याबाबत मार्ग काढण्याचा जरुर प्रयत्न केला जाईल. त्यासाठी बैठक घेण्याची आवश्यकता नाही. अकोला महापालिकेचा प्रश्न आहे. त्यामुळे अन्य माध्यमातून कशी मदत करता येईल या बाबतीत प्रयत्न केला जाईल.

..3..



SGB/ SBT/ ST/ 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 20 टक्के रक्कम कमी पडते, महापालिकेची कर्ज घेण्याची क्षमता नाही.

श्री.अशोक चव्हाण : या संदर्भात मार्ग कसा काढायचा या बाबतीत प्रयत्न केला जाईल.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक सहा च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 245 या लक्षवेधी सूचनासंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 245 ही निवेदने कृपया छापावीत)

------

नंतर 2क्यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक

**मु.शी.**: सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42-महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती

**उपसभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

सचिव : दिनांक 22 मार्च, 2010 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेला पुढील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीकरिता पाठविण्यात येत आहे :-

**प्रस्ताव**

सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42-महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक 2009 - पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरिता विहित दर्जाच्या भुजलाचा कायम आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भुजलाच्या समुपयोजनाचे सामूहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे ; आणि त्याच्याशी संबंधित व अनुषंगिक बाबींची तरतूद करणे यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखरेपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्य मंत्री) : महोदय, दिनांक 22 मार्च, 2010 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

"सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42-महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक 2009 - पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरिता विहित

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रधान सचिव.......

दर्जाच्या भुजलाचा कायम आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भुजलाच्या समुपयोजनाचे सामूहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित व अनुषंगिक बाबींची तरतूद करणे यासाठी विधेयक" विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XLI OF 2009**

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE BOMBAY POLICE ACT, 1951 AND THE MAHARASHTRA MUNICIPALS COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र. 41-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. अशोक चव्हाण : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्र.41-मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले विधेयक क्र. 41-मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, 2009 च्या संदर्भात मी सभागृहाला असे सांगू इच्छितो की, केंद्रशासनाच्या सन 2004 मध्ये जे नॅशनल

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

पॉलिसी ऑफ अर्बन स्ट्रीट व्हेंडर्स" यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिलामध्ये ज्या मार्गदर्शक सूचना पारित केल्या होत्या त्या अनुषंगाने राज्यशासनाने सुध्दा राज्य स्तरावरील फेरीवाला धोरण तयार करण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली सन 2006 मध्ये एक समिती स्थापन केली होती. राज्यातील फेरीवाल्यांच्या संदर्भात, जो गरीब समाज घटक आहे त्यांच्या बाबतीत एक सुस्पष्ट धोरण असावे या अनुषंगाने त्या धोरणात ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख असावा अशा सर्व गोष्टी या कायद्यात अंतर्भुत आहेत आणि आदर्श उपविधी सन 2009 मध्ये प्रसिध्द करण्यात आला त्या अनुषंगाने महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस या कायद्यात आवश्यक त्या तरतुदी व सदर दुरुस्ती मसुदा हा केंद्रशासनाकडे दि. 19.5.2009 रोजी मान्यतेसाठी पाठविण्यात आला आणि त्यावर केंद्रशासनाने दि. 29 जुलै, 2009 च्या पत्रान्वये मसुदा आणि "नॅशनल पॉलिसी ऑफ अर्बन स्ट्रीट व्हेंडर्स" यातील तरतुदी त्यानुसारच असल्याचे कळविले आहे. त्यानंतर केंद्रशासनाकडून आदर्श फेरीवाला विधेयक, 2009 चा मसुदा प्राप्त झालेला आहे आणि या मसुद्यातील तरतुदी व राज्यातील फेरीवाला धोरणाच्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या तरतुदी, उपविधी, अधिनियमातील शास्ती, विशेष तरतुदी वगळता जवळपास सारख्याच आहेत व केंद्रशासनाने जे धोरण घेतलेले आहे त्याच अनुषंगाने राज्यशासनाने धोरण स्वीकारलेले आहे. तथापि, केंद्रशासनाच्या प्रस्तुत विधेयकातील तरतुदीनुसार राज्य शासनाकडील महानगरपालिका, नगरपरिषदा अधिनियमातील अतिरिक्त तरतुदी करणे आवश्यक असल्यास त्यासंबंधी विधेयक नंतर सादर करण्यात येईल त्यामध्ये या विधेयकातील प्रमुख ज्या गोष्टी आहेत त्यासाठी सभागृहाने हे विधेयक मंजूर करण्याबाबत जरुर विचार करावा.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंतिम आठवडा प्रस्तावासंदर्भात**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज अंतिम आठवडा प्रस्तावाचा दिवस आहे. कायद्याने आम्हाला अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करण्याची संधी दिलेली आहे. अंतिम आठवडयावर चर्चा करण्याचा आमचा हक्क आहे. दोन तीन अधिवेशनापासून अंतिम आठवडा प्रस्ताव पुढे पुढे ढकलले जात आहे. अधिवेशनाचा शेवटचा दिवस हा विरोधी पक्षाचा असतो. दोन दिवसापासून लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली नाही. आज सुध्दा नियम 93 च्या ज्या सूचना आल्या त्यातील एक गठ्ठा पटलावर ठेवण्याचे ठरले. असे असतांनाही शासनाकडून उत्तरे येत नाही ही काही आमची चूक आहे काय? अंतिम आठवडा पुढे ढकलण्याची या सरकारला आता सवयच झालेली आहे. त्यामुळे आपण अशा प्रकारे कामकाज चालविणार आहात काय ? अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आपण 5 महत्वाची विधेयके आणलेली आहेत ही काय आमची चूक आहे काय ? खरे म्हणजे नियमानुसार विधेयक आम्हाला 4 दिवस अगोदर मिळाली पाहिजे कारण आम्हाला विधेयकावर आमच्या उपसूचना मांडावयाच्या असतात. त्यामुळे बिल आल्याबरोबर त्यावर चर्चा न करता आम्ही बिल मंजूर करुन द्यावयाचे का ? आपल्याला जर बिल पास करावयाचे असतील तर आपण एक आठवडा अधिवेश वाढवा. आजचा दिवस हा विरोधी पक्षाचा आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचना आज मोठया प्रमाणात आल्या यामध्ये आमचा दोष आहे काय ? सभा सदस्यांनी सभापतींना विनंती केली होती की, आम्ही 93 च्या सूचन दिल्या असून त्याची उत्तरे अजूनही येत नसल्यामुळे सर्वाची उत्तरे शेवटच्या दिवशी आली तर त्यावर चर्चा होणार कधी ? असे असतांनाही शासनाला जाग येत नसेल व सरकार जर आपल्या अधिका-यांना जाब विचारत नसेल याला काय सरकार म्हणायचे काय ? मंत्री सभागृहात येतात, लागेल ते उत्तर देतात आणि हसत हसत निघून जातात. जनतेला न्याय मिळणे हा आता विषयच राहिलेला नाही. शासनाची काहीही बांधिलकी राहिलेली नाही. जनतेच्या प्रश्नाला न्याय देण्याची सरकारची भूमिका राहिलेली नाही. विरोधी पक्ष सभागृहात जनतेचे प्रश्न घेऊन येत असतो व जनतेचे प्रश्न ख-या अर्थाने सरकारला सोडवावयाचे असतात. परंतु आता जनतेचे प्रश्न सोडविण्याची शासनाची बांधिलकी राहिलेली नाही. अंतिम आठवडा प्रस्ताव दर वेळेस पुढे ढकलला जातो आणि आम्ही त्यावर गोंधळ घातला की, ते तुम्हाला पाहिजेच असते. गोंधळ

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

घातल्याबरोबर गोंधळात कामकाज उरकण्याचे काम शासनाकडून केले जात आहे. गोंधळात कामकाज आटोपल्यानंतर शासनाला फार आनंद होतो. विधेयकावर चर्चा न करता विधेयक पास करणारे असे हे सरकार मी प्रथमच पाहिले आहे. विधेयकावर चर्चा करण्यास आम्ही तयारच असतो. परंतु आज आपण 3 महत्वाची विधेयके आणलेली आहेत. सावकारी कायद्यावर न बोलता आपल्याला हे बिल मंजूर करावयचे आहे काय ? हे बिल आपल्याला एवढे सोपे वाटले का ? खालच्या सभागृहात विधेयक पास झाले म्हणजे ते विधेयक वरच्या सभागृहातही मंजूर झालेच पाहिजे का ? खालच्या सभागृहात बिल मंजूर झाले म्हणजे आम्ही सुध्दा "मम" म्हणावयाचे का ? चर्चा न करता बिल पास करण्याच्या संदर्भात तुम्ही तशी कायद्यातच तरतूद करुन टाका. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी जर विरोधी पक्षाला न्याय मिळत नसेल तर ते योग्य नाही. एकाच वेळी 5-5 बिले एकदम आणत असाल तर ते योग्य नाही. या ठिकाणी जी बिले आणलेली आहे त्या बिलामध्ये किती तरी उपसूचना मांडता येतील अशी ही बिले आहेत. विधेयक तातडीने मंजूर झालेच पाहिजे अशी शासनाला तातडी नाही. विधेयक पास झाले नाही तरी ऑर्डीनन्स काढून पुढच्या अधिवेशनापर्यंत बिल नेता येते. या ठिकाणी महसूलचे जे बिल आहे ते फार गंभीर आहे. महसूलच्या बिलात "पॉवर ऑफ ॲटर्नी" हा चर्चेचा विषय आहे. "पॉवर ऑफ ॲटर्नी" हा विषय त्रासदायक ठरणार आहे. या ठिकाणी जी काही विधेयके आलेली आहेत ती फार गंभीर आहेत. त्यामुळे या सर्व मुद्यांवर माननीय सभापती महोदयांनी आम्हाला मार्गदर्शन करावे. अंतिम आठवडा प्रस्ताव पुढे ढकलत ढकलत जातात व त्यामुळे आम्हाला नवीन अंतिम आठवडयाचे प्रस्ताव मांडण्याची संधीच मिळत नाही. एखाद्या वेळेस अंतिम आठवडा प्रस्ताव पुढे ढकलला तर काही नाही परंतु आता ही शासनाला सवयच लागली आहे. त्यामुळे या सर्व मुद्याच्या संदर्भात आपण मार्गदर्शन करावे अशी विनंती करतो.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता आपण विधेयक मंजूर करायचे काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, फेरीवाल्यांवर बोलण्यासारखे खूप आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, बिलावर चर्चा न करण्यासंबंधी मी काहीही बोललो नाही. कामकाज किती घ्यायचे हे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मंत्री येतात आणि जातात असा उल्लेख केलेला आहे. परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. गेले दोन महिने सभागृहामध्ये चांगले कामकाज झालेले आहे. सभागृहाच्या माध्यमातून जे प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत त्या सगळ्या प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका शासनाची राहिली आहे. काही काही वेळेला कामकाज जास्त असते हे मला मान्य आहे. अशा वेळी आपण 9-9, 10-10 तास थांबून काम केलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला जेवढा न्याय देता येईल तेवढा देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. आजचे कामकाज, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आले आहे. विरोधी पक्षाकडून लक्षवेधी सूचना, म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना, औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यात येतात. त्यामुळे आता आपल्याला वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. आता मांडण्यात आलेले बिल विधान सभेने मंजूर केलेले आहे. त्यामुळे त्यावर आपण चर्चा करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्हाला घटनेने अधिकार दिलेला आहे.

**उप सभापती** : आता आपण विधेयकावर चर्चा करू या.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, घटनेने आम्हाला अधिकार दिलेले आहेत. ते जर सभागृहात आम्हाला वापरता येत नसतील तर आम्ही येथे मौन पाळण्यासाठी यायचे काय ? अंतिम आठवडा प्रस्ताव आमचा अधिकार आहे. तो सभागृहात मांडता येत नसेल तर येथे कशासाठी बसायचे? ऐन वेळी येथे बिल आणायचे आणि त्यावर अभ्यास करता येणार नसेल तर ही कामकाज करण्याची पद्धत पूर्णपणे चुकीची आहे. मुंबई फेरीवाल्यांच्या संदर्भातील विधेयक आणि सावकारी विधेयक फार भयानक आहे. त्यामुळे या बिलांवर अभ्यास करायला पाहिजे. आपल्याला जर बिल घ्यायचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

असेल तर आपण एक दिवसासाठी अधिवेशन वाढवावे. आज अंतिम आठवडा प्रस्ताव घ्यावा व उद्या शासकीय विधेयके घ्यावीत. विरोधी पक्षाचे कामकाज न घेता बिल मंजूर करून घ्यायची असे होता कामा नये. आमचा जो हक्क आहे तो आपण अबाधित ठेवला पाहिजे. त्याच्यावर गदा येता कामा नये. त्यामुळे आपण एक दिवस अधिवेशन वाढवावे. उद्या शासकीय विधेयके घ्यावी. महत्त्वाची विधेयके 5-5 मिनिटांमध्ये चर्चा करून मंजूर करणे शक्य होणार नाही. अंतिम आठवडा प्रस्ताव हा. आमच्या हक्काचा आहे, त्यामुळे तो हक्क आपण आम्हाला मिळवून द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मुंबईतील पाच लाख फेरीवाल्यांचा प्रश्न आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांनी जरूर बोलावे. आपण दोन तास बोलावे. कारण आम्हाला देखील या विधेयकावर बोलावयाचे आहे.

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

**उपसभापती** : अशा परिस्थितीत कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 2.30 वाजेपर्यत तहकूब करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी, 2 वाजून 30 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली )

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)**

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाचे कामकाज दुपारी 2.33 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.)

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालाबाबत

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक बाब आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदय उभे राहिले आहेत. पण आम्ही त्यांच्या आश्वासनावर विश्वास का ठेवावयाचा असा आमच्यापुढे सारखा-सारखा प्रश्न पडतो. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने जे काही चालले आहे, ते ढोंग तरी बंद करा किंवा प्रामाणिक तरी रहा. कृपया आपण माझे शब्द लागून घेऊ नका. कारण मी तुमच्याशी अत्यंत तळमळीने बोलत आहे. मी आता बोलून-बोलून थकलो आहे. आता काय करावयाचे असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, याठिकाणी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल (स्थानिक संस्था) महाराष्ट्र राज्य, सादर करण्यात आला आहे. या अहवालामध्ये प्रास्ताविक मध्ये खाली अशी टीप दिलेली आहे की, "मूळ इंग्रजी अहवालावरुन अनुवादित शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा." म्हणजे या अहवालातील मराठी शब्दांच्या बाबतीत काही शंका असतील तर त्यासाठी कृपया आम्ही इंग्रजी अहवाल पहावा. म्हणजे मग तुमचे जे भाषा संचालनालय आहे, ते बाजूच्या अरबी समुद्रामध्ये बुडवून टाकावे. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये भाषा संचालनालय मराठीचे भले करणार असेल आणि जर तुम्हाला या अहवालातील काही शब्द समजत नसतील किंवा काही अडचण येत असेल तर इंग्रजी अहवाल पहावा असे सांगत आहेत म्हणजे आम्ही इंग्रजी अहवाल पहावयाचा काय ? मग भाषा संचालनालय कशासाठी पाहिजे ? सामान्य प्रशासन विभाग कोणाकडे आहे? जी.ए.डी.कोणाकडे आहे ? जी.ए.डी.असे म्हटल्यानंतर पटकन समजते. पण सामान्य प्रशासन विभाग असे विचारल्या नंतर म्हणजे काय असे बाजूला विचारले जाते. परिचयाचे शब्द वापरल्यानंतर पटकन समजते. मी याबाबतीत सांगून-सांगून कंटाळलो आहे. माझ्या बॅगेमध्ये याबाबतीत शासनाला दिलेली सगळी निवेदने आहेत. तुम्हाला किती वेळा सांगावयाचे ? तुम्ही आम्हाला अहवालामध्ये अशी टीप का दिली आहे ? हे मला कळत नाही. सभापती महोदय, आता काय करावयाचे ते सांगा. मघाशी म्हटल्याप्रमाणे भाषा संचालनालय बुडवून तरी टाका नाहीतर महाराष्ट्र राज्याच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेची अशी विटंबना तरी करु नका, हे ..

. . . .2 व्ही-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

प्रकार थांबवा. कारण आता "अवहेलना" हा शब्द सुध्दा अपूरा पडत आहे. तुम्ही या राज्यामध्ये मराठी भाषेची होणारी विटंबना तरी थांबविणार आहात की नाही ? आता काय झाले की, मलाच कानफाट्या म्हणतात. कारण मराठीचा विषय निघाला की श्री.दिवाकर रावते उभे रहातात. आता मी कानफाट्या झालो आहे.तसेच नावे लिहिण्याच्या बाबतीत आहे.तुम्ही टी.व्ही.वरील बातम्या पहाव्यात. मी याबाबतीत सांगून-सांगून थकलो आहे. हा कोण अधिकारी आहे? तुमच्या अधिकाऱ्यांना बोलले तर फार वाईट वाटते. सामान्य प्रशासन विभागातील भाषा संचालनालयाचे जे अधिकारी आहेत, त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रा-मध्ये आदेश द्यावयास पाहिजेत. आता माझ्याकडे इंग्रजीतील नावांचे मस्टर आहे.पोलीस स्टेशनच्या सर्व पाट्या इंग्रजीमध्ये आहेत, त्याचे माझ्याकडे फोटो आहेत.परंतु तुम्ही याबाबतीत बदलच करावयास तयार नाही. आता काय करावयाचे? ते सांगा. या सगळयाबाबत कोण सांगणार आहे? सदनामध्ये दुसऱ्या विभागाचे बिचारे मंत्री बसलेले असतात आणि मग सामुदायिक जबाबदारी म्हणून त्यांना उठून बोलावे लागते की, होय सायबा, होय महाराजा. खरे म्हणजे त्यावेळी उपस्थित असलेल्या माननीय मंत्री महोदयांचा या विषयाशी काही संबंध नसतो, पण ज्यांच्याकडे याची जबाबदारी आहे, ते सटकतात. ही बाब गंभीर आहे. त्यामुळे याकडे लक्ष देण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य . . . .

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला एक मिनिट बोलावयाचे आहे. याठिकाणी सभागृहामध्ये आतील ए.सी.ची व्यवस्था आहे, त्याचा मागच्या बेंचवरील सन्माननीय सदस्यांना फार त्रास होतो. म्हणून जर तेथील ए.सी.ला केसिंग केले तर त्याचा डायरेक्ट फ्लो येणार नाही. तेव्हा याची नोंद घेऊन तसे करण्याबाबत संबंधितांना सांगितले तर बरे होईल.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर हे खरे आहे की, सन्माननीय सदस्यांनी सातत्याने भाषेच्या संदर्भात किंवा भाषा संचालनालयाकडून झालेल्या चुकांच्या संदर्भातील बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, यांना सांगू इच्छितो की,याबाबतीत ज्यांनी कोणी चुका केलेल्या असतील, त्यांना .....

. . . .2 व्ही-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार. . . .

निश्चितपणे सक्त ताकीद देण्याचे काम शासन निश्चित करेल आणि यापुढे अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत याची निश्चितपणे दक्षता घेतली जाईल.

----

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड)**

यानंतर कु.थोरात . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XLI OF 2009**

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE BOMBAY POLICE ACT, 1951 AND THE MAHARASHTRA MUNICIPALS COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

( चर्चा पुढे सुरु )

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी) : सभापती महोदय, फेरीवाल्यांच्या संबंधात विधानसभा विधेयक क्रमांक 41. हे अतिशय विधायक असे विधेयक याठिक्‌णी चर्चेसाठी आलेले आहे. कस्टकऱ्याच्या आणि स्वंय रोजगार कमविणाऱ्या घटकाच्या संबंधात अतिशय महत्वाचे असे हे विधेयक याठिकाणी मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपण जेव्हा फेरीवाला असे म्हणतो तेव्हा आपल्याला, आपल्या बिल्डिंगखालचा चणे, कुरमुरेवाला आठवतो. फळवाला येतो तो आठवतो. आपल्या दररोजच्या जीवनामध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यत असे अनेक घटक आणि लोक आपल्या समोर येतात हे सगळे जण फेरीवाले या व्याख्येत मोडतात. या फेरीवाल्यांच्या संदर्भात समज कमी आहेत आणि गैरसमजच जास्त आहेत. मी स्वत: त्यांचे नेर्तृत्व करतो. या मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये लाखो असे फेरीवाले आहेत की, ते डोक्यावर पाटया घेऊन किंवा छोटे स्टॉल टाकून आपला तसेच आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या व्यवसायाच्या माध्यमातून करीत असतात. म्हणून रोजगाराची परिभाषा, रोजगारच्या डेफिनेशन डिफाईन करतो. त्यासाठी आपल्याकडे विशिष्ट कायदे आहेत आणि त्या

कायद्याच्या कक्षेत राहून रोजगाराची व्याख्या करण्यात येते. परंतु या फेरीवाल्यांच्या बाबतीत नेहमीच अशी उदासिन भुमिका राहिलेली आहे की, हा फेरीवाला म्हणजे अतिक्रमण करणाराच आहे की काय? असे चित्र समाजामध्ये विशेषत: मुंबई,नागपूर,पुणे आणि नाशिक या सारख्या मोठया शहरांमध्ये पहायला मिळते. या विधेयकाच्या माध्यमातून कलम 313(ड) अन्वये फेरीवाल्यांची व्याख्या डिफाईन करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि यामध्ये जे सूचित केलेले आहे त्याचे मी खऱ्या अर्थाने स्वागत करतो. आता आपल्याला ठरवता येईल की, हा फेरीवाला म्हणजे नक्की कोण? तो कुठे बसणार आहे? तो काय करणार आहे? याचे विश्लेषणही यामध्ये केलेले आहे. म्हणून या विधेयकाच्या बाबतीत त्यांचे नेतृत्व करणारा एक छोटासा कार्यकर्ता म्हणून, त्यांचा नेता म्हणून मला याठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटेल की, गेली अनेक वर्षे आम्ही झगडत आहोत. महानगरपालिकेत त्यांच्या अधिकारासाठी आम्ही झगडत असतो. पण त्यांना अधिकार कसले? जर त्यांची व्याख्याच नाही तर मग अधिकार कसले? अशा प्रकारची जी स्थिती तयार झाली होती ती स्थिती या व्याख्येमुळे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी याचा खुलासा केलेला असल्यामुळे त्यांच्या फायद्याचे होईल. सभापती महोदय, यामध्ये हे जानने गरजेचे आहे की, फेरीवाल्याच्या संबंधामध्ये केंद्र शासनाचे धोरण ठरलेले आहे. आपण यासंदर्भात काही नवीन करायला निघलेलो नाही. केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी व्हावी अशा प्रकारचे निर्देश माननीय सुप्रिम कोर्टाने राज्य शासनाला दिलेले आहेत. या संदर्भातील अनेक केसेस आम्ही लढत आहोत. अनेक संघटना सुप्रिम कोर्टात गेलेल्या आहेत. आम्ही सुध्दा या फेरीवाल्यांच्या बाबतीत सुप्रिम कोर्टामध्ये लढत आहोत. म्हणून राज्य शासनाने जे पाऊल उचलले आहे, त्याचे मी स्वागत करीन. आता या फेरीवाल्यांना कायद्याच्या कक्षेत बसवून, त्यांची व्याख्या करुन, त्यांची नोंदणी करुन, काही विभाग डिफाईन करुन त्यांना रोजगाराचा हक्क देण्याचा या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे, म्हणून मी शासनाचे स्वागत करतो.

सभापती महोदय, या विधेयकाला अनेक कंगोरे असू शकतील, अनेक उपविभाग असू शकतील. नोंदणी हा विषय पूर्वी नव्हता. सुप्रिम कोर्टाच्या निर्देशानुसार आपल्याला आज नोंदणी अनिवार्य आहे. तो फेरिवाला असला, हॉकर असला तरी त्याला नोंदणी अनिवार्य आहे आणि हे राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टिने, शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने पर्यायाने देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय जरुरीचे आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

त्याचा सुध्दा या बिलामध्ये अंतर्भाव केलेला आहे. त्याची जी नोंदणी आहे ती झाली पाहिजे. नोंदणी म्हटले की, बाबू लोकांशी संबंध आला. मग त्यासाठी यंत्रणा तयार केली पाहिजे. या बाबू लोकांच्या मर्जीनुसार नोंदणी होणार आहे काय ? ही नोंदणी पारदर्शक असावी. नोंदणीचे निकष शासन ठरविणार आहे. परंतु निकषांमध्ये काही मुलभूत बदल नोंदणीच्या वेळी करावे लागतील. जेणे करुन बोगस नोंदणी होणार नाही. ज्यांची नोंदणी होणार आहे त्यांना एखादी घटना घडली तर त्यासाठी जबाबदार धरता येईल. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, झवेरी बाजारामध्ये बॉम्ब स्फोट झाला होता. या बाजारामध्ये हॉकर्सची व लोकांची मोठी गर्दी असते. त्याचप्रमाणे रस्त्यावरील साहित्याची देखील गर्दी असते. दोन्ही बाजूच्या ठिकाणी साधारणपणे 7 हजार हॉकर्स आहेत. मी त्या लोकांचे नेतृत्व करतो. तसेच अनेक संघटना त्यांचे नेतृत्व करीत आहेत. परंतु त्या भागाच्या संदर्भात महानगरपालिकेने एक फतवा काढला की, तुम्हाला तेथे साहित्य विकता येणार नाही. सुरक्षेच्या दृष्टीने केलेली ती कार्यवाही मी समजू शकतो. कारण ती शहराच्या दृष्टीने, राज्याच्या दृष्टीने, नागरिकांच्या दृष्टीने महत्वाची आहे. हे लोक स्वयं रोजगार करीत आहेत. त्यांना काही पर्याय देणार आहात काय ?

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दादरमधील हॉकर्स प्लाझासंबंधी उल्लेख केला आहे. त्याबाबत त्यांनी लढा झाला, मी देखील लढा दिला आहे. त्याबाबत त्यांचा अनुभव कटू आहे आणि माझाही अनुभव कटू आहे. त्याठिकाणी हॉकर्स झोन करणे हे प्रॅक्टीकली योग्य होते का हा मुद्दा आहे. तरी सुध्दा त्याठिकाणी हॉकर्स प्लाझा बांधण्यात आला. त्या इमारतीमध्ये त्यांना शिफ्ट करण्यात आले. त्यादृष्टीकोनातून फेरीवाला याची व्याख्या महत्वाची आहे. हॉकर्स झोन करुन हा प्रश्न सुटणार नाही. डोक्यावर पाटी घेऊन फिरणारे अशी त्याची व्याख्या केली आहे. डोक्यावर पाटी घेऊन किंवा पथारी मारुन बसतात ते फेरीवाले. या हॉकर्स झोनच्या प्रश्नाचा मोठया प्रमाणावर प्रचार व प्रसार करण्यात आला. दादर येथे 4 मजली इमारत बांधण्यात आली. या इमारतीमध्ये प्रत्येकाला खालच्या मजल्यावर जागा पाहिजे होती. त्यामुळे वरच्या मजल्यावर कोणी जाण्यास तयार नव्हते. साधारणपणे हे हॉकर्स झोन रेल्वेच्या ठिकाणी, बाजाराच्या ठिकाणी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.भाई जगताप....

असावेत, रेल्वेला लागून असलेल्या रस्त्यावर असावेत अशी अपेक्षा असते. कारण एखादा नागरिक घरी येत असताना त्याला दैनदिन गरजेच्या त्याठिकाणी वस्तू स्वस्त दरामध्ये मिळत असतात. हे झोन म्हणजे त्या लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. ही समाजाची, तुमची व आमची गरज आहे. या लोकांकडे उपेक्षेने पाहिले जात होते. अशाप्रकारची नोंदणी झाल्यामुळे त्यांचा लोकांना फायदा होईल. नोंदणीच्या बाबतीत काही अटी व शर्थी घातलेल्या आहेत, त्या गरजेच्या आहेत. ज्या वातावरणामध्ये संपूर्ण जग वावरत आहे, सर्वत्र भीतीचे सावट आहे. पुणे व मुंबई सारख्या शहरामध्ये भीतीचे सावट आहे. आतंकवाद्यांचे लक्ष्य गर्दीचे ठिकाण असते. ज्याठिकाणी मोठी वर्दळ आहे, बाजार आहे,

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

नागरिकांची ये-जा असते अशा ठिकाणी बॉम्बस्फोट झालेले आहेत हे तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही. म्हणून या फेरीवाल्यांचे रजिस्ट्रेशन होणे अतिशय महत्वाचे आहे. हे रजिस्ट्रेशन करीत असताना महाराष्ट्रात रहाणारे, शहरामध्ये राहाणारे असे निकष ठेवता येणार नाहीत. कारण देशाच्या घटनेने देशातील प्रत्येक नागरिकाला दिलेले अधिकार तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाहीत....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचे भाषण अपूर्ण आहे. आता पुढील विधेयक घेण्यात येईल.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई पण कर (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXXI OF 2010

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY BETTING TAX ACT, 1925.)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 31, मुंबई पण कर अधिनियम, 1925 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

सभापती महोदय, राज्याचे महसूल उत्पन्न वाढावे या हेतूने हे विधेयक आणलेले आहे. या राज्यामध्ये प्राधान्याने मुंबई आणि पुण्यासारख्या शहरामध्ये अश्व शर्यती होतात त्यावर सद्य:स्थितीत 10 टक्के पण कर आहे. त्यामध्ये 10 टक्क्यांनी वाढ करुन तो 20 टक्के करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे परवानाधारक बुकमेकर आहेत त्यांच्या माध्यमातून पण लावण्यावर पण कर, बेटिंग टॅक्स 20 टक्के आहे. त्यामध्ये 10 टक्के वाढ करुन तो 30 टक्के करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक 20.1.2010च्या बैठकीमध्ये घेण्यात आला. पणगणना यंत्रावर पण लावणा-या व्यक्तीने होड किंवा पण या स्वरुपात लावलेल्या रकमेवरील शुल्कात 10 टक्के वाढ करुन एकूण 20 टक्के इतके शुल्क आकारण्याची मुभा देण्याबाबतची अधिसूचना 1 एप्रिल 2010 ला प्रसिध्द करण्यात आली. मुंबई पण कर अधिनियम 1925च्या कलम 8च्या तरतुदीनुसार 25 टक्क्या पर्यन्त शासनाला पण करामध्ये वाढ करण्याचे अधिकार आहेत. मात्र बुकमेकर वरील करात 10 टक्के वाढ करुन तो 30 टक्के करावयाचा असल्यामुळे कायद्याच्या कलम 8मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, अश्व शर्यतीमध्ये सहभाग घेणारा वर्ग हा समाजातील उच्च उत्पन्न गटातील वर्ग आहे. सर्वसामान्य माणूस या अश्व शर्यतीमध्ये भाग घेत नाही.

...नंतर श्री. भोगले.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : महोदय, 27.80 कोटी एवढी रक्कम करापोटी मिळाल्याचे येथे सांगितले त्यात घोड्यांच्या शर्यती व इतर शर्यतींच्या माध्यमातून ही रक्कम जमा केली जाते. यासंदर्भात माझ्ा असा प्रश्न आहे की, शासनाला आणखी कशा कशातून महसूल जमा करावयाचा याचा विचार केला तर अशा अनेक गोष्टी आहेत की, त्यातून शासन महसूल जमा करु शकते. म्हणजे आपल्यासमोर जेवणाचे ताट तयार आहे परंतु आपण त्या ताटावर बसण्याची हिंमत करीत नाही. आयपीएल काय आहे, ज्याप्रमाणे आपण परवानाधारक बुकी म्हणून घोड्यांच्या शर्यतीच्या संदर्भात उल्लेख केला, म्हणजे ज्यांनी हक्क विकत घेतले आहे ते हे बुकी. आज आयपीएलकडे किती तरी करोडो रुपये येतात यात किती लोकांची चौकशी चालू आहे. राज्यशासनाला खरोखरच कर वसूल करावयाची घाई झाली असेल आणि राज्याची आर्थिक स्थिती सुधारावयाची असेल तर आज आपल्या राज्यात दुसऱ्यांदा आयपीएलच्या मॅसेस सुरु झालेल्या आहेत. आम्ही सर्वपक्षीय आमदारांनी मागणी केली तरी देखील अशा आयपीएलवर कोणताही टॅक्स शासनाने लावला नाही याचे उत्तर कारणांसह मिळाले पाहिजे. आपण आणखी यात असे म्हटले आहे की, सधन लोकच अशा घोड्यांच्या शर्यतींचा फायदा घेतात परंतु आयपीएलच्या मॅचेस पाहण्यासाठी जे तिकिट असते ते किमान 40 हजार पर हेड एवढे असते. तसेच त्या ठिकाणी मिळणाऱ्या रिफ्रेशमेंटचा विचार केला तर पेप्सी आणि कोकची बाटली 100 रुपयाला व त्यापेक्षा अधिक किमतीला मिळते, यासंबंधीची माहिती मंत्री महोदयांना आहे काय असे मी विचारले असता ते बसूनच "नाही" असे म्हणतात. म्हणून मी अशी विनंती करतो की, प्रथम याबाबतची माहिती मंत्री महोदयांनी करुन घ्यावी व नंतरच हे विधेयक सदनात विचारार्थ आणावे. अशा आयपीएलच्या मॅचेसवर कर लावत नाही म्हणून शिवसेना पक्षाच्या वतीने कोर्टात दाद मागितली आहे. तसेच ॲडव्हर्टाईजमेंटमध्ये किती तरी पैसा खर्च होतो आणि त्याचे उत्पन्न अशा आयपीएलला मिळते. यामध्ये कोणाचे पैसे गुंतले आहेत हा सर्व पैसा जमा केला असता तर आदिवासी व गरीब माणूस, कुपोषित बालकांना त्याचा फायदा झ्ााला असता. मुंबईतील रस्ते, झोपडपट्टयांमध्ये सुधारणा झाली असती, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होतात त्यांना मदत करता आली असती पण शासनाला हे करायचे नाही व जनतेला वाऱ्यावर सोडून इकडे मात्र आयपीएलच्या मागे शासन लागत आहे. कारण त्यामागे मोठमोठे लिडर्स आहेत म्हणूनच अशा आयपीएलवर कर लावण्याचे शासनाचे धाडस होत नाही.

PFK/ SBT/ D/ KTG/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 15:25

डॉ. दीपक सावंत .......

अशा प्रकारे एकतर्फी कर लादण्याची वृत्ती योग्य नाही. म्हणून आयपीएलचा वार्षिक टर्न ओव्हर किती आहे, आयपीएलला जाहिरातीमधून किती पैसे मिळतात. शेवटी टीम विकत घेऊन मॅच फिक्सिंग हा प्रकार आलाच आणि त्यामुळे कोण जिंकणार हे अगोदरच ठरलेले असते. यामध्ये कोणाचे पैसे गुंतलेले आहेत, कोण अडकले आहे तर ज्यांच्याकडे खूप पैसे आहेत हेच लोक आयपीएलमध्ये आहेत. त्याच्या डिटेलमध्ये मी जाणार नाही कारण सर्वसामान्य माणूस हा मॅच पाहण्यासाठी जाऊ शकत नाही तर तो आपल्या घरातच जुन्या टी.व्ही. संचावरच ती मॅच बघण्यात धन्यता मानतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

परंतु त्याची देखील दिशाभूल केली जाते. आपण केवळ अश्व शर्यतीवर टॅक्स लावत आहात त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे. सामान्य माणसाला फसवून लोक श्रीमंत होत असतात. परंतु अश्व रेसींगमुळे किती करोडपती रस्त्यावर आलेले आहेत याची आपण माहिती घेतली आहे काय ?टॅक्स लावण्याच्या संदर्भात आपण एकतर्फी धोरण अवलंबविणार आहात काय ? मग आपण आयपीएल वर का टॅक्स लावला नाही ? आयपीएल वर टॅक्स लावला तर आपल्या राज्याच्या उत्पन्नात भर पडेल आणि आज आपल्या राज्यावर जे करोडो रुपयांचे कर्ज आहे ते यातून फेडले तर आपल्याला रिलीफ मिळू शकेल त्यामुळे मी या ठिकाणी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा विचार करावा एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 31, मुंबई पण कर अधिनियम, 1925 या बिलावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या विधेयकातील उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "मुंबई पण कर अधिनियम, 1925 (1925 चा मुंबई 6 ) यांच्या कलम 8 अन्वये राज्यातील किंवा राज्याबाहेरील कोणत्याही शर्यतीच्या जागावर होणा-या कोणत्याही शर्यतीवर लायसन्सदारांनी निराळया राखून ठेवलेल्या परिवेष्ठित जागेत केलेल्या पणाच्या बाबतीत, पैसे लावणा-या व्यक्तीने लायसन्स मिळालेल्या बुकमेकरास दिलेलया किंवा देण्याचे कबूल केलेल्या सर्व पैशावर, अशा संपूर्ण रकमेच्या 25 टक्क्याहून अधिक नाही एवढया दराने, पण कर आकारण्यासाठी राज्य शासनास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत."

सभापती महोदय, मी जेव्हा प्रायमरी शाळेत शिकत होतो तेव्हा आम्हाला शंकरपट नावाचा धडा होता. यामध्ये शेतकरी आपल्या बैलांची शर्यत लावून आनंद व्यक्त करीत होता. आज या देशातील 70 टक्के शेतकरी बैलजोडीच्या सहाय्याने आपले संसार चालवितात. हे शेतकरी शंकरपटाच्या निमित्ताने पैजा लावत असतात. आमच्या विदर्भात एक एक दीड दीड लाखाची जोडी शर्यतीमध्ये उतवरली जाते व आनंद व्यक्त केला जातो त्यामुळे या शेतक-यांना आपण लायसन्स कसे देणार आहात ? बैलांची शर्यत गावातील शेतकरी मिळून लावत असतात. तसेच शेतकरी जे महोत्सव भरवितात त्यामध्ये सुध्दा मोठ मोठया पैजा लावल्या जातात, मोठ मोठे पुरस्कार दिले जातात. 10-10, 20-20 हजार रुपयांच्या पैजा लावल्या जातात. यामध्ये टी.व्ही. मोटरसायकल, सायकल वगैरे वस्तू पारितोषिकांमध्ये दिले जातात. बैलाच्या नाकातील वेसणापासून ते धुंगरापर्यंतचा बक्षिसामध्ये समावेश असतो. त्यामुळे शासन महोत्सव आणि बैलशर्यतीला कशा प्रकारे टॅक्स लावणार आहे व कशा प्रकारे टॅक्स फ्रि करणार आहे ? शर्यतीमधील बैल थकू नये म्हणून या शर्यतीमधील बैलांना टेम्पोमध्ये नेले जाते. दोन-दोन, तीन तीन दिवस हा महोत्सव सुरु असतो. शंकरपटाच्या निमित्ताने जोडीदार तर जिंकतोच परंतु या शर्यतीवर बाहेर सुध्दा सट्टा लावला जातो. कोणती जोडी जिंकेल यासाठी 50-50 हजार रुपयांपर्यंत सुध्दा सट्टा लावला जातो.

...3..

श्री.केशवराव मानकर ...

सभापती महोदय, दोन कोंबडयांना काती बांधून त्यांना लढवले जाते व त्यावरही शर्यत लावली जाते. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये, खेडयापाडयामध्ये अशा प्रकारचा जुगार आज सुध्दा लावला जातो. त्यामुळे याला सुध्दा आपण लायसन्स देणार आहात काय ? यांच्याकडून सुध्दा आपण टॅक्स वसूल करणार आहात की, त्यांना टॅक्स फ्री करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. आज अनेक शर्यती होत असतात परंतु त्या शर्यती गुप्त होत असतात. क्रिकेटमध्ये कोणत्या बॉलवर चौका लागेल, कोणत्या बॉलवर सिक्स लागेल यावर सुध्दा सट्टा लावला जात असतो. देशामध्ये यावर मोठया प्रमाणात सट्टा चालतो त्यावर आपण कोणत्या प्रकारचा टॅक्स लावणार आहात ? अश्व घोडयांची शर्यत मुंबईत चालते त्यासंदर्भातच हे बिल आणलेले आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

हे सर्वव्यापी विधेयक असू शकत नाही. राज्यात जेवढ्या म्हणून शर्यती चालतात त्यांचा या विधेयकात समावेश करावा, अशी मी सूचना करीत आहे. म्हणूनच हे विधेयक त्रुटीपूर्ण आहे असे मला म्हणावयाचे आहे. 30 टक्के कर आपण वसूल करणार आहात. तो आपण खरोखरच वसूल करणार आहात काय ? मी 30 हजार रूपयांचे बुकींग केले आहे, 30 टक्के टॅक्स आपण घेऊन टाका असे कोणी प्रामाणिकपणे सांगणार आहे काय ? हा टॅक्स आपण कशा प्रकारे वसूल करणार आहात ? तिकिटाच्या माध्यमातून वसूल करणार आहात की नगदी स्वरूपात वसूल करणार आहात हे ही या बिलामध्ये स्पष्ट होत नाही. ते ही स्पष्ट झाले पाहिजे असे माझे मत आहे. ह्या विधेयकातून शेतकरी, शेतमजूर यांना बाजूला ठेवले तर योग्य होईल असे मला वाटते.

...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती मला एक पॉईंट ऑफ प्रोसिजर माननीय सभापतीच्या उपस्थितीत मांडावयाचा आहे. आताच एक पत्र मला माननीय सचिवांनी दिलेले आहे. त्यासंदर्भात पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करावयाचा आहे. मी माननीय सभापतींना पत्र दिले होते त्यासंदर्भात हे पत्र आहे. त्यामुळे आपण माननीय सभापतींना बोलावून घ्यावे. ते आल्यानंतर मी माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित करीन. माननीय सभापती महोदय येई पर्यंत सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना भाषण करण्यास अनुमती द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई पण कर (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XXXI OF 2010**

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY BETTING TAX ACT, 1925. )

( चर्चा पुढे सुरु .....

श्री.किरण पावसकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 31-मुंबई पण कर (सुधारणा) विधेयक यावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, पैसे लावणाऱ्या व्यक्तिने लायसेन्स मिळालेल्या बुक मेकरास दिलेल्या किंवा देण्याचे कबूल केलेल्या सर्व पैशावर अशा संपूर्ण रकमेच्या 25 टक्केहून अधिक नाही एवढ्या दराने पण कर आकारण्यासाठी राज्य शासनास अधिकार प्रदान करण्यात आले आहे, असे नमूद केले आहे. हे विधेयक अश्व शर्यत, बैलगाड्यांची शर्यत यांच्या संदर्भात असू शकते. मी सभागृहाचे लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. कसोटी क्रिकेट सुरू होते त्यावेळी आपल्या देशाचे कर्णधारपद श्री.अझरुद्दीन यांच्याकडे होते. आता ते खासदार आहेत. आयबीएन लोकमतवर काल रात्री 12.30 वाजता मुलाखती दाखविण्यात आल्या. सदनाला माहिती असावी म्हणून मी ही बाब सदनाच्या निदर्शनास आणत आहे. श्री.देव या निवृत्त आयकर आयुक्ताने काल मुलाखत दिली. कसोटी क्रिकेटमध्ये काय चालते याचा त्यांनी तपास केला होता. क्रिकेटमधून किती उलाढाल होऊ शकते याचा त्यांनी शोध घेतला. आपल्याला महसूल वाढवायचा असेल तर शर्यतीमध्ये, क्रिकेटमध्ये किती उलाढाल होते हे कळले पाहिजे. जर उलाढाल किती होते हे कळत नसेल तर आपण 25 टक्के कर कशावर लावणार आहात ? श्री.देव यांनी आपल्या मुलाखतीमध्ये सांगितले की, अझरुद्दीन कर्णधार असताना आम्ही जो तपास केला होता त्यात 300 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार आढळला होता. बीसीसीआयचे ऑफिस मुंबईमध्ये आहे. आजही आयपीएल संदर्भातील बातम्या दूरदर्शवर, वर्तमानपत्रामध्ये येत आहेत. हा विषय गंभीर झालेला आहे. आयपीएलचे जाळे सुद्धा मुंबई शहरामध्ये आहे. बीसीसीआयचे प्रमुख कार्यालय मुंबईमध्ये आहे. क्रिकेट नियामक मंडळ मुंबईमध्ये आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

आय.पी.एल.ची महत्वाची सहा कार्यालये मुंबई शहरात आहेत त्यातील एक कार्यालय फोर सिझन हॉटेलमधून चालविण्यात येत असून त्या ठिकाणी देखील दोन दिवसापूर्वी धाड टाकण्यात आली होती.सभापती महोदय, राज्याचा महसूल वाढला पाहिजे. राज्याचे उत्पन्न वाढले तर राज्यावरील कर्जाचा बोजा कमी होऊ शकेल.अशी राज्य सरकारची खरोखर भूमिका असेल तर यामध्ये किती उलाढाल होते हे कळणे गरजेचे आहे. इनकम टॅक्स कमिशनर श्री.देव यांनी जी आकडेवारी सागितली त्यावरुन आय.पी.एल.ची 30 हजार कोटी रुपयाची उलाढाल होत आहे. या विधेयकामध्ये बुक मेकरचा उल्लेख करण्यात आलेला आहे. हे बुक मेकर कोण आहेत ? आय.पी.एल.ला सर्व प्रथम खेळाडूंना बूक करावे लागते. उद्योगपती प्रथम खेळाडूंना विकत घेत असतात. दोन किंवा चार कोटी रुपयांना ते विकत घेत असतात तेव्हा खेळाडूंना विकत घेणा-या उद्योगपतीवर टॅक्स लावण्यात येणार आहे काय ? अशा प्रकारे खेळाडूंना विकत घेतल्यानंतर एक टीम तयार होते आणि ती आय.पी.एल.ला जाते.त्या टीमवर कोणत्या पध्दतीने टॅक्स लावण्यात येणार आहे हा टॅक्स लावण्यासाठी शासनाला त्या पध्दतीचे पेपर्स मिळाले आहेत काय ? केंद्रीय परराष्ट्र मंत्री श्री शशी थरुर यांना या प्रकरणावरुन राजीनामा द्यावा लागला आहे त्याचप्रमाणे आज दुपारी 2.00 वाजता लोकसभेचे कामकाज थांबवून केन्द्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल याच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे ........

श्री.भाई जगताप : माझा हरकतीचा मुद्दा आहे.......

श्री.किरण पावसकर : राज्य शासनाला खरोखर आपले उत्पन्न वाढवावयाचे असेल आपल्यावरील कर्जाचा बोजा कमी करावयाचा असेल तर हे जाणून घेण्याची गरज आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा पाईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. केन्द्रीय मंत्री श्री प्रफुल्ल पटेल यांनी राजीनामा दिला आहे किंवा नाही यासंबंधीची माहिती पॉईट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून आम्हाला मिळाली पाहिजे. केन्द्रीय मंत्री श्री प्रफुल्ल पटेल हे महाराष्ट्रातील आहेत तेव्हा लोकसभेमध्ये नेमके काय झालेले आहे याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझ्या भावना थोडया वेगळया आहेत. सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप यांनी त्या समजावून घ्याव्यात एका केन्द्रीय मंत्र्यांना राजीनामा द्यावा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ..

लागला आहे आणि दुस-या केन्द्रीय मंत्र्यांचा राजीनामा मागितला जात आहे. 3 हजार कोटी रुपये वा 30 हजार कोटी रुपयापर्यतची माहिती समोर यावयास लागली आहे. केन्द्रीय मंत्र्यांमध्ये जशी लागण लागली आहे तशी लागण राज्यामध्ये लागता कामा नये व आपल्या राज्यातील मंत्री त्यामध्ये सापडू नयेत या चांगल्या उद्देशाने मी ही बाब आपल्यासमोर मांडत आहे. माझा उद्देश सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतला पाहिजे. श्री. अझरुद्दीनच्या वेळी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला होता त्यावेळी नेमके किती पैसे मिळालेत यासंबंधी आपल्याला माहिती मिळालेली नाही.जर त्या पैशाची वसुली झाली असेल तरच त्यावर टॅक्स लावता येईल परंतु जर वसुली झालीच नाही तर टॅक्स लावता येणार नाही..........

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*पॉईट ऑफ इन्फर्मेशन बाबत*

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ इन्फर्मेशन आहे. अत्यंत अवमान करणारे एक पत्र माझ्या हातामध्ये आलेले आहे. त्या पत्रामुळे केवळ माझा अवमान झालेला नाही तर या सदनामधील पक्षीय अवमानाचे ते पत्र् असल्यामुळे त्यासंबंधी माझे म्हणणे मांडण्यासाठी मी उभा आहे.सभापती महोदय, आपल्याला हे माहीत आहे की हा वादाचा विषय नाही पंरतु माझ्याकडे ते पत्र आलेले असल्यामुळे दुर्देवाने त्यावर बोलण्यासाठी मला येथे उभे रहावे लागत आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला दिनांक 2 फेब्रुवारी 2010 रोजी एक पत्र दिले होते. ते पत्र कशाच्या आधारावर दिले होते ? विधानमंडळ सचिवालयाकडून महाराष्ट्र विधान परिषद सदस्यांची यादी छापण्यात येते आणि कोणत्या पक्षाचे कोण सदस्य आहेत आणि त्यांची संख्या किती आहे इत्यादी माहिती त्यात दिली आहे......

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परिषदेच्या संदर्भामध्ये "महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची यादी" या अधिकृत पुस्तकामध्ये आपल्या मान्यतेने संख्याबळ जाहीर झाले आहे. या यादीमध्ये पक्षनिहाय सदस्य संख्या देण्यात आली आहे. त्यामध्ये इंडियन नॅशनल कॉंग्रेस 22, नॅशनल कॉंग्रेस पार्टी 21, भारतीय जनता पार्टी 8, शिवसेना 9, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) 2, पीझंट्स ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया 1, लोकभारती 1, अपक्ष 10 आणि रिक्त पदे 4. ही सदस्य संख्या अधिकृतपणे जाहीर करण्यात आल्यानंतर विरोधी पक्षामध्ये भारतीय जनता पक्षाचे सदस्य 8, आणि शिवसेना पक्षाचे सदस्य 9 असल्यामुळे म्हणजेच आमची सदस्य संख्या 1 ने जास्त झाल्यामुळे विरोधी पक्षनेते पद हे शिवसेना गटाकडे आले पाहिजे असे मी आपणास साधे पत्र दिले होते. खरे म्हणजे हे पत्र मी फेब्रुवारी महिन्यामध्ये दिले होते. त्यानंतर दीड महिन्यांनी हे अधिवेशन सुरु झाले. आपण आम्हाला अमूक वेळेला कां सांगितले नाही? तमूक वेळेला कां सांगितले नाही? असे आम्ही आपणास विचारु शकत नाही. कारण हा आपला अधिकार आहे. आम्ही त्याला आव्हान देण्याचा प्रश्न नाही. त्यानंतर आम्हाला याबाबत काय सांगावयाचे आहे? हे ऐकून घेण्याकरिता अधिवेशन संपावयाच्या दोन दिवस अगोदर आपण आम्हास बोलावून घेतले व आमचे म्हणणे ऐकून घेतले. त्याबाबतही आमची तक्रार नाही, तो आपला अधिकार आहे. आपल्या संबंधित सचिव खात्यातील सर्व अधिकारी कायद्यातील तज्ज्ञ आहेत, आणि ते आहेत असा माझा ठाम निर्धार आणि समज आहे. त्यामुळे त्यांच्याशी सल्लामसलत करणे किंवा याबाबत निर्णय घेण्यापूर्वी आणखी काही संदर्भ घ्यावयाचे असतील याकरिता कदाचित हा कालावधी लागला असू शकेल. कारण खालच्या सभागृहामध्ये भारतीय जनता पक्षाचे 46 सदस्य आहेत, आणि आमच्या शिवसेना पक्षाचे 45 सदस्य आहेत. हे संख्याबळ त्याठिकाणी मान्य झाले आहे.

सभापती महोदय, हे संख्याबळाचे पत्र आपणास दिल्यानंतर आपण त्यावर निर्णय कां देत नाही? असे आम्ही कधीही आपणास विचारावयास आलो नाही. माननीय श्री. भाऊसाहेब फुंडकर आणि मी आलो नाही. माननीय श्री. भाऊसाहेब "माझ्या जागेवर बसता काय?" असे मला म्हणाले. त्यावेळी मी त्यांना म्हटले की, "भाऊसाहेब तुम्ही आहात ना, तुम्ही आणि आम्ही वेगळे नाही," परंतु हा आमच्या हक्काचा आणि पक्षाचा विषय आहे, तो पक्षाचा विषय असू शकतो. त्यामध्ये व्यक्तिगत विषय नसतो. विरोधी पक्षनेतेपद हे शिवसेना गटाला मिळावे अशी मी आपणाकडे विनंती केली

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

होती. सभापती महोदय, आपण निर्णय देतांना "सभापतींचा निर्णय" हा प्रथा, परंपरेनुसार नसतो. ज्यावेळी हा निर्णय दिला जातो त्यावेळी त्याला घटनात्मक असा एक अधिकार आहे. आणि त्यामुळे घटनेने दिलेल्या तरतुदीप्रमाणे आपणास करावे लागते.

सभापती महोदय, माननीय श्री. अनंत कळसे यांचे पत्र क्र.19351/ई-2/दि.23.4.2010 मला प्राप्त झाले आहे. हे अधिवेशन संपण्यासाठी काही तास शिल्लक असतांना हे पत्र माझ्या हातामध्ये कां दिले? हे मला कळले नाही. त्यामध्ये असे म्हटले आहे की, प्रति, श्री. दिवाकर रावते, वि.प.स. व गटनेते शिवसेना विधीमंडळ पक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद. मला विधीमंडळ शिवसेना पक्षाचा गटनेता म्हटल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. विषय : विधानपरिषदेतील विरोधीपक्ष नेतेपद घोषित करण्याबाबत. संदर्भ: माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांना अग्रेषित केलेले आपले दिनांक 2 फेब्रुवारी, 2010 रोजीचे पत्र. महोदय, "उपरोल्लेखित विषयाच्या संदर्भात निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शिवसेना विधीमंडळ पक्षाचे संख्याबळ, भारतीय जनता विधीमंडळ पक्षाचे संख्याबळ व माननीय श्री. पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेते यांना असलेला अपक्षांचा पाठिंबा व त्या पक्षाचे राष्ट्रीय पातळीवरील स्थान," हा तर आता नवीनच विषय आहे. हे कुठेही मला घटनेमध्ये मिळाले नाही. स्थानिक पक्ष हा दुय्यम आहे, आणि अपक्षांचे राष्ट्रीय पातळीवरील स्थान याबाबत घटनात्मक काय तरतूद आहे ही मला समजावून सांगितली तर आनंद होईल. कारण पक्ष हा पक्ष असतो, तो मान्यताप्राप्त असतो. विरोधी पक्षनेतेपदाला मान्यता देण्यासंदर्भातील संसदीय लोकशाहीची प्रथा काय आहे? ती या पत्राबरोबर माझ्याकडे आली नाही. "परंपरेचा गाढा अभ्यास असलेले, महाराष्ट्र विधानपरिषदेचे दीर्घकाळ राहिलेले सभापती कै. वि.स. पागे समितीची शिफारस," ती शिफारस काय आहे? ती माझ्याकडे आलेली नाही आणि ती मला माहीत नाही. "लोकसभेचे पहिले अध्यक्ष श्री. मावळंकर यांनी दिलेले निदेश, प्रथा, परंपरा" तत्कालीन माननीय सभापती, विधानपरिषद यांनी विरोधी पक्षनेते पदाच्या संदर्भात वेळोवेळी दिलेले निर्णय काय आहेत? ते मला माहीत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

विधान परिषदेतील संसदीय प्रथा-परंपरा, भारतीय संविधानातील तरतुदी यांचा एकत्रित, आता तरतूद म्हटल्यानंतर त्याबाबतीत सांगावयास हवे होते की, "घटनेतील ही अमुक तरतूद आहे" आम्ही उभे राहून असे सांगितले की, घटनेमध्ये अमुक म्हटलेले आहे, तर ते चालत नाही. तर त्या बाबतीत आम्हाला सांगावे लागते. पुढे असे म्हटलेले आहे की,"याचा एकत्रित विचार केल्यावरुन माननीय सभापती, विधान परिषद यांनी श्री.पांडुरंग फुंडकर, विधान परिषद सदस्य यांना विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पदावर पूर्वघोषित करण्यात आलेला निर्णय कायम करण्यात येत आहे."

हा आपला निर्णय आहे.आमची निर्णयाबद्दल तक्रार नाही. तसेच निर्णय हे प्रथा-परंपरेवर कधीपासून व्हावयास लागले ? असे आम्ही पाहिलेले नाही. कारण ते घटनात्मक असतात.विधानसभेमध्ये आमच्या पक्षाची संख्या एकने जास्त आहे आणि विरोधी पक्षनेते पदाचा विषय वादाचा नाही. आमची संख्या 1 ने जास्त आहे. मग सांगण्यात आले की, दोन-चार महिन्याचा प्रश्न आहे. आम्ही म्हटले की, ठीक आहे. जेवढे तास आम्हाला जेवढा अधिकार प्राप्त झालेला आहे, तेवढे दिवस राहू. मग यामध्ये असे म्हटलेले आहे की, अपक्षांचा पाठिंबा. पण कोण अपक्ष ? कारण माझ्याकडे जी पुस्तिका आहे, त्यानुसार तुम्ही जाहीर केलेले 10 अपक्ष आहेत. ते कोणत्याही पक्षाचे नाहीत. आपण जेव्हा माझ्याकडे पुरावे मागितले, तेव्हा मी पुरावे दिले. या सदनामध्ये येत असताना प्रत्येक सन्माननीय सदस्याला हे जाहीर करावे लागते की, मी कोण आहे ? ज्यावेळेला मी पक्षाच्यावतीने येतो, तेव्हा पक्षाचा अर्ज भरलला असतो आणि माझे नॉमिनेशन पक्षाने केलेले असते आणि व्ही.व्ही.फॉर्म भरलेला असतो. त्या व्यतिरिक्त अपक्ष निवडून येतात, तेव्हा आपण त्यांना अपक्ष म्हणून घेतो.

सभापती महोदय, अशा अपक्षांवर सुध्दा पात्र-अपात्रतेची अनेक बंधने आहेत. तेव्हा एक गट निर्माण झाला आणि गट सामील झाला.......तो होऊ शकतो. "लोकभारती पक्ष" हा एक गट झाला. त्यांना तुम्ही "लोकभारती पक्ष" म्हणून मान्यता दिली आहे, "अपक्ष " म्हणून मान्यता दिलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना शेतकरी कामगार पक्षाचे ते एकच सन्माननीय सदस्य म्हणून का असेनात, पण त्यांना पक्ष म्हणून येथे मान्यता दिलेली आहे. सभापती महोदय, याठिकाणी जेव्हा अपक्ष सभासद येतो, तेव्हा अपक्षांच्या बाबतीत जर त्यांनी अशा प्रकारचा पाठिंबा दिला असेल आणि तो कोणत्या पध्दतीने दिलेला आहे हे जर विदित झाले तर सूची-10 प्रमाणे

. . . .3 एफ-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पक्षांतराच्या कारणावरुन अपात्र होण्याच्या ज्या तरतुदी दिलेल्या आहेत, त्याबाबतीत (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, "पक्षांतर कारणावरुन अपात्र होणे" यातील तरतुदीच्या अधिनतेने कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असलेल्या सदस्याचे, जर अशा राजकीय पक्षाचे आपले सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिले तर तो अपात्र होतो. सभापती महोदय, त्याच्यापुढे असे म्हटलेले आहे की,"तो ज्या पक्षाचा सदस्य असेल, त्या राजकीय पक्षाकडून किंवा त्या पक्षाने त्या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अगर प्राधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाविरुध्द जाऊन, जर दोहोपैकी कोणत्याही बाबतीमध्ये अशा राजकीय पक्षाची, व्यक्तीची किंवा प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय अशा सभागृहात मतदान केले किंवा करण्याचे वर्जिले असेल आणि अशा मतदानापासून किंवा वर्जनापासून 15 दिवसाच्या आत अशा राजकीय पक्षाने किंवा व्यक्तीने, सदस्य किंवा प्राधिकाऱ्याने असे मतदानाचे किंवा वर्जनाचे कृत्य क्षमापित केलेले नसेल तर सभागृहाचे सदस्य म्हणून त्यांना रहाण्यास अपात्र होतात. म्हणून सभापती महोदय, . . .

(माननीय सभापती बेल वाजवतात)

सभापती महोदय, मी खाली बसू काय ? आपली तशी आज्ञा असेल तर मी खाली बसतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्हाला याबाबत बोलावयाचे आहे. असे नाही . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्या पक्षाच्या अस्तित्वाचा विषय उपस्थित झाला आहे . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, असे नाही, आम्ही शांत बसतो म्हणून असे चालणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला आहे, त्यावर सन्माननीय सदस्य आपली बाजू मांडत आहेत.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी एक मिनिट ऐकावे.सभापतींचा जो निर्णय असतो, तो अंतिम असतो.खरे म्हटले तर त्यावर सदनामध्ये चर्चा होत नाही अशी परिस्थिती आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते पॉईंट ऑफ प्रोसीजर असे म्हणून बोलण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी असे सांगितले की,प्रधान सचिवांनी त्यांना जे पत्र दिलेले आहे, त्यावर ते बोलत आहेत.त्यादृष्टीने

. . . .3 एफ-3

मी सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी सौजन्य म्हणून परवानगी दिलेली आहे. खरे म्हटले तर माझा निर्णय हा अंतिम आहे. त्यावर येथे चर्चा होणार नाही. सन्माननीय सदस्यांना स्पिकिंग ऑर्डर जर पाहिजे असेल, तर ती मी येथे वाचतो आणि तुम्हाला सगळे समजावून सांगतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुम्ही मला ते द्यावयास हवे होते. मग आमच्या पक्षाचे स्थान काय आहे ? राष्ट्रीय पक्ष म्हणून . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतीत ज्या गोष्टींचा उल्लख केलेला आहे, त्या तरी द्यावयास हव्या होत्या. संविधानातील तरतूदी, निर्णय . . . .

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आपण सांगितले की, सभापतींचा निर्णय अंतिम आहे. सभापती महोदय, आपल्याला . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब, मी आपल्याला बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही. आपण खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ठीक आहे. मग तेही वाचून दाखवू नका.चला . . .

**सभापती** : असे कसे ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आम्हाला कल्पना आहे की, आपला निर्णय अंतिम आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की,.....

**सभापती** : मी आपल्याला बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही.

( काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यावर आम्हाला बोलायचे आहे.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे, आपण स्पीकिंग् ऑर्डरही वाचू नका. हा विषयच संपला आणि ते सर्व कामकाजातून काढून टाकावे

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही या सभागृहात कशासाठी बसावयाचे?

(काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात )

**सभापती** :सभापतींनी घेतलेला निर्णय अंतिम असतो. त्यावर सदनामध्ये कोणतीही चर्चा होत नाही. असे असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते उठून उभे राहिले आणि त्यांनी मला सांगितले की, विधानमंडळाच्या प्रधान सचिवांनी मला जे पत्र दिलेले आहे त्याबाबतीत मला बोलावयाचे आहे. मी सौजन्य म्हणून त्यांना बोलायला परवानगी दिली. मी याठिकाणी स्पीकिंग् ऑर्डर वाचली तर आपल्या मनामध्ये जी शंका आहे ती निघून जाईल.

श्री. दिवाकरजी रावते, विधानपरिषद सदस्य व गट नेते, शिवसेना विधिमंडळ पक्ष यांनी दिनांक 2 फेब्रुवारी, 2010 रोजी मला पत्र लिहून अशी विनंती केली आहे की,......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या निर्णयाबद्दल आक्षेप नाही. पण आपण ती स्पीकिंग् ऑर्डर आम्हाला आधीच द्यावयास पाहिजे होती.

**सभापती** : मी आपल्याला सन्माननीय सदस्य श्री. रावते यांचे पत्र वाचून दाखवितो.

**"नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या निर्णयानंतर विधानपरिषदेच्या विरोधी पक्षाच्या संख्याबळात निर्णायक फरक झालेला आहे. शिवसेना सदस्यांची संख्या ही 9 असून भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांची एकूण संख्या 8 वर आली आहे. या संख्याबळानुसार विरोधी पक्षनेते पदाचा अधिकार हा शिवसेना पक्षाकडे येत असल्याने तशी घोषणा आपण तातडीने करावी, ही विनंती."**

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती.....**

तसेच श्री. संजय केळकर, विधानपरिषद सदस्य व प्रतोद, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दि. 24 फेब्रवारी, 2010 रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद मान्यतेसंदर्भात मला पत्र लिहिलेले असून सदर पत्राचा आशय असा आहे की,"महाराष्ट्र राज्य विधान मंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम,1978 च्या कलम ( 2) मध्ये विरोधी पक्ष नेत्यांची व्याख्या दिलेली असून त्याप्रमाणे, "राज्य विधान मंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या संबंधात विरोधी पक्षनेता म्हणजे त्यावेळी राज्य शासनाच्या विरोधी असलेल्या सर्वात जास्त सदस्य संख्या असणाऱ्या पक्षाचा नेता असलेला आणि विधानसभेचा अध्यक्ष किंवा यथास्थिती विधानपरिषदेचा सभापती यांनी तशी मान्यता दिलेला राज्य विधानसभेचा किंवा राज्य विधानपरिषदेचा सदस्य" अशी आहे.

यासंदर्भातील स्पष्टीकरण असे आहे की, "जेव्हा समान सदस्य असणारे विधानसभेतील किंवा विधानपरिषदेतील राज्यशासनाच्या विरोधात असलेले दोन किंवा अधिक पक्ष असतील तेव्हा विधानसभेच्या अध्यक्षांनी किंवा विधानपरिषदेच्या सभापतींनी पक्षाचे स्थान लक्षात घेऊन या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता अशा पक्षांच्या नेत्यांपैकी कोणत्याही एकाला विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता दिली पाहिजे आणि अशी मान्यता ही अंतिम व निर्णायक असेल."

सदर पत्रात पुढे असे नमूद केले आहे की, विधानपरिषदेच्या संबंधात मान्यताप्राप्त पक्ष किंवा गट म्हणजे सभापतींनी मान्यता दिलेले पक्ष किंवा गट, याचा उल्लेख विधानपरिषद नियम 2(स) मध्ये आहे.

सदर पत्राप्रमाणे

(1) श्री पांडुरंग फुंडकर,

(2) श्री. नितीन गडकरी,

(3) श्री.विनोद तावडे,

(4) श्री.संजय केळकर,

(5) श्री. केशवराव मानकर,

यानंतर श्री. खंदारे....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती....**

(6) श्री. पाशा पटेल

(7) श्री. जगदिश गुप्ता

(8) श्री. चंद्रकांत पाटील

(9) श्री. गुरुमुख जगवानी

(10) श्री. रामनाथ मोते

(11) श्री. भगवान साळुंखे

हे मान्यताप्राप्त गटात मोडतात.

याप्रमाणे भारतीय जनता पक्ष व किंवा गट हा नियम 2 (स) प्रमाणे सर्वात जास्त संख्या असलेला पक्ष किंवा गट असून सदर गटाला विरोधी पक्ष नेते पद मिळणे आवश्यक आहे.

विरोधी पक्ष नेते पद हे विधानपरिषदेच्या कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून या संदर्भात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्यांना बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

वरील पार्श्वभूमीवर मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की,

(1) भारतीय संविधानातील विरोधी पक्ष किंवा विरोधी पक्ष नेता यासंबंधात कोणत्याही तरतुदी नाहीत.

(2) महाराष्ट्र विधानसभा किंवा विधानपरिषदेच्या नियमात विरोधी पक्ष किंवा विरोधी पक्ष नेता यांची नियुक्ती कशी करावी यासंदर्भात कोणत्याही विवक्षित तरतुदी नाहीत.

(3) लोकसभा किंवा राज्यसभा नियमामध्ये सुध्दा यासंदर्भात विवक्षित तरतुदी नाहीत.

(4) मात्र, 1977 मध्ये संसदेतील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम हा पारित करण्यात आला. त्यातील तरतुदीवर उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**सभापती** .....

(5) कौल आणि शकधर यांच्या 'प्रॅक्टीस ॲण्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेंट' या पुस्तकात पागे कमिटीच्या शिफारशींचा उल्लेख आहे. श्री. वि. स. पागे हे महाराष्ट्र विधान परिषदेचे दीर्घ काळ सभापती होते. त्यांचा संसदीय प्रथा व परंपरा याबाबतीत गाढा अभ्यास होता. त्यांच्या अध्यक्षतेखाली पागे समिती नेमण्यात आली होती. या समितीने अशी शिफारस केली होती की,

"The Page committee recommended that the Leader of the largest recognised party, (whether a regular party or a party composed of a different parties or groups) should be recognised as the Leader of the Opposition." म्हणजेच, नियमित पक्ष किंवा वेगवेगळे पक्ष किंवा गट मिळून निर्माण झालेल्या पक्षाच्या अथवा गटाच्या नेत्याला विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देता येते.

(6) शिवाय, कौल आणि शकधर यांच्या ग्रंथात पक्षाला मान्यता देण्यासाठी 'अटी' या शीषर्काखाली खालील उल्लेख केलेला आहे.पृष्ठ क्रमांक 355,
लोकसभेचे अध्यक्ष श्री.मावळंकर यांनी असे निदेश दिलेले आहेत की,

i. त्यांची तत्व प्रणाली व कार्यक्रम समान असला पाहिजे. त्यांचा गट एकसंघ असला पाहिजे व सुविहित गट म्हणून ते काम करु शकले पाहिजेत.

ii. अशा पक्षांची सभागृहात व सभागृहाबाहेर यंत्रणा असली पाहिजे व समाजातील सर्व आर्थिक व सामाजिक प्रश्नांची त्यांचा संबंध असला पाहिजे.

iii. त्यांची संख्या ही सभागृह चालवू शकेल एवढया संख्येइतकी म्हणजे गणपूर्तीच्या संख्येएवढी असली पाहिजे. याचाच अर्थ सदस्यांच्या एकूण संख्येच्या 1/10 किंवा कमीत कमी दहा असली पाहिजे.

(7) विरोधी पक्ष नेते पद हे संसदीय लोकशाहीतील अत्यंत महत्वाचे पद असून या संदर्भात वरील सर्वसाधारण निकष उपलब्ध असून याबाबत मा. सभापती यांचा निर्णय अंतिम असेल.

यानंतर श्री.शिगम......

**सभापती.....**

(8) विरोधी पक्ष किंवा विरोधी पक्षाच्या मान्यतेच्या प्रक्रियेबद्दल( Procedure to decide issue ) कोणत्याही प्रकारचे नियम नाहीत.

(9) ज्यावेळेस संसदीय लोकशाहीमध्ये विशेषत: विधानमंडळाच्या सभागृहाच्या कामकाजासंदर्भात जेव्हा प्रत्यक्ष नियम केलेले नसतात, त्यावेळेस मा.पीठासीन अधिकारी यांनी वेळोवेळी घालून दिलेली कार्यप्रणाली हीच पाळली जाते.

विधान परिषदेमध्ये विरोधी पक्ष नेता ठरविताना तत्कालीन मा.पीठासीन अधिकारी यांनी घेतलेले निर्णय, कार्यप्रणाली यांचा थोडक्यात गोषवारा मी देऊ इच्छितो.

<u>विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते व त्यांचा कालावधी</u>

- श्री.एम.बी.गायकवाड - दिनांक 14.7.1960 ते दिनांक 23.3.1962
- श्री.वा.ब.गोगटे - दिनांक 27.7.1962 ते दिनांक 28.8.1966
- श्री.आर.एफ.चौधरी - दिनांक 29.8.1966 ते दिनांक 21.7.1967
- श्री.उत्तमराव पाटील - दिनांक 22.7.1967 ते दिनांक 26.3.1978

महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेते वेतन व भत्ते अधिनियम, 1978 साली अंमलात आले. यानंतर खालीलप्रमाणे विरोधी पक्ष नेते व त्यांचा कालावधी आहे.

- श्री.अर्जुनराव कस्तुरे, दिनांक 27.3.1978 ते दिनांक 19.7.1978
- प्रा.राम मेधे - 20.07.1978 ते 09.07.1980
- प्रा. ग.प्र.प्रधान - 09.07.1980 ते 07.09.1982
- श्री. दत्ता मेघे - 07.09.1982 ते 16.11.1984
- श्री. देविदास कराळे - 17.11.1984 ते 12.12.1986
- श्री. रा.सु.गवई - 12.12.1986 ते 20.12.1988
- श्री. विठ्ठलराव हांडे - 23.12.1988 ते 20.12.1990
- श्री. रा.सु.गवई - 20.12.1990 ते 17.07.1991

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

- श्री. प्रमोद नवलकर - 17.07.1991 ते 02.07.1992
- श्री. अण्णा डांगे - 02.07.1992 ते 30.07.1993
- श्री. सुधीर जोशी - 30.07.1993 ते 30.07.1994
- श्री. अण्णा डांगे - 30.07.1994 ते 18.03.1995
- श्री. शरद पवार - 25.03.1995 ते 21.05.1996
- श्री. छगन भुजबळ - 10.07.1996 ते 18.10.1999
- श्री. नितीन गडकरी - 23.10.1999 ते 11.04.2005
- श्री पांडुरंग फुंडकर 11.04.2005 ते आजतागायत

विधान परिषदेमध्ये विरोधी पक्ष नेते म्हणून मान्यता देणाच्या प्रक्रियेचा व तत्कालीन मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा थोडक्यात आढावा घेतल्यास असे मला दिसून येते की, परिषदेमध्ये प्रामुख्याने दोन गट अस्तित्वात आहेत. 1) राष्ट्रीय लोकशाही आघाडी व 2) पुरोगामी लोकशाही आघाडी.

सर्वसाधारणपणे पुरोगामी लोकशाही आघाडीमध्ये शेतकरी कामगार पक्ष, जनता दल, काँग्रेस (स) पक्ष, रिपब्लिकन पक्ष व काही अपक्ष यांचा समावेश असल्याचे दिसून येते. तर, राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये भारतीय जनता पक्ष, शिवसेना, काही अपक्षांचा व शिक्षक प्रतिनिधींचा समावेश असल्याचे दिसून येते. त्या त्यावेळी तत्कालीन मा.सभापतींनी योग्य ते निर्णय खालीलप्रमाणे घेतलेले आहेत. उदा. दिनांक 17 नोव्हेंबर, 1984 रोजी क्रमांक 34289/ग या अधिसूचनेअन्वये तत्कालीन मा.सभापतींनी खालील निर्णय घेतला होता.

महाराष्ट्र विधान परिषदतील विविध राजकीय पक्षांचे सदस्य तसेच, काही अपक्ष सदस्य यांनी स्थापन केलेल्या पुरोगामी लोकशाही आघाडी या विधान परिषदेतील अधिकृत विरोधी पक्षांनी श्री.देविदास कराळे यांची या आघाडीचे नेते म्हणून निवड केली असल्याने त्यांना महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेता म्हणून दिनांक 17 नोव्हेंबर, 1984 पासून मान्यता देण्यात आली होती. दिनांक 12.12.1986 रोजी पुरोगामी लोकशाही आघाडीचे नेते श्री.रा.सु.गवई यांना....

....नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

तत्कालीन सभापती श्री.जयंतराव टिळक यांनी विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता दिलेली होती. दि.23 डिसेंबर, 1988 रोजी पुरोगामी लोकशाही आघाडी दलास विधानपरिषदेतील विरोधी पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली असून श्री.विठ्ठलराव हांडे यांना विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देण्यात आली. दि. 17 जुलै, 1991 रोजी तत्कालीन मा.सभापतींनी महाराष्ट्र विधानपरिषदेतील विविध राष्ट्रीय पक्षांचे सदस्य तसेच काही अपक्ष यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी या अधिकृत विरोधी पक्षाने श्री.प्रमोद नवलकर, विधानपरिषद सदस्य यांना महाराष्ट्र विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता दिली होती. दि. 2 जुलै, 1992 रोजी विधानपरिषदेतील विविध राजकीय पक्षाचे सदस्य तसेच, काही अपक्ष सदस्य यांच्या आघाडीने श्री.अण्णा डांगे यांना विरोधी पक्ष नेता म्हणून केलेल्या निवडीस तत्कालीन मा.सभापतींनी मान्यता दिली होती. दि. 20 जुलै, 2002 रोजी तत्कालीन मा.सभापतींनी महाराष्ट्र विधानमंडळ भारतीय जनता पक्ष व शिवसेना पक्षास विधानपरिषदेतील अधिकृत विरोधी पक्ष म्हणून मान्यता दिलेली आहे व त्यांचे नेते म्हणून श्री.नितीन गडकरी हे विधानपरिषद, विरोधी पक्ष नेते झाले. दि.4 एप्रिल, 2005 रोजी विरोधी पक्ष नेता म्हणून श्री.पांडुरंग फुंडकर यांची निवड करण्याचे पत्र भारतीय जनता विधिमंडळ पक्ष नेते, श्री.गोपीनाथ मुंडे व शिवसेना विधिमंडळ पक्ष नेते, श्री.नारायण राणे यांनी दिले होते. त्याप्रमाणे श्री.पांडुरंग फुंडकर यांना दि. 11 एप्रिल, 2005 च्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र विधानमंडळ शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे नेते म्हणून विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद म्हणून मान्यता दिली होती.

एकंदरीतच परिषदेमध्ये विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देण्याचे निकष प्रथा, परंपरेप्रमाणे स्पष्ट आहेत व या संदर्भात मा.सभापतींनी वेळोवेळी दिलेले निर्णयसुध्दा स्पष्ट आहेत.

या संदर्भात मी श्री.दिवाकर रावते, प्रतोद, शिवसेना विधिमंडळ पक्ष व भारतीय जनता विधिमंडळ पक्षाचे प्रतोद श्री.संजय केळकर व श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी माझ्या दालनामध्ये दिनांक 17 मार्च, 2010 रोजी बोलावले होते. श्री.दिवाकर रावते यांनी प्रामुख्याने असे प्रतिपादन केले की, शिवसेना पक्षाची सदस्य संख्या 9 असून या 9 सदस्यांची नोंद विधिमंडळ पक्ष सदस्यांच्या यादीमध्ये आहे. भारतीय जनता विधिमंडळ पक्षाच्या गटामध्ये ज्या 3 सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे ते 3 सदस्य अपक्ष असून त्यांनी तसे अभिलेख्यामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.......

जाहीर केले आहे. विधानसभेमध्ये जेव्हा श्री.गोपीनाथ मुंडे यांनी विरोधी पक्ष नेते पदासाठी दावा दाखल केला त्यावेळेस अधिकृत पक्षाचे सदस्य हेच मुख्य तत्व मानले गेले. याप्रमाणे शिवसेना विधिमंडळ पक्षाचे 9 सदस्य असून अपक्ष सदस्यांची संख्या विरोधी पक्ष नेते पद ठरविताना गृहित धरु नये असा दावा त्यांनी केला. श्री.संजय केळकर व श्री.विनोद तावडे यांच्या म्हणण्याचा प्रामुख्याने आशय असा होता की, राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये भारतीय जनता पक्ष व इतर गटांचा समावेश असून विधानपरिषद नियमाप्रमाणे हा गट स्थापन झालेला आहे व हा गट विधानपरिषदेमध्ये कित्येक वर्षापासून राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणून कार्यरत आहे. या गटाचे नेते श्री.पांडुरंग फुंडकर हे आहेत. श्री.विनोद तावडे यांनी सुध्दा बाजू मांडताना अपक्ष सदस्यांच्या गटाचा विरोधी पक्ष नेत्याला मुद्यावर आधारित पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले की, या गटातील 3 सदस्य हे अपक्ष असून त्यांचा पाठिंबा विरोधी पक्ष नेते पदाला आहे. ते जरी अपक्ष सदस्य असले तरी ते आमच्या गटाने पुरस्कृत केलेले उमेदवार आहेत व ते सभागृहात निवडून आल्यापासून विधानपरिषदेत भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसमवेत बसतात व एकाच कार्यक्रमाच्या आधारे काम करतात आणि त्यांची बसण्याची आसन व्यवस्था भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांबरोबरच असून त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या गटाबरोबरच राहू असे लेखी दिले असल्याचे सांगितले. अपक्ष सदस्य हे नियमाप्रमाणे कोणत्याही पक्षात सामील होऊ शकत नाहीत. तथापि, त्यांनी विरोधी पक्ष नेते पदाला पाठिंबा दिलेला आहे व सदर पाठिंबा हा क्षणिक नसून त्यांनी त्यांचा कार्यकाल संपेपर्यंत तो दिलेला आहे. त्यामुळे यापुढेही भारतीय जनता पक्षाचाच सदस्य हा विरोधी पक्ष नेते पदी राहील असा मुद्दा त्यांनी मांडला. अशा प्रकारे त्यांचा गट हा एकजिनसी व एकाच कार्यक्रमावर काम करणारा सर्वात मोठा गट असल्याचे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे. शिवाय हा गट गणपूर्तीची आवश्यक ती संख्या पूर्ण करतो. श्री.विनोद तावडे यांनी या संदर्भात पागे समितीच्या शिफारसींचा उल्लेख करुन त्यांचा आधार घेऊन असेही प्रतिपादन केले की, अपक्ष सदस्यांनी त्याचे अस्तित्व अपक्ष सदस्य म्हणून कायम ठेवून फक्त मुद्यांवर आधारित विरोधी पक्ष नेत्याला राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा सदस्य म्हणून पाठिंबा दिला आहे.

एकंदरीतच या संपूर्ण प्रकरणाचा व दोन्ही पक्षांनी मांडलेल्या बाबींचा मी साकल्याने विचार केला. या संदर्भातील विधानपरिषद सभागृहात पाळल्या गेलेल्या प्रथा, परंपरा, संकेत, तत्कालीन

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेले निर्णय, कौल व शकधर यांच्या ग्रंथातील या संबंधातील अधिकृत दाखले, पागे समितीच्या शिफारशी, लोकसभेचे पहिले अध्यक्ष, श्री.मावळंकर यांनी घालून दिलेले निदेश या सर्वांचा परामर्श घेतला तर असे दिसून येईल की, विधानपरिषदेमध्ये विधानपरिषद नियमाप्रमाणे भारतीय जनता पक्ष व अपक्ष सदस्य यांचा एकजिनसी गट असून अपक्ष सदस्यांनी त्यांचे अपक्ष म्हणून स्वतंत्र अस्तित्व अबाधित ठेऊन भारतीय जनता पक्षाच्या विरोधी पक्ष नेत्याला पाठिंबा दिलेला आहे. शिवाय हा गट विधानपरिषद सभागृहातील अतिआवश्यक अशी गणपूर्तीची संख्या पूर्ण करतो. तत्कालीन पीठासीन अधिकाऱ्यांनी दिलेले निर्णय, संसदीय प्रथा, परंपरा व पागे समितीच्या शिफारसीप्रमाणे पक्ष किंवा वेगवेगळे पक्ष किंवा गट मिळून निर्माण झालेल्या पक्षाच्या किंवा गटाच्या सदस्याला विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता देता येते. श्री.वि.स.पागे हे महाराष्ट्र विधानपरिषदेचे दीर्घकाळ सभापती होते. त्यांनी घालून दिलेल्या संसदीय प्रथा, परंपरा या विधानपरिषदेत अधिकारवाणीने पाळल्या जातात. शिवाय, लोकसभेचे पहिले अध्यक्ष, श्री.मावळंकर यांनी सुध्दा विरोधी पक्ष नेते पदासाठी सदर गटाची तत्वप्रणाली व कार्यक्रम समान असला पाहिजे. त्यांचा गट एकसंघ असला पाहिजे व सुविहित गट म्हणून ते काम करु शकले पाहिजेत. अशा पक्षांची सभागृहात व सभागृहाबाहेर यंत्रणा असली पाहिजे व समाजातील सर्व आर्थिक व सामाजिक प्रश्नांशी त्यांचा संबंध असला पाहिजे असा महत्वपूर्ण निकष प्रतिपादन केला आहे. विधानपरिषदेतील तत्कालीन पीठासीन अधिकाऱ्यांचे निर्णयसुध्दा या प्रतिपादनाला पूरक व समर्थनीय असेच आहेत व भारतीय जनता पक्ष हे सर्व निकष पूर्ण करत असल्याने आणि त्यांचा राष्ट्रीय लोकशाही आघाडी गट हा केवळ विरोधी पक्ष नेते या पदाला मान्यता मिळण्यासाठीच एकत्र आलेला नसून हा गट बऱ्याच कालावधीपासून विधानपरिषदेमध्ये एक विशिष्ट कार्यक्रम व तत्वप्रणालीवर आधारित काम करीत आहे. वरील सर्व वस्तुस्थिती, प्रथा, परंपरा, पागे समितीच्या शिफारसी, लोकसभेचे पहिले अध्यक्ष, श्री.मावळंकर यांनी दिलेले निदेश, तत्कालीन पीठासीन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेले निर्णय इत्यादींचा सांगोपांग विचार केल्यास तसेच भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय पातळीवरील स्थान व दर्जा आणि संविधानातील तरतुदींचा एकत्रितरित्या विचार केला असता मी श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांना विधानपरिषदेतील विरोधी पक्ष नेते पदी नियुक्त करण्याचा पूर्वी घोषित केलेला निर्णय कायम ठेवत आहे.

...4..



**सभापती**.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून मी याठिकाणी जे पत्र प्रधान सचिवांमार्फत पाठविले आहे. त्यानुसार श्री.पांडुरंग फुंडकर हेच विरोधी पक्ष नेता म्हणून कायम राहतील असे जाहीर करतो. सभापतींचा निर्णय हा अंतिम असतो. या अनुषंगाने कोणतीही चर्चा कोणालाही करता येणार नाही. या ठिकाणी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या माध्यमातून भाष्य केले आहे. माझा अंतिम निर्णय झाल्यानंतर असे भाष्य करता येणार नाही. म्हणून मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेले भाष्य कामकाजातून वगळतो.

-------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक

**मु.शी.**: भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयकावरील

संयुक्त समितीचे पुनर्गठन.

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक-42 महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक, 2009 संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठवावे, या विधानसभेने संमत केलेल्या प्रस्तावास या सभागृहाने सहमती दिली आहे. या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत.

1) श्री.अरुण गुजराथी, वि.प.स.

2) श्री.राजेंद्र मुळक, वि.प.स.

3) श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

4) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : पाणीपुरवठा मंत्री श्री.लक्ष्मणराव कोंडिबा ढोबळे यांना मी या समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करीत आहे.

-------

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

(नंतर 3के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ/संसद सदस्यांकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे, शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे, त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर छापणे इ. बाबतचे दि. 5 एप्रिल, 2010 चे शासन परिपत्रक

**मु.शी.**: विधानमंडळ/संसद सदस्यांकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे, शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे, त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर छापणे इ. बाबतचे दि. 5 एप्रिल, 2010 चे शासन परिपत्रक यासंबंधी संसदीय कार्यमंत्री यांचे निवेदन

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे :--

<u>नि वे द न</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई पण कर (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XXXI OF 2010**

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY BETTING TAX ACT, 1925. )

( चर्चा पुढे सुरु .....

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, विधेयक क्र. 31 च्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि श्री. केशवराव मानकर यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी प्राधान्याने आयपीएलवर कर लावण्याची सूचना केली आहे. आयपीएलवर देखील अशा प्रकारचा कर लावण्यात यावा कारण त्यातून शासनाला उत्पन्न मिळेल असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. मी या निमित्ताने असे सांगू इच्छितो की, आयपीएलवर अशा प्रकारचे कुठलेही अधिकृत बेटिंग केले जात नाही त्यामुळे आयपीएलवर करमणूक शुल्क लावणे शक्य होणार नाही. एवढे सांगून माझे विचार पूर्ण करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणती शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

------

......3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**विधानसभा विधेयक क्र. 49 संबंधी**

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी निगडित असे विधानसभा विधेयक क्र. 49 हे विधेयक असल्याने ते आज विचारात घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सदर या विधेयकावर विधानसभेत चर्चा झालेली आहे. यासंदर्भात केंद्रशासनाने काही शिफारसी कमी करण्याचे सूचित केले असल्याने ते विधेयक मान्य करुन केंद्राकडे पाठवावयाचे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या विधेयकाच्या काही कलामांच्या संदर्भात आमचे काही आक्षेप आहेत.

**उपसभापती** : आपणा सर्वांची चर्चा झाली तेव्हा असे ठरले होते की, विधेयक क्र. 49 हे आज पारित करु नये.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ....

त्यामुळे हे बिल मी बाजूला ठेवतो.

**उपसभापती** : आता 29 क्रमांकाचे बिल घेण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध ) विधेयक, 2010

L.A. BILL NO. XXIX OF 2010

(A BILL TO PROVIDE FOR THE PREVENTION OF VIOLENCE AGAINST MEDICARE SERVICE PERSONS AND PREVENTION OF DAMAGE OR LOSS OF PROPERTY OF MEDICARE SERVICE INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASTHRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO)

**( विधेयकावर खंडशः विचार पुढे सुरु** ......

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले वि.स.वि. क्रमांक 29- महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध ) विधेयक 2010 ला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. डॉक्टरांबद्दल आपल्या समाजात अनेक गैरसमज होत असतात. जवळपास 95 टक्के डॉक्टर्स चांगले काम करीत असतात. शासनाच्या अनेक योजना राबवून रुग्णांना बरे करण्याचे काम डॉक्टर्स मंडळी करीत असतात. डॉक्टरांना अभय मिळणे हे सुध्दा गरजेचे आहे. जगज्जेता अलेक्झांडरचे ऑपरेशन करावयाचे होते तेव्हा एक सुध्दा डॉक्टर त्याचे ऑपरेशन करण्यास तयार नव्हता. अलेक्झांडरचे ऑपरेशन यशस्वी झाले नाही तर आपला शिरच्छेद होईल असे त्या डॉक्टर्सना वाटत असल्यामुळे त्यांचे ऑपरेशन करण्यासाठी कोणीही डॉक्टर पुढे येत नव्हते. सिंघानिया हॉस्पिटलमध्ये काय झाले होते याची आपल्याला कल्पना आहेच. डॉक्टर हा शेवटी माणूसच असतो. डॉक्टर काही देव नसतो. डॉक्टर्स मंडळी रुग्णांना बरे करण्याचे काम करीत असतात त्यामुळे डॉक्टरांना प्रोटेक्शन देणे आवश्यक आहे. आपल्या देशातील आठ राज्यात यापूर्वीच हे बिल मंजूर झालेले असून आता हे बिल आपल्याकडे मंजूर होत आहे. हे बिल यावे यासाठी आम्ही प्रयत्न करीत होतो. या बिलाचे तीन वेळा ऑर्डीनन्स निघाले होते. पेशंट आणि डॉक्टर यांचे नाते चांगले रहाण्यासाठी हे बिल मंजूर करावे अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

धन्यवाद.

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, हे बिल आम्ही मंजूर करणार आहोत. डॉक्टरांना संरक्षण मिळण्यासाठीच हे बिल सभागृहात आलेले आहे. गोरगरीब माणसांचे जीव वाचविण्यासाठी डॉक्टरांना संरक्षण मिळाले पाहिजे यामध्ये कोणाचेही दुमत नाही. अलिकडच्या काळात डॉक्टरांवरील हल्ल्यांच्या घटनेत वाढ झाल्यामुळेच हे बिल येथे आलेले आहे. आपण जसा डॉक्टरांचा विचार करीत आहोत तसाच विचार आपण पेशंटचा सुध्दा करावयास पाहिजे होता. गरीब माणूस जेव्हा सिरीअस होतो तेव्हा त्याला जवळच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागते आणि पैसे खर्च करुन डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पेशंटचा मृत्यू झाला तर त्यावेळी डॉक्टरांवर हल्ले होत असतात. काही ठिकाणी तर बिल दिल्याशिवाय डॉक्टर डेड बॉडी सुध्दा उचलू देत नाहीत.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, आता अशी पद्धत आहे की, जेथे हॉस्पिटल असते तेथेच मेडिकल स्टोअर असते. त्या मेडिकल स्टोअरमधूनच औषध घेतले पाहिजे असा दंडक असतो. औषधाचे बिल आणि रूग्णालयाचे बिल अशा दोन्ही बिलामुळे पेशंटची गळचेपी होते. गरीब माणसे डॉक्टरच्या बिलाचे पैसे देऊ शकत नाही. रूग्ण थोडासा बरा झाला आणि त्याचे बिल 30 हजार रूपये आले आणि ते बिल तो देऊ शकला नाही तर त्याला डॉक्टर डिस्चार्ज देखील देत नाही. डॉक्टरांना संरक्षण देताना रूग्णांना देखील संरक्षण दिले पाहिजे असा आमचा हेतू आहे. हे बिल मंजूर करायला काहीही हरकत नाही. समाजातील घटकांची सेवा करीत असताना डॉक्टर समाजसेवा करीत असतील त्यांना कायद्याने संरक्षण देणे ही आपली जबाबदारी आली आहे. त्याच बरोबर ते ज्याची सेवा करतात त्या घटकाचा गोरगरीब माणसाचा या बिलाच्या माध्यमातून विचार व्हायला पाहिजे होता. डॉक्टरांसाठी आपण काही तरी नियमावली तयार केली पाहिजे, असे मला वाटते. तसे नियम केले तर त्यांना संरक्षण द्यायला काहीही हरकत नाही. डॉक्टरना संरक्षण देण्याबरोबर रूग्णाला देखील आधार दिला पाहिजे असे मत मी येथे व्यक्त करतो.

...........

.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (विधि व न्याय मंत्री) : सभापती महोदय, या बिलावर चर्चा करताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगले विचार मांडले आहेत. या चर्चेच्या निमित्ताने अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत.सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी देखील चांगल्या सूचना केल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. या विधेयकामुळे त्यांना संरक्षण मिळणार आहे. त्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा देताना आपोआप सामाजिक दबाव या व्यवस्थेमध्ये निर्माण होईल अशा प्रकारची भावना या विधेयकाच्या पाठिमागची आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केवळ डॉक्टरांना संरक्षण देण्याची भूमिका जर राहिली तर मात्र त्यांच्याकडे येणाऱ्या रूग्णांची पिळवणूक आहे ती चालू राहील. तेव्हा रूग्णाकडून तक्रार आल्यानंतर त्याची दखल घेण्याबाबतची तरतूद यामध्ये असली पाहिजे अशा प्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विधेयकाच्या माध्यमातून ज्या काही तरतुदी सुचविण्यात आलेल्या आहेत. तशाच तरतुदी देशातील 7-8 राज्यांमध्ये अगोदरच करण्यात आलेल्या आहेत. या बिलामुळे डॉक्टरांचा हलगर्जीपणा वाढला, निष्काळजीपणा वाढला,आणि त्यामुळे रूग्णांवर अन्याय झाला अशा स्वरूपाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झालेल्या नाहीत. या विधेयकामुळे डॉक्टरांना संरक्षण मिळाले असले तरी त्यांच्यावर कशा प्रकारे नियंत्रण ठेवता येईल याची सुद्धा पर्यायी व्यवस्था या विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलसुद्धा डॉक्टरांवर अंकुश ठेवण्याचे काम करते. गैरवर्तणुकीबाबतच्या 636 तक्रारी कौन्सिलकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांना ताकीद देणे, त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द करणे यासंबंधीची कार्यवाही झालेली आहे. या विधेयकामध्ये प्रचलित तरतुदी होत्या त्या अस्तित्त्वात आहेत. तसेच दखलपात्र किंवा अजामीनपात्र अशा प्रकारची कलमे आहेत ती अगोदर पासूनच अस्तित्त्वात आहेत.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ KTG/ SBT/ D/ प्रथ्ंम श्री.भारवि 16.30

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

आजसुध्दा रुग्णाला औषधोपचार देण्यामध्ये जर डॉक्टरांनी हलगर्जीपणा दाखवला तर त्यांच्याविरुध्द रुग्णाच्या नातेवाईकाला गुन्हे दाखल करता येतात त्यामुळे रुग्णांना संरक्षण देण्याच्या बाबतीत आज कोणताही कायदा अस्तित्वात नाही असे मानण्याचे काही कारण नाही. सभापती महोदय, गेली दोन वर्षे अध्यादेश काढून वेळोवेळी हे विधेयक आणण्याचा शासनाने प्रयत्न केला होता परंतु काही कारणामुळे ते मंजूर होऊ शकले नाही गेल्या दोन वर्षाचा जर आपण आढावा घेतला तर एकूण 78 गुन्हे संपूर्ण राज्यात दाखल झाले असून एकूण 50 जणांना शिक्षा देखील झाली आहे.हॉस्पिटलची मोडतोड करणे किंवा डॉक्टरांना मारहाण करणे या सारखे प्रकार राज्यामध्ये काही वेळा होत असतात. यासंदर्भात मला हेही सांगावयाचे आहे की, पेशंटची वा नातेवाईकांची डॉक्टरांकडून लुबाडणूक व फसवणूक सुध्दा झालेली आहे.त्याच्या बाबातीत काही विपरित घडलेले असेल तर म्हणणे मांडण्याची संधी त्यांना मिळत नाही. गेल्या दोन वर्षाचा अनुभव पाहिल्यानंतर असे दिसून येईल की वैद्यकीय सेवेत काम करणा-या डॉक्टरांवर देखील अंकुश ठेवण्यात आलेला आहे.आज खाजगी डॉक्टरांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही . व्यापक स्वरुपाचा जर आपण विचार केला तर या व्यावसायिकांना संरक्षण देत असतांना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन राहणार नाही अशी शासनाची भूमिका नाही.वेळ कमी असल्यामुळे मी जास्त न बोलता थोडक्यात माझे विचार मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, या विधेयकातील कलम 7 अंतर्गत प्राधिकरण स्थापन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ असल्यामुळे त्या प्राधिकरणाची अंमजबजावणी या विभागामार्फतच करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.प्रत्येक जिल्हयामध्ये अशा प्रकारचे प्राधिकरण करावे असे प्रस्तावित करण्यात आले असून त्यामध्ये जिल्हा शल्य चिकित्सकाच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात येणार असून त्या समितीमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील, रिहायड्रेसील फोरमधील कायदे विषयक तज्ज्ञ, ग्राहक चळवळीतील व्यक्ती, आरोग्य व्यवस्थापनातील तज्ज्ञ राहणार आहेत. अशा प्रकारे सर्व तज्ज्ञ व्यक्तिची त्या समितीमध्ये नियुक्ती करुन समतोल राखण्याची राज्य शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे पीडित झालेल्या रुग्णाने कोठे तक्रार करावी ? म्हणून प्राधिकरणाच्या संदर्भात मॉनेटरीग करणारी एक समिती राज्य

श्री.राधाकृष्ण विखे पाटील ....

स्तरावर राहणार आहे. या रुग्णांच्या तक्रारी ऐकणे, त्यांना योग्य मोबदला मिळवून देणे, नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे ,त्यांना सल्ला देणे याबाबी देखील आवश्यक आहेत वैद्यकीय व्यवसायात काम करणा-या लोकांवर अंकुश ठेवण्यासाठी इंडियन मेडिकल कौन्सिल , मेडिकल असोसिएशन यांच्यासारखा फोरम निर्माण करण्यात आला आहे.व त्यांच्याकडे पाठपुरावा करता येऊ शकेल परंतु आज प्राधिकरण स्थापन करण्यात आलेले नसल्यामुळे फोरम नाही. अशा वेळी पेशंटचे नातेवाईक पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करतात,काही वेळा व्यक्तिगत स्वरुपाची भांडणे होतात. त्यातून पेंशंटला वा-यावर सोडले जाते . पेशंट गरीब असल्यामुळे त्याला वा त्याच्या नातेवाईकांना आधार नसतो म्हणून राज्य शासन अशा प्रकारचे पाऊल प्रथमच उचलत आहे याचा चांगला परिणाम दिसून येण्यासाठी काही कालावधी जावा लागेल. .

सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य ॲड गुरुनाथ कुलकर्णी यांनी तसेच इतरही सन्माननीय सदस्यांनी काही मुलभूत सूचना केलेल्या आहेत. सभापती महोदय , आपल्या मार्फत मला सन्माननीय सदस्यांना अशी विनंती करावयाची आहे की, राज्यसरकार आज जे काही पाऊल टाकत आहे त्यामुळे या वैद्यकीय व्यवस्थेमध्ये सुधारणा होईल. तसेच डॉक्टर्सवर अंकुश ठेवला जाईल प्राधिकरण निर्माण करण्यात आले असल्यामुळे आपल्याला कोण्ी तरी विचारणारे आहे आपल्यावर कोणी तरी अंकुश ठेवणारे आहे असे डॉक्टरांना वाटेल. त्याचबरोबर कायद्यात जी काही कलमे प्रस्तावित केलेली आहे त्या अनुषंगाने गुन्हे नोंदविण्याच्या बाबतीत कारवाई होऊ शकते असेही त्यांना वाटेल..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे पाटील...

त्यातून वेगळया स्वरुपाच्या कलमांचा आधार घेऊन त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्याची कारवाई होऊ शकते. आणि म्हणून पैशाच्या जोरावर आपण काहीही करु शकतो अशी जर त्यांची भूमिका असेल तर तसे होणार नाही. म्हणून यामध्ये समतोल साधण्याचा आपण प्रयत्न केला आहे. म्हणून हे विधेयक याठिकाणी मांडले आहे. या अधिसूचनेव्दारे राज्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या बऱ्याच भागावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि म्हणून राज्याच्या जनतेच्या हिताच्या दृष्टीने आम्ही एक पाऊल उचलले आहे. त्याकरिता सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 29 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 29 संमत झाले आहे.

----

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अगोदर ठरल्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज झाले पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, महाराष्ट्र सावकारी (नियमन) विधेयक 2010 व मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक 2010 ही दोन्ही विधेयक सभागृहाने संमत करावीत. या सभागृहामध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) या विधेयकावर चर्चा झाली होती. फक्त या विधेयकामध्ये आपण शिक्षा कमी केली आहे. या राज्यातील बेकायदेशीर सावकारीला आळा घालण्यासाठी व शेतकऱ्यांसाठी हे विधेयक आहे. हे विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठवावयाचे आहे. आता पुन्हा अध्यादेश निघू शकणार नाही. विधानसभेमध्ये विधेयक मंजूर झाले आहे त्यामुळे कदाचित पुन्हा अध्यादेश काढता येत नाही. तसेच, या विधेयकाला केंद्र सरकारची मान्यता घ्यावयाची आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : हे विधेयक आपण पहिल्या आठवडयात कां आणले नाही? शेवटच्या आठवडयात, शेवटच्या क्षणाला कां आणले?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे अतिशय छोटे विधेयक आहे, ते मंजूर करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, मुबई ग्रामपंचायत विधेयक आपण चर्चेला घ्यावे. परंतु सावकारी विधेयक आपण आज घेऊ नये. ग्रामपंचायत विधेयक घेण्यास आमची हरकत नाही. सावकारी विधेयक हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. हा नवीन कायदा राज्यात येत आहे. हा कायदा आणायला मुळात दोन वर्षे उशीर झाला आहे. त्यामुळे दोन महिन्यानंतर आणण्यामुळे काय बिघडणार होते? त्यावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे.

(यानतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांना पुन्हा विनंती करणार आहे.त्यांनी देखील सावकारांच्या संबंधात सातत्याने लढा देण्याचे काम केलेले आहे. यासंबंधातील जो जुना कायदा होता, त्यामुळे कुठेही कायदेशीर कारवाई करण्याच्या बाबतीत आम्हाला अडचण निर्माण होत असे आणि सगळया बेकायदेशीर सावकारांच्या बाबतीत आपल्याला माहिती असताना सुध्दा आपण शेतकऱ्यांना मदत करु शकत नव्हतो. म्हणून आपण अशा प्रकारचा सर्वसमावेशक असा कायदा आणलेला असून, त्याला केंद्र शासनाची परवानगी घ्यावी लागणार आहे. मला असे वाटते की, हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे आणि ते विधेयक जर पुढे गेले तर मग पुढील अधिवेशनामध्ये सादर केल्यानंतर संमत होणार आहे आणि त्यानंतर सदरहू विधेयक आपल्याला केंद्र शासनाकडे परवानगीसाठी पाठवावे लागणार आहे. म्हणून माझी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांना विनंती आहे की, आता सदरहू विधेयक चर्चेसाठी घ्यावे आणि दुसरे ग्रामविकासाच्या संबंधातील अतिशय छोटेसे विधेयक आहे. आपण एकमेकांना एवढे सहकार्य करतो. म्हणून यामध्ये शासनाची भूमिका स्पष्ट आहे आणि तीच तुमची देखील आहे. कारण आपण नेहमी शेतकऱ्यांच्या हितासाठीच प्रयत्न केलेला आहे.म्हणून माझी विनंती आहे की, हे विधेयक अत्यंत महत्वाचे आहे आणि ते शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. तसेच आपण सर्वजण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आहोत. मला असे वाटते की,जर हे विधेयक लांबणीवर गेले तर अजून काही कालावधी जाणार आहे आणि पुन्हा जर दुर्दैवाने असा प्रकार घडला तर मग तो शेतकरी आत्महत्या करण्याचा मार्ग स्विकारतो. म्हणून या विधेयकाच्या बाबतीत विरोधी पक्षाने थोडेसे सहकार्य करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी या विधेयकाच्या बाबतीत भूमिका मांडली आहे. ही गोष्ट खरी आहे की, आम्ही सतत गेल्या दोन वर्षापासून शासनाने सावकरांच्या संबंधात विधेयक आणावे अशी आग्रही मागणी केली होती. पण त्यावेळी मात्र शासनाने आम्ही यासाठी केंद्र शासनाची परवानगी घेऊ, ही बाब केंद्र शासनाकडे पाठवू असे करीत-करीत यासाठी दोन वर्षाचा कालावधी गेलेला आहे. आता शासनाने केंद्र शासनाची परवानगी घेऊन यातील शिक्षेची तरतूद कमी केली आहे.राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे अतिशय महत्वाचे विधेयक आहे आणि शासन हे विधेयक चर्चेशिवाय मान्य करणार आहे काय ? अधिवेशन सुरु होण्यापूर्वी कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली होती, तेव्हा आम्ही

. . . .3 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आग्रह धरला होता की, पहिल्या आठवड्यामध्ये सावकारांच्या संबंधातील विधेयक सदनासमोर मांडावे आणि ते मंजूर करुन घ्यावे. पण शासनाने मात्र जाणीवपूर्वक शेवटच्या आठवड्यात, शेवटच्या दिवशी आणि शेवटच्या तासामध्ये हे विधेयक सदनासमोर आणले आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे अत्यंत महत्वाचे विधेयक असून, त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, सावकारांच्या संबंधातील बिल आज चर्चेसाठी न घेता, दोन महिन्यानंतर जुलै मध्ये होणाऱ्या अधिवेशनामध्ये आपण हे विधेयक मंजूर करु. या विधेयकाला आमचे कोणतेही ऑब्जेक्शन नाही किंवा विरोध नाही. तसेच मघाशी माननीय मुख्यमंत्र्यांच्या बरोबर ॲन्टी चेंबरमध्ये जी बैठक झाली, त्यावेळी देखील आज दोनच बिले चर्चेसाठी घ्यावयाची असे ठरले होते आणि त्याप्रमाणे वि.स.वि.क्र.29 हे विधेयक मंजूर झाले आणि दुसरे ग्राम विकास विभागाच्या संबंधातील जे विधेयक आहे, त्यालाही आम्ही मान्यता देतो. सावकारांच्या संबंधातील विधेयक मोठे आहे. तसेच सदरहू विधेयकाची प्रत आम्हाला काल रात्री देण्यात आली आहे. अजून आम्ही हे विधेयक वाचलेले सुध्दा नाही. मग आम्ही विधेयक न वाचताच मंजूर करावयाचे काय ? म्हणून शासनाने आज अशा पध्दतीने विधेयक चर्चेसाठी घेऊ नये. या पध्दतीने तुम्हाला हा कायदा करता येणार नाही. काल विधानसभेने हे विधेयक मंजूर केल्यानंतर मग आम्हाला देण्यात आले आहे. अशा वेळी सदरहू विधेयक न वाचताच त्याला मंजूरी द्यावी असे जर शासनाचे म्हणणे असेल तर त्याला माझा विरोध आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या संबंधातील जे विधेयक आहे, ते चर्चेसाठी घेण्यात यावे आणि हा विषय संपवावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी जे सांगितले, त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, खरे म्हणजे 2008 मध्येच या विधेयकाचा ड्राफ्ट तयार केला होता. त्यानंतर अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सुध्दा हे विधेयक कशा प्रकारचे असावे यासंबंधात व्यापक चर्चा मागील दोन वर्षामध्ये घडलेली आहे. म्हणून आपण हे विधेयक 2008 मध्येच तयार करुन ते केंद्र शासनाकडे पाठविले. केंद्र शासनाने ते सर्व बिल मान्य केले, फक्त त्यातील शिक्षेची तरतूद कमी करावी अशा प्रकारची सूचना केल्यामुळे त्याला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन, त्या दुरुस्तीसह आता हे विधेयक पुन्हा केंद्र शासनाकडे पाठवावयाचे आहे. म्हणून माझी विनंती आहे की, मुळातच यासाठी एकतर उशीर झालेला आहे आणि पुन्हा जर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयप्रकास छाजेड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

या अधिवेशनामध्ये हे विधेयक मंजूर झाले नाही तर ते परत लांबणीवर जाईल आणि मी आपल्या सर्वांच्या माहितीसाठी सांगतो की, याचे दुष्परिणाम होणार आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, आपण कितीतरी वेळा सावकारांच्या विरोधात आंदोलन केलेले आहे. म्हणून अत्यंत सर्वसमावेशक आणि सर्व गोष्टींचा अभ्यास करुन हे विधेयक आपण तयार केलेले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ग्रामविकासाच्या संबंधातील जे विधेयक आहे, ते आपण चर्चेसाठी घ्यावे आणि ते विधेयक मंजूर झाल्यानंतर सावकारांच्या संबंधातील जे विधेयक आहे त्यालाही आपण मान्यता द्यावी अशी माझी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांना पुन्हा विनंती आहे.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XL OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHYAT SAMITIS ACT, 1961)

श्री. रणजित कांबळे( पुनर्वसन व मदत कार्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती ( श्री. जयप्रकाश छाजेड )**: विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, 73 व्या व 74 व्या घटना दुरुस्ती नंतर स्थानिक स्वराज्य संथांच्या निवडणुकीचा पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाला दिलेला आहे. निवडणुका घेणे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे ही पूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. राज्य निवडणूक आयोगाने सन 2006 मध्ये एक सुधारित आदेश काढला आणि त्यामध्ये जिल्हा परिषद सदस्याचा निवडणूक खर्च किती असावा, पंचायत समिती सदस्यांचा निवडणूक खर्च किती असावा आणि ग्रामपंचायत सदस्यांचा निवडणूक खर्च किती असावा हे ठरविलेले आहे. त्या व्यतिरिक्त निवडणूक संपल्यानंतर एका महिन्याच्या आत निवडणूक खर्चाचा हिशेब देणे त्यांना बंधनकारक केलेले आहे. जो कोणी व्यक्ती एका महिन्याच्या आत हिशेब देणार नाही त्या दिवसा पासून पाच वर्षापर्यंत त्यांना सदस्य म्हणून राहण्यास किंवा त्याला उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहण्यासाठी बंदी राहणार आहे. ग्रामपंचायत ॲक्टमध्ये डिसक्वालिफिकेशन्सच्या संदर्भात जे कलम आहे त्यामध्ये 14ख. म्हणून सब क्लॉज घालण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती ॲक्टमध्ये 15ख. आणि 62क. असे सबक्लॉज यामध्ये घालून दुरुस्ती करण्यात येत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 40 वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक चांगले आहे म्हणून मी त्याचे स्वागत करतो. पण ज्या वेळेला निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होतो त्या वेळी तेथे जे अधिकारी असतात ते खऱ्या अर्थाने योग्य प्रकारचा निर्णय घेत नाहीत. वेळोवेळी यामध्ये जे बदल केलेले आहेत या बदलाची अंमलबजावणी त्याठिकाणी होत नाही. निवडणूक आयोग राज्य शासनाच्या कंट्रोलखाली नाही याची जाणीव मला आहे. पण हे विधेयक संमत करीत असताना निवडणूक आयोगाला एक शिफारस करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. ज्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात त्यावेळी जे अधिकारी नियुक्त करण्यात येतात त्यांचे ट्रेनिंग घेतले पाहिजे. या अधिकाऱ्यांना नियमच माहीत नसतात. सभापती महोदय, परवाच्याच दिवशी माझ्या रेवदंडा ग्रामपंचायतीची पोट निवडणूक होती त्यावेळी तेथील निवडणूक अधिकाऱ्याने एक निर्णय दिला आणि त्याचवेळी दुसऱ्या ठिकाणीच्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत तेथील निवडणूक अधिकाऱ्याने वेगळा निर्णय दिला. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी तलाठी निवडणूक अधिकारी असतो किंवा सर्कल अधिकारी निवडणूक अधिकारी असतो त्यांना कायद्याचे ज्ञान नसते म्हणून नायब तहसीलदाराच्या लेव्हलचाच अधिकारी निवडणूक अधिकारी असला पाहिजे, अशा प्रकारचे बंधन घालण्याची आवश्यकता आहे. स्टाफ अपुरा असेल तर तो बाकीच्या जिल्हयातून मागविण्यात यावा पण याप्रमाणे निवडणूक अधिकारी असले पाहिजेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वेळ अपुरा असल्यामुळे मी यावर जास्त बोलणार नाही पण या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला कोण उभे रहातात? गरीब माणसांना या निवडणुका लढवता येतील की नाही याची मला शंका वाटते. या निवडणुकीच्या बाबतीत जे नियम तयार करण्यात येत आहेत त्याप्रमाणे जे दाखले लागतात ते दाखले मिळत नाहीत. पूर्वी ओ.बी.सी.चा दाखला सहजपणे मिळत असे पण आता निवडणुकीच्या वेळी ओ.बी.सी.चा दाखला मिळविण्यासाठी पडताळणी अधिकारी दोन-दोन, तीन-तीन लाख रुपये घेत आहेत. म्हणून या निवडणुका गरिबांनी लढवण्याच्या राहिल्या नाहीत. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये तरी खऱ्या अर्थाने न्याय मिळाला पाहिजे अशी यानिमित्ताने माझी अपेक्षा आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

निवडणुकीच्या सोबत जो फॉर्म जोडावयाचा आहे त्या फॉर्मबाबत प्रबोधन होणे आवश्यक आहे. हे विधेयक मंजूर करीत असताना या फॉर्मची एक महिन्याच्या आत जाहिरात केली पाहिजे. हा फॉर्म सर्वसामान्य माणसांना समजला पाहिजे. जो उमेदवार अशिक्षित आहे, जो निवडणुकीला उभा राहिला आहे, त्यांना सुध्दा ते कळले पाहिजे. शासनाने याबाबत नियम केला आहे, कायदा केला आहे त्यानुसार एक महिन्याच्या आत खर्चाचा तपशील दिला नाही तर त्याची निवड रद्द होऊ शकते, त्याला 5 वर्षे निवडणूक लढविता येणार नाही, यासंबंधी सुध्दा प्रबोधन करण्याची गरज आहे. त्याप्रमाणे ते करण्यात यावे एवढीच विनंती मी करीत आहे.

-----

यानंतर श्री.खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 40 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक सभागृहासमोर आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मांडलेले हे विधेयक चांगले आहे. परंतु त्याचे परिणाम वाईट होण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, मी प्रथम ग्रामपंचायतीच्या निवडणुकीबाबत बोलतो. पूर्व विभागातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्हयांमधील काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत, काही ठिकाणी त्या जाहीर झाल्या आहेत. काही ठिकाणी सुरु आहेत. या निवडणुकीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या प्रवर्गातील जे उमेदवार असतात ते कमी शिकलेले असतात किंवा अशिक्षित असतात. त्यामुळे ही सर्व प्रक्रिया त्यांच्या लक्षात येत नाही. परंतु ओबीसी किंवा इतर प्रवर्गातील उमेदवारांना चांगल्या प्रकारे समजते. सभापती महोदय, जात पडताळणीचा मुख्य प्रश्न आहे. उमेदवाराने विहित फॉर्म सोबत जोडला पाहिजे अशी अट घातलेली आहे. मंत्री महोदयांनी काही दिवसांपूर्वी जात पडताळणीच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे की, प्रत्येक जिल्हयामध्ये जात पडताळणी समिती स्थापन करण्यासंबंधी शासन निर्णय घेईल. सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, सध्या पूर्व विदर्भात निवडणुकीची प्रक्रिया सुरु आहे. तेथील लोक अशिक्षित आहेत, जात पडताळणीसंबंधी अनभिज्ञ आहेत. जे लोक ग्रामपंचायतीची निवडणूक लढवू इच्छितात. त्यांना हा नियम माहीत होणे आवश्यक आहे. आमगाव तालुक्यातील वॉर्ड क्र.2 मध्ये अनुसूचित जातीच्या महिलासाठी जागा राखीव झालेली आहे. या जागेसाठी महिला उमेदवार मिळत नव्हता. परंतु बराच शोध घेतल्यानंतर एक उमेदवार मिळाला आहे. परंतु त्या उमेदवाराची जात पडताळणी झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. हीच परिस्थिती जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या बाबतीत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अनेक जागा महिलांसाठी राखीव झालेल्या आहेत. काही जागा अनुसूचित जाती, जमातीसाठी राखीव आहेत. त्या समाजाला पुढे आणण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. परंतु कायद्याचे निर्बंध हळूहळू घातले जात आहेत. हे निर्बंध जाचक ठरत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

आहेत. परंतु त्यांना सर्व सवलती देण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. या विधेयकात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत उल्लेख केलेला आहे. परंतु ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी किती खर्च करावयाचा, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी किती खर्च करावयाचा, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी किती खर्च करावयाचा, त्याची मर्यादा किती असेल त्याची माहिती उत्तराच्या भाषणातून द्यावी. या निवडणुका निवडणूक आयोग घेणार आहे ही आनंदाची बाब आहे. निवडणूक आयोगाकडून या निवडणुका प्रामाणिकपणे घेतल्या जातील असा मला विश्वास आहे.

निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराना प्रत्येक दिवसाचा खर्च तहसील कचेरीमध्ये द्यावा लागतो. परंतु काही उमेदवार एक दिवसाआड निवडणुकीच्या खर्चाचा तपशील देत असतात. काही उमेदवार निवडणूक संपल्यानंतर एक महिन्याच्या आत ॲफिडेव्हिटसह खर्चाचा तपशील देत असतात.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...

ही जरी आनंदाची बाब असली तरी अनेक लोक यामध्ये चुकतात. कारण काय करायचे हे त्यांना माहीत नसते. या संदर्भात मी शासनाला सूचना करु इच्छितो की, ग्राम पंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुकांचे फॉर्म भरतानाच निवडणूक खर्चाच्या हिशोबाचे विवरणे कशा पध्दतीने भरली पाहिजेत यासंबंधीचे मार्गदर्शन प्रिसायडिंग ऑफिसरने करावे अशा प्रकारच्या सूचना राज्य शासनाने त्यांना देण्याची आवश्यकता आहे. निवडणूक खर्चाची विवरणे सादर करण्यात कसूर करणा-यांना 5 वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह केले जाणार आहे. ही शिक्षा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत. ही 5 वर्षाची निरर्हता केव्हा पासून ठरविण्यात येणार आहे ? तो निवडून आल्याच्या दिवसापासून नवीन निवडणूक होईपर्यन्त त्याला निरर्ह करण्यात येणार आहे काय ? निवडून आल्यानंतर निवडणूक खर्चाची विवरणे सादर करण्यासाठी एक महिन्याची सूट देण्यात आली पाहिजे आणि त्या कालावधीत त्याने विवरणे सादर केली नाहीत तर तो निरर्ह होईल. उमेदवार एकदा निरर्ह झाल्यानंतर तो पुनश्च निवडणुकीस उभा राहाण्यास पात्र होईल का ? ही शिक्षा फार मोठी आहे. कारण आता निवडणुका सोप्या राहिलेल्या नाहीत. ग्रामपंचायतीच्या एका वार्डची निवडणूक लढविण्यासाठी एक-दोन लाख रु.खर्च येतो. जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुका स्वस्तात होत नाहीत. निवडणुकांचे दिले जाणारे हिशेब हे बोगस असतात आणि ते आपणा सर्वांना माहीत असते. लोकसभा, विधानसभेच्या निवडणुका ह्या सीमित कक्षेत होत नाहीत असे माझे प्रामाणिक मत आहे. म्हणून या संबंधातील खर्चाची मर्यादा वाढविण्याची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या निवडणुकासाठी 25 हजाराची मर्यादा दुप्पट केली पाहिजे, वॉर्डाच्या निवडणुकीची मर्यादा 10 हजार रु. केली पाहिजे. हे विधेयक चांगले आहे. या विधेयकाचे मी स्वागत करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी या विधेयकाच्या संदर्भात चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचा शासन निश्चितपणे विचार करील. या निमित्ताने मी दोन गोष्टी स्पष्ट करु इच्छितो. निवडणुकीचा खर्च किती, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. हा निवडणुकीचा खर्च जिल्हा परिषद सदस्यासाठी 60 हजार रु. आहे. निवडणूक खर्चाची रक्कम ही वारंवार बदलत असते. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे त्या रकमेमध्ये बदल होत असतो. त्यामुळे कायद्यामध्ये त्या रकमेचा समावेश केला जात नाही. जिल्हा परिषद सदस्यासाठी निवडणूक खर्चाची मर्यादा 60 हजार रु. , पंचायत समितीच्या सदस्यास निवडणूक खर्चाची मर्यादा 40 हजार रु. आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी निवडणूक खर्चाची मर्यादा 7500 रु. आहे. शिक्षेचा कालावधी किती असेल असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. ज्या दिवसापासून आदेश देण्यात येतील त्या दिवसापासून 5 वर्षे, शिक्षेचा कालावधी राहील. हे अधिकार आपल्याकडे होते ते आता राज्य निवडणूक आयोगाला प्रदान करण्यात येत आहेत. तेव्हा हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.जयप्रकाश छाजेड) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक-40 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक-40 संमत झाले आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सावकारी (नियमन) विधेयक

**मु.शी.**: L.A.BILL No.XLIX OF 2010.

(A BILL TO REGULATE THE TRANSACTIONS OF MONEY-LENDING IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 49, महाराष्ट्र राज्यातील सावकारीच्या व्यवहारांचे नियमन करण्याकरिता विधेयक मांडतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे करु नका.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 49, महाराष्ट्र राज्यातील सावकारीच्या व्यवहारांचे नियमन करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एक अत्यंत महत्वाचे आणि क्रांतीकारक अशा प्रकारचे हे बिल आहे. या राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताकरिता हे बिल आणण्याचा प्रयत्न केला आहे. या बिलामध्ये जी बेकायदेशीर सावकारी चाललेली आहे त्याबाबत प्रचलित कायद्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारवाई करु शकत नाही. त्यासाठी या कायद्यामध्ये दुरुस्ती केली आहे. सर्वसमावेशक अशा प्रकारचा हा कायदा या राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताकरिता आणलेला आहे. हे विधेयक अंमलात

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहातील मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

आणण्यासाठी केंद्राची मान्यता घ्यावी लागणार आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सुध्दा वेळोवेळी या संदर्भात अनेक सूचना केल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुध्दा या संदर्भात काही आक्षेप घेतले होते. त्यामध्ये कंपनी अधिनियम, 1956 चा उल्लेख केलेला आहे. मान्यताप्राप्त भाषेची व्याख्या बिलातील कलम 2(18) मध्ये नमूद केली आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

इतर शब्दांबाबत आक्षेप आहे. विधेयकातील शब्दप्रयोग शासन व्यवहार कोषास अनुसरुन करण्यात आले आहेत. माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणा मागे घ्याव्यात आणि या सभागृहाने अत्यंत महत्वाच्या या बिलाला मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो. याबाबत या राज्यातील शेतकरी सावकाराकडे गेल्यानंतर त्याची जमीन तारण ठेवली जाते, त्याचे घर तारण ठेवले जाते. ते परत देण्याकरिता कोणत्याही प्रकारची तरतूद कायद्यामध्ये नव्हती. मुंबई सावकारी अधिनियम, 1948 यामध्ये आपण आता बदल केलेला आहे. सर्वसमावेशक अशा प्रकारचा शेतकऱ्यांच्या हिताचा कायदा आणला आहे. सभागृहाने या बिलाला संमती द्यावी अशी मी विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहातील मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

नंतर 3व्ही.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य डायससमोर घोषणा देत असतात)

**तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 56 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि. क्र. 49 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2009 चे वि.स.वि.क्र. 49 संमत झाले आहे.

------

( गोंधळ )

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE REGULATION ACT, 1908, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र. 1 - नोंदणी अधिनियम, 1908 महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहाची बैठक पाच मिनिटे स्थगित करण्याची विनंती करीत असतात.)

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र.1 - नोंदणी अधिनियम, 1908 महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, सर्वसामान्य माणसाला आणखी सुविधा मिळाव्यात या हेतूने हे विधेयक आणलेले असून त्या अनुषंगाने नागरिकांना ई-रजिस्ट्रेशन करता येईल. यासाठीच या कायद्यात ही सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. .......

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहाची बैठक पाच मिनिटे स्थगित करण्याचा आग्रह धरतात.)

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्याने मी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करतो.

( 5.09 ते 5.14 पर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

-------

यानंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी घाईगर्दीत सावकारीचे बिल मंजूर करुन घेण्यात आलेले आहे. खरे म्हणजे या बिलाला आमचा कधीही विरोध नव्हता. हे बिल सभागृहात लवकर आणावे यासाठी मी मंत्रीमहोदयांना आग्रह धरीत होतो. या बिलाला विरोध करावा असा आमचा हेतू कधीही नव्हता. कामकाज सल्लागार समितीमध्ये याच अधिवेशनात सावकारी बिल मांडण्यात येणार आहे अशी चर्चा झाली होती. हे बिल शेवटच्या आठवडयात आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, शेवटच्या तासाला का मांडण्यात आले हे काही समजले नाही. हे बिल महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. राज्यातील लाखो शेतक-यांच्या दृष्टीने हे बिल महत्वाचे आहे. हे बिल सभागृहात अगोदर आले असते तर त्या बिलावर अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले असते. हे बिल चांगले आहे हे मी स्वत: मान्य करतो परंतु या बिलावर चर्चा झाली असती तर अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना सूचविल्या असत्या. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही. हे बिल पास करण्यामध्ये वन मंत्रीमहोदयांचा हेतू कदाचित चांगला असू शकेल परंतु या बिलावर चर्चा होऊन ते पास झाले असते तर त्याचा रिझल्ट चांगला निघाला असता. गेल्या 10 वर्षात महाराष्ट्रातील हजारो शेतक-यांनी सावकाराच्या कर्जापायी आत्महत्या केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील हजारो शेतक-यांच्या हजारो एकर जमिनी अजूनही सावकाराकडे गहाण आहेत. सात-बराच्या उता-यावर या शेतक-यांची नावे नाहीत. जमीन शेतकरी कसतो आहे परंतु त्या सात-बाराच्या उता-यावर सावकारांची नावे आहेत. उपनिबंधकाने सर्व निर्णय सावकाराच्या बाजूने दिलेले आहेत. असे अनेक प्रश्न या बिलामध्ये आहेत त्यामुळे या बिलावर चर्चा झाली असती तर कायदा अधिक चांगला झाला असता परंतु आपण घाईगडबडीत हे बिल पास करुन टाकले आहे. या बिलाच्या संदर्भातील आमच्या भावना व्यक्त करता आल्या असत्या परंतु चर्चा न करता आपण हे बिल मंजूर करुन टाकले आहे. आमचा या बिलाला विरोध नाही परंतु आपण चर्चा न करता बिल मंजूर करुन घेतले त्याला आमचा विरोध आहे. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य शेतकरी चळवळीमध्ये काम करणारे आहेत त्यानी या बिलावर अधिक चांगले विचार मांडले असते परंतु आपण तसे होऊ दिले नाही. हे बिल चर्चा करुन मंजूर झाले असते तर माननीय मंत्रीमहोदयांची इतिहासात नोंद झाली असती परंतु तसे होऊ शकले नाही. आमची आपल्याला विनंती आहे की, आता बिलांचे काम थांबवा आणि हा विषय एकदाचा संपवा.

यानंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनेशी मीही सहमत आहे. त्यांनी येथे 2-3 मुद्दे उपस्थित केले आहेत. त्या सगळ्यांना प्रतिबंध करणारी उपाययोजना आपण या बिलामध्ये केलेली आहे. हे बिल केंद्रामध्ये मान्यतेसाठी जाणार आहे. त्यांची मान्यता आल्यानंतर, ते ऑर्डिनन्स काढण्याच्या अगोदर पुन्हा यासंबंधी बैठक घेण्यात येईल. ॲक्ट हा एक भाग आहे, तर रूल्स हा दुसरा भाग आहे. रूल्स करताना या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना बोलाविले जाईल. ती बैठक विधिमंडळ सचिवालयातच घेतली जाईल. शेवटी आपण शेतकऱ्यांच्या हिताकरिता भांडत आहोत. यासंबंधी आपण अनेक वेळा आंदोलने केली, मोर्चे काढले. सभागृहात विविध आयुधांचा वापर करून हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा विचार ऑर्डिनन्स काढताना, रूल्स तयार करताना जरूर करू. दुसरी माझी अशी सूचना आहे की, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 1 - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2010 हे बिल ऑन लेग ठेवावे. हे बिल आपण पुढच्या अधिवेशनात घेऊ. या बिलासंबंधीची थोडक्यात पार्श्वभूमी माननीय मंत्रिमहोदयांना सभागृहाला द्यावयाची आहे. त्यास सभागृहाने अनुमती द्यावी.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO. I OF 2010

( A BILL FURTHER TO AMEND THE REGISTRATION ACT, 1908, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

(चर्चा पुढे सुरू ......

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सन्माननीय सदभापती महोदय, नोंदणी अधिनियमात आपण सुधारणा करीत आहोत. उद्याच्या काळात इंटरनेटच्या माध्यमातून नोंदणी व्हावी असा शासनाचा हेतू आहे. नोंदणी करण्यासाठी सर्वसामान्य माणूस जातो त्यास तासन-तास ऑफिसमध्ये तिष्ठत उभे रहावे लागते. येथे अनेक गैरप्रकार देखील होतात. सर्वसामान्य माणसाला ऑफिसमध्ये जाऊन थांबावे लागू नये म्हणून इंटरनेटच्या माध्यमातून ई रजिस्ट्रेशन व्हावे, दस्ताची नोंदणी व्हावी हा हेतू डोळ्या समोर ठेवून हे विधेयक येथे आणल आहे. यामुळे नोंदणी कार्यालयातील संपूर्ण भ्रष्टाचार निपटून काढता येईल. कुठल्याही सर्वसामान्य माणसाला विनात्रासाचे विनासायासाचे घर बसल्या इंटरनेटच्या माध्यमातून दस्त नोंदणी करता येईल या उद्देशाने हे बिल आणलेले आहे. म्हणून या बिलाला आपण सर्वांनी पाठिंबा द्यावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 23 मिनिटांनी 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अशासकीय कामकाज दाखविण्यात आले आहे हे कामकाज मी पुढे ढकलत असून पुढील अधिवेशनाच्या पहिल्या शुक्रवारी ते प्राधान्याने घेण्याची व्यवस्था केली जाईल.

यानंतर या सत्रकाळातील कामकाजासंबधीची सांख्यिकीय माहिती मी वाचून दाखवितो...

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सभागृहामध्ये शिवसेनेचे सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत तेव्हा याबाबतीत त्यांनी आपल्याला काही कळविले आहे काय ? राष्ट्रगीतावर त्यांनी बहिष्कार टाकला आहे काय ?

**सभापती** : मघाशी शिवसेनेचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होते परंतु त्यानंतर ते सभागृहाबाहेर गेलेले आहेत. मी विरोधी पक्ष नेते पदाचा निर्णय जाहीर केल्यानंतर त्यांनी काही भाष्य केले व त्यानंतर ते सभागृहाबाहेर गेले होते.

सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य : त्यांनी सभागृहात यावयास पाहिजे. त्यांना बोलावून आणा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांविषयीची सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांची भावना मी समजू शकतो. ते देखील मूळचे शिवसैनिक होते हे मला मान्य आहे. या ठिकाणी मी एवढेच सांगू इच्छितो की, शिवसेनेच्या सन्माननीय सदस्यांचा राष्ट्रगीताला विरोध असण्याचे काही कारण नाही.

श्री.छगन भुजबळ (बसून): आज या ठिकाणी शिवसेनेचा एकही सन्माननीय सदस्य उपस्थित नाही तेव्हा त्यांना समजावून सांगणे हे आपले काम आहे आपणं त्यांना समजावून सांगावे.

श्री.विनोद तावडे (बसून): तो अधिकार मी आपल्याला देत आहे.

श्री.छगन भुजबळ(बसून) : मी त्यांना बोलवायला जाईन.

-------

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 25 एकूण काम -197 तास

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 1 तास 15 मि.

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 45 मि.

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 195 तास

रोजचे सरासरी कामकाज 7 तास 45 मिनिटे

(विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 5 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 39 दिवसांचे (जवळ जवळ 8 आठवडे) काम केले आहे.)

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 4202 कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 3530

स्वीकृत प्रश्न 1549 सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न 196

उत्तरीत झालेले अल्पसूचना प्रश्न - 1

<u>नियम 93 सूचना -</u>

एकूण प्राप्त झालेल्या सूचना - 431, स्वीकृत सूचनांची संख्या 212, चर्चा झालेल्या सूचना 110

<u>लक्षवेधी सूचना -</u>

प्राप्त झालेल्या सूचना-1360, मान्य झालेल्या सूचना -328, चर्चा झालेल्या सूचना-83

<u>विशेष उल्लेखाच्या 169 सूचना मांडण्यात आल्या.</u>

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा-प्राप्त झाल्या 10, मान्य झाली 9, चर्चा झाली 8

शासकीय विधेयके संमत-16 (परिषद 5-सभा-11)

नियम 260 अन्वये 9 प्रस्तावावर चर्चा झाली.

अशासकीय ठरावावर चर्चा झाली-4

शासकीय ठरावावर चर्चा झाली-1

अर्धा तास चर्चा-प्राप्त झाल्या 119, मान्य झाल्या 98, चर्चा झाली 26

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 12 जुलै, 2010 पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

---

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे.आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी के. शंकरनारायणन, महाराष्ट्राचा राज्यपाल, याव्दारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

(यानंतर राष्ट्रगीत झाले)

(सायंकाळी 5.52 वाजता सत्र संस्थगित झाले.)

********

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही